पाहिजेत

हॉटेल साई इन, चोंढी-अलिबाग रोड येथे फुल टाईम/पार्ट टाईम रिसेप्शन स्टाफ/अकाऊंट पाहिजे (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक अर्जासह भेटा.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग



रायगड | शनिवार । दि. २१ नोव्हेंबर २०२६ । अंक १६५ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

वेधक

महावितरणचा वीजचोरांना दणका

मुंबई : महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने राज्यात अवघ्या तीनच दिवसात राबविलेल्या वीजचोरी मोहिमेत वीजचोरी व अनधिकृत वीज वापराची २५० प्रकरणे उघडकीस आली आहेत. या कारवाईत ६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. वीजचोरी आणि महसूल गळती रोखण्यासाठी भरारी पथकांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राज्यातील कोकण, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या प्रादेशिक परिक्षेत्रात सुरक्षा व अंमलबजावणी विभागाकडून तपासणी करण्यात आली. यामध्ये कोकण प्रादेशिक विभागात ५३, पुणे ७३, छत्रपती संभाजीनगर ५६ आणि नागपूर प्रादेशिक विभागात ६८ अशा एकूण २५० वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली.

रोह्याचा दुष्काळी यादीत समावेश

रोहा : शेतकरी जनआंदोलन समन्वय समितीच्या आंदोलनाच्या इशाऱ्याला अखेर यश आले आहे. समितीने वरिष्ठ पातळीवर सादर केलेल्या निवेदनाची शासनाने दखल घेत रोहा तालुक्याचा राज्याच्या दुष्काळी यादीत समावेश केला आहे. रोहा तालुक्याचा दुष्काळी यादीत समावेश करावा, म्हसाडी धरणाच्या कामाला प्रारंभ करून कामाचे स्वरूप स्पष्ट करावे, अशा प्रमुख मागण्या समितीने केल्या होत्या. या मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. याकामी समन्वय समितीचे प्रमुख विनायक धामणे, किशोर मोरे, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, राजेंद्र जाधव यांच्यासह शेतकरी प्रतिनिधींनी मेहनत घेतली.

पीएफधारकांना मोठा दिलासा!

नवी दिल्ली : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने नोकरदारांना मोठा दिलासा दिला आहे. नोकरी सोडल्यानंतर संपूर्ण पीएफची रक्कम काढण्यासाठीची प्रतीक्षा १२ महिन्यांवरून पुन्हा दोन महिन्यांपर्यंत कमी करण्यास केंद्रीय विश्वस्त मंडळाने मंजुरी दिली आहे. तसेच पीएफ खात्यात अनिवार्यपणे शिल्लक ठेवण्याची मर्यादा २५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत घटविण्यात आली आहे. त्यामुळे पात्र खातेदारांना ९० टक्क्यांपर्यंत रक्कम काढता येणार आहे.केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत निवृत्त कर्मचाऱ्यांना संपूर्ण रक्कम एकाच वेळी काढण्याऐवजी मासिक, तिमाही किंवा सहामाही हप्त्यांमध्ये पैसे काढण्याची सुविधा देणाऱ्या सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅनलाही मंजुरी दिली आहे.

जमीन व्यवहारांवर आयकरची नजर

मुंबई : जमीन आणि स्थावर मालमत्तांच्या व्यवहारातील काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे जमीन किंवा मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारात दोन लाख रुपयांपेक्षा अधिक रोख रक्कम दिल्यास त्याची माहिती थेट आयकर विभागाला कळविली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुद्रांक नोंदणी महानिरीक्षकांना याबाबत तातडीने अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत. दस्त नोंदणीच्या वेळी रोख आणि धनादेशाद्वारे झालेल्या व्यवहारांची स्वतंत्र नोंद केली जाणार आहे.

'उमटे' गळात

47 गावांचा पाणीहक्क धोक्यात!

13 कंपन्यांकडे गाळ काढण्यासाठी साकडे



। अलिबाग । प्रतिनिधी ।

४७ गावे आणि ३३ आदिवासी वाड्यांची तहान भागवणारे उमटे धरण तब्बल ४५ वर्षांच्या गाळात गाडले गेले आहे. धरणाची मूळ ८७ दशलक्ष घनफूट पाणी साठवण क्षमता घटून अवघी ३० दशलक्ष घनफूट राहिल्याचा दावा उमटे धरण संघर्ष ग्रुपने केला आहे. हजारो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असताना गाळ काढण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेकडे निधी नसल्याचे पुढे करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या प्रतीक्षेत न राहता संघर्ष ग्रुपने आता रायगडमधील १३ बड्या औद्योगिक कंपन्यांचे दरवाजे ठोठावले आहेत.

सीएसआर आणि सीईआर निधीतून धरण गाळमुक्त करण्यासाठी मदत करा, असे साकडे कंपन्यांना घालण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत प्रश्नासाठीही जनतेने आता उद्योगांच्या दारात जायचे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

उमटे धरण संघर्ष ग्रुपचे अध्यक्ष ॲड. राकेश नारायण पाटील यांनी १६ नोव्हेंबर रोजी रायगडमधील १३ औद्योगिक कंपन्यांच्या संचालकांना पत्र पाठवले आहे. यामध्ये जेएसडब्ल्यू स्टील, रिलायन्स इंडस्ट्रीज (नागोठणे व पाताळगंगा), सुदर्शन केमिकल, गेल इंडिया, आरसीएफ, ओएनजीसी, जेएनपीए, इनॉक्स एअर प्रॉडक्ट्स, टाटा पॉवर, थर्मॅक्स, महाजेनको आणि पीएनपी या कंपन्यांचा समावेश आहे. कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी धरणाची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि सीएसआर अथवा सीईआर निधीतून गाळ काढण्यासाठी आर्थिक मदत व यंत्रसामुग्रीउपलब्धकरूनद्यावी,अशी मागणी करण्यात आली आहे. आता कंपन्या सामाजिक उत्तरदायित्वातून कितपत पुढाकार घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

१९७८ मध्ये बांधण्यात आलेल्या उमटे धरणाची मूळ साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफूट होती. मात्र, चार दशकांहून अधिक काळ गाळ साचल्याने ती आता अवघी ३० दशलक्ष घनफूट राहिल्याचे संघर्ष ग्रुपचे म्हणणे आहे. त्यामुळे पावसाचे पाणी साठवण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात घटली असून, उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची भीती आहे.

सुडकोली, रामराज, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, रेवदंडा, चौल-वरंडे, नागाव आणि आक्षी यांसह अनेक ग्रामपंचायत क्षेत्रांतील नागरिक या धरणावर अवलंबून आहेत. विशेषतः ३३ आदिवासी वाड्यांतील नागरिकांना पाणीटंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

धरणातील गाळ वेळीच काढला नाही, तर भविष्यात ४७ गावांवर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवू शकते. उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कंपन्यांनी मदतीचा हात देण्याबरोबरच जिल्हा परिषद आणि प्रशासनानेही आपली जबाबदारी झटकू नये. उमटे धरण गाळमुक्त करुन नागरिकांचा पाणीहक्क सुरक्षित करावा, अशी अपेक्षा ॲड. राकेश पाटील यांनी व्यक्त केली आहे.

जिल्हा परिषदेकडे निधीच नाही

जि.प. अध्यक्षांनी जबाबदारी झटकली?

धरणाची मालकी रायगड जिल्हा परिषदेकडे असून, देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची आहे. मात्र, गाळ काढण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सभेत स्पष्ट करुन जबाबदारी झटकण्याचे काम केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे संघर्ष ग्रुपने औद्योगिक कंपन्यांकडे मदतीची मागणी केली आहे. धरणातील गाळाचे तांत्रिक सर्वेक्षण, निधीचा आराखडा आणि गाळमुक्तीचे कालबद्ध नियोजन करण्याची मागणीही होत आहे.

> उमटे धरणाचा प्रश्न केवळ गाळाचा नसून, हजारो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्काचा आहे. रायगडमध्ये उद्योगांची मोठी आर्थिक उलाढाल होत असताना स्थानिकांच्या पाणीप्रश्नासाठीही कंपन्यांनी सामाजिक बांधिलकी जपावी. त्यामुळे १३ औद्योगिक कंपन्यांनी सीएसआर आणि सीईआर निधीतून धरणाच्या पुनरुज्जीवनासाठी पुढाकार घ्यावा, अशी आमची मागणी आहे.
>
> – ॲड. राकेश नारायण पाटील, अध्यक्ष, उमटे धरण संघर्ष ग्रुप

टोरंटवर सरकार मेहरबान



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जतमधील टोरंट एनर्जीच्या तीन हजार मेगावॅट वीज प्रकल्पासाठी राज्य सरकारने तब्बल २९५ हेक्टर खासगी जमीन खरेदीला मंजुरी दिल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या मूळ मंजुरीत १४४ हेक्टर खासगी जमिनीची आवश्यकता नमूद असताना महसूल विभागाने थेट २९५ हेक्टर जमिनीला हिरवा कंदील दिला आहे. तब्बल १५१ हेक्टर अतिरिक्त जमिनीच्या मंजुरीमुळे सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. टोरंटसाठी नियम शिथिल केले जात असल्याचा आरोप होत असून, सरकार कंपनीच्या पाठीशी उभे असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

जानेवारी २०२६ मध्ये केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिलेल्या मंजुरीनुसार, या प्रकल्पासाठी एकूण ३७७ हेक्टर जमिनीची आवश्यकता होती. त्यात २३३ हेक्टर वनजमीन आणि १४४ हेक्टर खासगी जमिनीचा समावेश होता. मात्र, राज्याच्या महसूल विभागाने २७ ऑक्टोबर रोजी काढलेल्या आदेशानुसार टोरंट एनर्जी स्टोरेज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडला २९५ हेक्टर खासगी जमीन खरेदी करण्यास तत्त्वतः मान्यता दिली आहे. सात गावांतील ४३४ भूखंडांचा यात समावेश आहे.

महाराष्ट्रातील जमीनधारणा कायद्यानुसार, कंपनीला कमाल ५४ एकरपेक्षा अधिक जमीन स्वतःकडे ठेवण्यासाठी राज्य सरकारची विशेष परवानगी आवश्यक आहे. टोरंट कंपनीला ही मर्यादा ओलांडून तब्बल ७३० एकर जमीन खरेदीची परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे या विशेष सवलतीमागील नेमके कारण काय, •➤पान ५ वर

१३,५०५ कोटींचा प्रकल्प नेमका काय?

पेज नदीवर उभारण्यात येणारा १३,५०५ कोटी रुपयांचा हा पंप स्टोरेज प्रकल्प महाकाय बॅटरीप्रमाणे काम करणार आहे. विजेची मागणी कमी असताना पाणी उंचावरील जलाशयात पंपाद्वारे साठवले जाईल. मागणी वाढल्यावर हेच पाणी खाली सोडून टर्बाईनच्या सहाय्याने वीजनिर्मिती केली जाणार आहे. प्रकल्पाची क्षमता तीन हजार मेगावॅट आहे.

१४४ हेक्टरचे थेट २९५

- पर्यावरण मंजुरीतील खासगी जमीन : १४४ हेक्टर
- महसूल विभागाची नवी मंजुरी : २९५ हेक्टर
- अतिरिक्त जमीन : १५१ हेक्टर
- गावांची संख्या : ७
- भूखंड : ४३४
- वनजमीन : २३३ हेक्टर

शिवशाहीच्या धडकेत एक ठार

नागोठणे : मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे येथील रमाईनगर परिसरातील उड्डाणपुलावर शिवशाही एसटी बसने स्कुटीला मागून धडक दिल्याने विकास सोनू मोगरे (४०, रा. नालासोपारा) यांचा जागीच मृत्यू झाला. तर स्कुटीचालक अभिषेक हरिश्चंद्र मोगरे (३४, रा. कांदिवली) किरकोळ जखमी झाले. गुरुवारी सकाळी ८.१५ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. दोघेही मूळचे मंडणगड तालुक्यातील भराडी गावचे असून मुंबईहून आपल्या गावी जात होते. दरम्यान, मुंबईहून श्रीवर्धनकडे जाणाऱ्या शिवशाही बसने त्यांच्या स्कुटीला मागून जोरदार धडक दिली.

मोहोपाडा स्मशानभूमीत अघोरी विधी?

- **मृत कोंबडा, आठ नारळ, १५ लिंबू अन् पाच मडकी आढळली**



। रसायनी । प्रतिनिधी ।

मोहोपाडा येथील स्मशानभूमीत मृत कोंबडा, आठ नारळ, १५ लिंबू, पाच मातीची मडकी, कापलेल्या दोन भाजीचे कोल्हे आणि लाल शेंदूर अशा विचित्र वस्तू आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या वस्तू अघोरी विधी किंवा तोटक्यासाठी ठेवण्यात आल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अंत्यसंस्कारासाठी गेलेल्या नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार आल्याने स्मशानभूमीतील या रहस्यमय प्रकाराची •➤पान ५ वर

कोकणच्या 'हापूस'वर गुजरातचा डोळा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातला हापूस आंबा हा फक्त राज्यात किंवा देशातच नव्हे तर, संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. जगात सर्वांचा लाडका आणि कोकणसह महाराष्ट्राचा अभिमान असलेल्या 'हापूस'च्या भौगोलिक मानांकनावर गुजरातच्या दाव्यामुळे वादाला तोंड फुटले आहे. गुजरातने 'वलसाड हापूस' नावाने भौगोलिक मानांकन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. त्यावरून महाराष्ट्रातील हापूस उत्पादक आणि विक्रेते आक्रमक झाले आहेत. याविरोधात न्यायालयीन लढ्याचीही त्यांनी तयारी दर्शवली आहे.

कोकणातील हापूस आंब्याला यापूर्वीच जीआय टॅग मिळाला आहे. पण आता गुजरातमधील गांधीनगर व नवसारी विद्यापीठाने २०२३ मध्ये वलसाड हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. या अर्जावर कायदेशीर सुनावणी सध्या सुरू आहे. त्यामुळे हापूस आंब्याला मिळालेले 'कोकण हापूस' हे जगातले पहिले जीआय मानांकन धोक्यात येण्याची शक्यता असल्याने कोकणातील •➤पान ५ वर



'कोकण हापूस'ला पहिला जीआय टॅग

कोकण हापूसला २००८ मध्ये जीआय मानांकन मिळाले. येथील भौगोलिक परिस्थिती, माती आणि विशिष्ट चव यावर आधारित सर्व कागदपत्रे २०१८ पर्यंत सादर करण्यात आली होती. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या सहभागातून कोकणाला हे मानांकन मिळाले आहे.

जीआय टॅग म्हणजे काय?

जीआय टॅगमुळे उत्पादनाला कायदेशीररीत्या विशिष्ट भौगोलिक ओळख मिळते. आंतरराष्ट्रीय बाजारातही उत्पादनाची विश्वासार्हता वाढते. कोणालाही ते नाव वापरण्यास मनाई होते. जुलै २०२५ पर्यंत भारतात ६५८ जीआय टॅग असलेली उत्पादने आहेत. यात १२ ते १५ आंब्यांचे प्रकारही आहेत.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीचा जीआर गायब

- **२८ ऑक्टोबरच्या निर्णयानंतरही शासनाची टाळाटाळ**
- **आठ हजारांहून अधिक शेतकरी नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत**

। नेरळ । प्रतिनिधी ।

दुष्काळग्रस्त जाहीर करूनही कर्जतच्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच आली आहे. २८ ऑक्टोबर रोजी शासनाच्या उपसमितीने कर्जत तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर २१० महसुली गावांतील भातशेतीच्या नुकसानीचे पंचनामेही पूर्ण झाले. शेतकऱ्यांकडून केवायसी आणि बँक खात्यांची माहिती घेण्यात आली. मात्र, २० दिवस उलटूनही मदतीचा शासन निर्णय (जीआर) निघालेला नाही. त्यामुळे नुकसानभरपाईची आशा लावून बसलेल्या आठ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची सरकारने फसवणूक केल्याचा आरोप होत आहे.



> पावसाळा लवकर संपल्याने आमच्या शेतातील भातपीक जागेवरच करपून गेले. तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाल्याने नुकसानभरपाई मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, मदतीचा जीआरच निघाला नसल्याचे समजले. त्यामुळे सरकारकडून मदत मिळेल, याची खात्रीच राहिलेली नाही.
>
> – दशरथ शेंडे, शेतकरी

यंदा पावसाळा सप्टेंबरमध्येच संपल्याने कर्जत तालुक्यात भातशेतीचे मोठे नुकसान झाले. राज्याच्या दुष्काळ निवारण उपसमितीने २८ ऑक्टोबर रोजी कर्जतसह राज्यातील दहा तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत •➤पान ५ वर

8,230 शेतकरी संकटात

- नुकसानग्रस्त शेतकरी : ८,२३०
- बाधित क्षेत्र : सुमारे ४,७०० हेक्टर
- ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झालेली शेती
- २८ ऑक्टोबरला दुष्काळी यादीत समावेशाचा निर्णय

पोलीस भरतीतील तरुणींना मोठा दिलासा | **गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची घोषणा**

मासिक पाळीमुळे भरतीची संधी हुकणार नाही!

। मुंबई । प्रतिनिधी ।

पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानावर घाम गाळणाऱ्या तरुणींसाठी राज्य सरकारने मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आल्याने आता कोणत्याही तरुणीची भरतीची संधी हुकणार नाही. अशा उमेदवारांना आरोग्य तपासणीनंतर पाच ते सहा दिवसांची मुदतवाढ देण्यात येणार आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

पोलीस भरतीसाठी अनेक महिने कठोर सराव करणाऱ्या तरुणींना शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळीमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पोटदुखी, कंबरदुखी, अशक्तपणा, थकवा आणि चक्कर यांसारख्या त्रासांमुळे अपेक्षित कामगिरी करणे शक्य होत नाही. परिणामी, वर्षानुवर्षे केलेली मेहनत आणि पोलीस होण्याचे स्वप्न एका दिवसामुळे धोक्यात येण्याची भीती असते. मात्र, सरकारच्या नव्या निर्णयामुळे अशा तरुणींना मोठा दिलासा मिळणार आहे.

पोलीस भरतीच्या शारीरिक चाचणीमध्ये १०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे, गोळाफेक आणि लांब उडी अशा विविध प्रकारच्या चाचण्यांचा समावेश असतो. मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या शारीरिक त्रासाचा या चाचण्यांतील कामगिरीवर परिणाम होऊ शकतो. प्रत्येक तरुणीला होणारा त्रास वेगवेगळा असतो. अशा परिस्थितीत शारीरिक क्षमता असूनही अपेक्षित कामगिरी करता येत नाही.

महिन्यांची मेहनत एका दिवसामुळे वाया जाणार नाही!

मासिक पाळी ही नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया आहे. मात्र, तिच्यामुळे भरती प्रक्रियेत तरुणींना नुकसान सहन करावे लागू नये, हा या निर्णयामागील महत्त्वाचा उद्देश आहे. आरोग्य तपासणीत मासिक पाळीमुळे शारीरिक चाचणी देणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधित उमेदवारांना पाच ते सहा दिवसांची अतिरिक्त मुदत दिली जाणार आहे. त्यामुळे त्यांना प्रकृतीनुसार शारीरिक चाचणी देण्याची संधी उपलब्ध होईल.

तरुणींकडून निर्णयाचे स्वागत

सरकारच्या या निर्णयाचे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींनी स्वागत केले आहे. अनेक महिने मेहनत करून शारीरिक चाचणीपर्यंत पोहोचल्यानंतर केवळ मासिक पाळीमुळे संधी गमावण्याची वेळ येणे अन्यायकारक होते. सरकारच्या निर्णयामुळे अशा उमेदवारांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुलींच्या शारीरिक अडचणींची दखल घेऊन भरती प्रक्रियेत संवेदनशीलता दाखविणारा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. दरम्यान, या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशा पद्धतीने होणार, आरोग्य तपासणीचे निकष काय असतील आणि मुदतवाढ मिळविण्यासाठी कोणती प्रक्रिया पूर्ण करावी लागेल, याबाबतची अधिकृत नियमावली महत्त्वाची ठरणार आहे.

लग्नाच्या आमिषाने १४ तरुणींचे लैंगिक शोषण

। मुंबई । प्रतिनिधी ।

लग्नाचे आमिष दाखवून तब्बल १४ तरुणींचं लैंगिक, मानसिक आणि आर्थिक शोषण करून परदेशात पसार झालेल्या एका सराईत आरोपीला संयुक्त अरब अमिरातीमधून भारतात आणण्यात भारतीय तपास यंत्रणांना मोठं यश आलं आहे. महाराष्ट्र पोलिसांना हवा असलेला आरोपी मोहम्मद माजिन याचे २० नोव्हेंबर रोजी भारतात यशस्वी प्रत्यार्पण करण्यात आलं. केंद्रीय अन्वेषण विभाग, परराष्ट्र मंत्रालय, केंद्रीय गृह मंत्रालय आणि महाराष्ट्र पोलीस यांच्या समन्वयातून ही मोठी कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, मुख्य पीडित तरुणीला आरोपी मोहम्मद माजिन याने लग्नाचं आमिष दाखवून तिच्याशी शरीर संबंध प्रस्थापित केले. तिचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण करत तब्बल १८ लाख रुपयांची फसवणूक केली.

या प्रकरणाचा सखोल तपास केला असता, आरोपीने अशाच प्रकारे आणखी १३ महिलांना लग्नाच्या जाळ्यात ओढून त्यांचे शोषण केल्याचे उघड झालं. या सर्व महिलांकडून त्याने मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले, इतकेच नव्हे तर आरोपीनं त्यांचे प्रायव्हेट व्हिडिओ रेकॉर्ड केल्याचा गंभीर आरोपही त्याच्यावर आहे. •➤पान ५ वर

सुट्टीच्या दिवशी कामे बंद ठेवा!

● एमएसआयडीसीच्या कामांचा बेजबाबदारपणा उघड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील रस्त्यांची कामे नागरिकांच्या जिवावर उठली आहेत. आरांश आणि प्रकाश भगत यांच्या मृत्यूने कामांमधील असुरक्षितता समोर आली आहे. त्यामुळे शनिवार आणि रविवार आणि सुट्टीच्या दिवशी रस्त्यांची कामे बंद ठेवावीत, अशी मागणी जोर धरत आहे. जिल्हा प्रशासनाने यात गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेण्याचे अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



अलिबाग, नागाव आणि मुरुड परिसरात शनिवार-रविवारी पर्यटकांची मोठी गर्दी असते. मुंबई, पुण्यासह विविध भागांतून पर्यटक समुद्रकिनाऱ्यांकडे येतात. अशा वेळी रस्त्यांचे खोदकाम, मातीचे ढिगारे आणि एकेरी वाहतुकीमुळे प्रचंड कोंडी होण्याची शक्यता आहे. याचा फटका स्थानिक नागरिकांसह पर्यटक आणि अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना बसू शकतो. पुढील महिन्यात वर्षअखेरीच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची संख्या आणखी वाढणार आहे. त्यामुळे एमएसआयडीसीने शनिवार-रविवार कामे बंद ठेवून इतर दिवशी नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत, अशी मागणी होत आहे.

आरांशचा मृत्यू वाहतूक कोंडीत झाला, तर प्रकाश भगत यांचा जीव रस्त्याच्या कामातील असुरक्षिततेमुळे गेला. या घटनांनंतरही प्रशासनाला जाग येणार नसेल, तर आणखी किती बळींची प्रतीक्षा आहे? जिल्हाधिकाऱ्यांनी एमएसआयडीसी, ठेकेदार आणि पोलीस प्रशासनाची तातडीने बैठक घेऊन कामांचे वेळापत्रक निश्चित करावे.

“आरांश आणि प्रकाश भगत यांच्या मृत्यूने रस्ते कामांमधील असुरक्षितता स्पष्ट झाली आहे. शनिवार-रविवारी आणि सुट्टीच्या दिवसांमध्ये अलिबाग, नागाव आणि मुरुडमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी असते. वर्षअखेरीस ती आणखी वाढणार आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी रस्त्यांची कामे बंद ठेवावीत. जिल्हा प्रशासनाने वेळीच निर्णय घेऊन नागरिकांचे जीव वाचवावेत.
– रुपेश पाटील, बेलकडे ग्रामस्थ”

ट्रेलरवरील ३८ टनांची लोखंडी प्लेट रस्त्यावर

। पनवेल । प्रतिनिधी ।

ट्रेलरवरून ३८ टन वजनाची लोखंडी प्लेट रस्त्यावर पडल्याने कळंबोली येथे मोठी वाहतूक कोंडी झाली. याप्रकरणी ट्रेलर चालक प्रदीप कुमार मोतीलाल बिंद (रा. उत्तर प्रदेश) याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार सचिन त्र्यंबके यांच्या फिर्यादीनुसार, मुंब्रा महामार्गावरील बसथांब्याजवळ ट्रेलरवरील लोखंडी प्लेट घसरून रस्त्यावर पडली.

E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

Sr. No.	Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated cost	Submission Date
1	**e-Tender-21/ 26-27/ Rfx No. 7000042199**	Supply, Installation, Testing & commissioning of portable, Programmable battery charger (Universal Charger) with DC Voltage monitoring usable for various s/s under 400 kV R.S. Division Nagothane Under EHV O&M Circle, Panvel..2nd call	**Rs. 9,96,510/-**	**28.11.2026 up to 23.59 hrs**

EMD 1% of estimate cost i.e. Rs. 9,965.10/- and Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, राधाबाई रघुनाथ पवार रा.मायनी, पो.रानसई, ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिन मौजे शेडाशी कातकरीवाडी ता.पेण, जि.रायगड येथे असून मी स्वत: बामा मारूती भला विकत घेण्याचे ठरविले आहे, तीचे वर्णन खालीलप्रमाणे....

गाव	मालक	भूमापन क्रमांक व उपविभाग	एकूण क्षेत्र हे.आर.	आकार (रु.पै.)
शेडाशी कातकरीवाडी	राधाबाई रघुनाथ पवार	१८/४२	०.१०.००	०.०६

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक २१/११/२०२६

बामा मारूती भला
रा.शेडाशी, पो.रानसई
ता.पेण,जि.रायगड ४०२१०७
फोन नंबर: ७७९८६९९८३७

जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे पुलाचीवाडी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

मौजे पुलाचीवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा. नं.	क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी)	आकार (रू.पै.)
२४	२/ब	१-७९-००	२.१४
		पो.ख. २-८२-००	
		एकुण क्षेत्र ४-६१-००	
		या पैकी लिहून देणार यांचे	०.२३
		क्षेत्र ०-१९-००	
		पो.ख. २-८२ ००	
		एकुण क्षेत्र ३-०१-०० या	
		पैकी दिलेले क्षेत्र २-६१-००	

वर वर्णन केलेल्या मिळकती आमच्या अशिलाच्या ताबेकब्जातील व वहिवाटी खालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारसह. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : २१/११/२०२६

ॲड.पराग मनोहर सावंत
राजलक्ष्मी कर्जत कोर्ट जवळ
ता कर्जत जि. रायगड ४१०२०१
मो. ९८३३४४५५३३

-: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे राजखलाटी ता. रोहा जि. रायगड येथीलः-

मालकाचे नांव	गट/ भुमापन क्र.	एकूण क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.	भोगवटा वर्ग
साधुराम रामचंद्र पवार खाता क्र.१००	१६९	२-८६-९० पैकी क्षेत्र ०-८०-००	५=६१ १=९७	१-खालसा/ गवतपड

वरील मिळकतींसंबंधात आमचे अशिल श्री. पराग मानसिंग गायकवाड,रा. खारघर, नवी मुंबई यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेकीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. हे कळावे,

दि. २१/११/२०२६

ॲड.रूचिता संतोष भगत
ॲडव्होकेट,
पत्ता : मौजे-मु.पो.पाली,
ता.सुधागड, जि.रायगड
मोबा.क्र.९८६०२४७७३९

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाच्या बिनशेती मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकती या पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.	क्षेत्र (आर.चौ.मी)	आकार (रु.पै.)	जमिन मालकांची नावे
चेंढरे, ता. अलिबाग,	९०/३/२/१४	०-५२-००	५.२०	श्री. देवेंद्र नंदकुमार पालवणकर
जि. रायगड	९०/३/अ/१५	०-८७-००	८.७०	श्रीमती. नम्रता अर्जुन मांडगे

अलिबाग,
दिनांक २०/११/२०२६

सही/-
ॲड. महेश सुहास म्हात्रे
B.A. LL. B. (MAH/5773 /2006)
Public Notary
Office: Ruturaj Plaza, Flat No. 1, Ground Floor, Shivaji Chowk, Near Gawade Optics, Alibag, Raigad 402 201. Contact No.: 09850042234/7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. संदीप दयाराम तायवाडे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकाकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णनः- मौजे - नालधे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील बिनशेती मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रू.	आकार पै.
१) श्री. अरुण चिंधु म्हसे २) श्री. अशोक रोनकचंद अगरवाल	२९	२/ब/२	३.७०.००	३७	००

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकती बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दि. २०/११/२०२६

मनोज किसन क्षिरसागर
(ॲडव्होकेट)
मु. सम्राट नगर, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. पिन कोड ४१०१०१

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे कडाव, ता.कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
६३	१/ड	०-२१-७०	०-२२

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २१/११/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर सदनिका माझे अशिल कु. मानसी प्रसन्ना रेडकर यांच्या मालकीची असून सदरची सदनिका विकण्याचे ठरविले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे चेंढरे, येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील स. नं. ४, हिस्सा नं. २, क्षेत्र ०-३४-९ हे.आर. पो ख ०-०२-५ हे.आर. एकूण क्षेत्र ०-३७-४ हे आर आकार -८.०६ रु. पै. पैकी प्लॉट नं. ४ क्षेत्र २८९ चौ मी आकार ५.८० रु.पै. या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''ॲकॉन्स ओरीयाना शालीराम को.ऑप. हौसिंग सोसायटी'' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०३, क्षेत्र २०.४७ चौ.मी. व बाल्कनी/सज्जा ९.०२ चौ. मी. हि मिळकत.

वर नमूद सदनिकेच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली नमूद पत्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची सदनिका निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर सदनिकेशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/११/२०२६

ॲड. रुपिका विजय पाटील
बी.एल.एस.एल.एल.बी.
पत्ता : ॲकॉन्स क्लासिक,
अलिबाग कोर्टच्यासमोर,
अलिबाग-रायगड
कॉल : ८२३७५३१४१४

अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

नोटीस

दावा क्रमांक ०१/२०२६

१. श्री. कल्पेश काशिनाथ कवळे
२. श्री. नितेश काशिनाथ कवळे
३. श्रीम. जयश्री जयवंत कवळे
४. श्री. निलेश जयवंत कवळे
५. श्री. रुपेश जयवंत कवळे
अ.क्र. १ ते ५ रा. लोणारे, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड — वादी/अर्जदार
६. श्रीम. रुपाली विलास नाईक
रा. तळवली, पो. खंडाळा, ता. अलिबाग, जि. रायगड
७. श्रीम. सिंधु गजानन पाटील
मु. लोणारे, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

१. श्रीम. रुक्मिणी गोपाळ महाडिक
२. श्रीम. शारदा आत्माराम घरत
३. श्री. अनिल आत्माराम घरत
४. श्री. सुनिल आत्माराम घरत
५. श्रीम. शलाका शैलेश गुरव
६. श्रीम. शैला दिनकर घरत
७. श्रीम. श्रद्धा अशोक राऊत
८. श्रीम. जुई जगदीश राऊत
९. श्रीम. सानिका निशांत शिंदे — प्रतिवादी/सामनेवाला
१०. श्री. प्रितम अमोल कुमामेकर
११. श्रीम. प्रतिक्षा दिनकर घरत
१२. श्रीम. भक्ती दिनकर घरत
१३. श्री. मधुकर भास्कर घरत
१४. श्री. परशुराम भास्कर घरत
१५. श्री. यशवंत भास्कर घरत
सर्व रा. थळ, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड

विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे जमिनीचे वर्णन

गावाचे नाव	ग.नं./स.नं.	क्षेत्र हेक्टर आर	आकार रूपये पैसे
मौजे मानतर्फे झिराड, ता. अलिबाग	६५/३	क्षेत्र ०-२१-१०	५.५१

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि. ११/०२/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०१/१२/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्याम उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १९/११/२०२६

सही/-
(विक्रम पाटील)
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
अलिबाग- रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे जांभिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक १.कस्तुरी हेमंत ठाणगे २. हेमंत सूर्याजी ठाणगे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर/ प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौ.मी	आकार रु. पै.
८६	३७	३४४-००	३४-४०

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१/११/२०२६

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक भाग्यश्री विकास गायकवाड यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे- आर-पॉ)	आकार (रू.पै)
४६	२	०-२३-००	१-२०

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/११/२०२६

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफिस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे हातोंड, ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

मालकाचे नाव	गट.क्र.	एकूण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी.	आकार रू. पै.
१) मिना सुहास मोरे २) सुरेंद्र दत्तात्रय चौंडणकर	३६६	ला.यो. २.५९.०० पोट ख.०.२८.०० एकुण २.८७.०० (मिना सुहास मोरे यांच्या मालकीच्या क्षेत्रापैकी ४० गुंठे क्षेत्र)	१.६२

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त, वहिवाट, भाडेकरार, मृत्युपत्रान्वये हक्क, पोटगी अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

-सही-
ॲड. सोनाली गंगाधरे शहासने
''सीता-सदन'' वाकण, पो.पाटणसई,
ता.- रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो.क्र. ७७७५८९०४५५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की मौजे-दामत ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे. आर. पा.	आकार रू. पै.
१) सिमिन मोबीन खोत	२११	१/अ/१	०-१२-६	१.२५

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

पनवेल महानगरपालिका

वैद्यकीय आरोग्य विभाग
कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.
दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.:०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जाहिर सुचना

पनवेल महानगरपालिका अंतर्गत कार्यरत आरोग्य केंद्रामध्ये अत्याधुनिक हवा निर्जंतुकीकरण यंत्रणा खरेदीस व कार्यन्वीत करणेकामी एजन्सीची नेमणुक करण्यात येणार आहे. याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने याकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	मुदत
१	पनवेल महानगरपालिका अंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, व आपला दवाखानामध्ये अत्याधुनिक हवा निर्जंतुकीकरण यंत्रणा खरेदीस व कार्यन्वीत करणेकामी बाजारभाव (Market Rate) मागविणेबाबत	२०.११.२०२६ ते २७.११.२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

सविस्तर जाहिर सुचना पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

- सही --
(अभिषेक पराडकर)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- दामत, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे. आर. पा.	आकार रू. पै.
१) मंजुनाथ व्ही आचार्य	६४	०	१-२६

निवडक

संस्कृत भाषा संरक्षण अभियान

अलिबाग : संस्कृत भाषेचे संरक्षण व संवर्धन करण्यासह भारतीय संस्कृतीतील या प्राचीन भाषेचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संस्कृतभारतीच्या वतीने अलिबागमध्ये विशेष जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते १४ डिसेंबरदरम्यान अलिबाग येथील रामजी देवस्थान, रामनाथ राम मंदिर येथे दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. संस्कृतचा सन्मान हा भारताचा सन्मान आणि संस्कृतचे संरक्षण हे भारतीय संस्कृतीचे संरक्षण हा संदेश या अभियानातून दिला जाणार आहे. तरी अलिबाग व परिसरातील नागरिक, संस्कृतप्रेमी आणि भाविकांनी ५ ते १४ डिसेंबरदरम्यान सायंकाळी ५ ते ७ या वेळेत रामनाथ राम मंदिर येथे उपस्थित राहून या जनजागृती अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्कृत भारतीच्या वतीने करण्यात आले आहे.

संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

अलिबाग : संस्कृत भाषेचे संरक्षण, संवर्धन आणि दैनंदिन व्यवहारात तिचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने संस्कृतभारतीच्या वतीने अलिबाग येथे दहा दिवसीय संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२६ या कालावधीत अलिबाग येथील श्री रामजी देवस्थान, रामनाथ राम मंदिर येथे दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हा वर्ग आयोजित करण्यात येणार आहे. संस्कृत ही केवळ प्राचीन ग्रंथांची भाषा नसून ती सहजपणे बोलता येणारी आणि दैनंदिन व्यवहारात वापरता येणारी भाषा आहे, हे प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या माध्यमातून नागरिकांना अनुभवता यावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या संभाषण प्रशिक्षण वर्गात सहभागी होणाऱ्या नागरिकांना संस्कृत भाषेत संवाद साधण्याचे प्राथमिक ज्ञान दिले जाणार आहे. सोप्या शब्दांचा वापर, दैनंदिन जीवनातील संभाषण, प्रश्नोत्तरे आणि विविध प्रसंगांमध्ये संस्कृतमधून संवाद कसा साधावा, याचे मार्गदर्शन केले जाणार आहे.

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई



खांदा कॉलनी : पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पनवेल वाहतूक पोलिसांनी गुरुवारी जोरदार कारवाई केली. वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहनचालकांसह रिक्षाचालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. या चौकात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. अनेक वाहनचालक वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून मनमानी पद्धतीने वाहने चालवत असल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त म्हणजेच पाच-पाच प्रवाशांना बसवून प्रवास केला जात असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवत दुचाकी,चारचाकी आणि रिक्षांची तपासणी केली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये एकच खळबळ उडाली. प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या रिक्षाचालकांवर तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर अशी कारवाई सातत्याने सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. केवळ विशेष मोहिमेपुरती कारवाई मर्यादित न ठेवता शहरातील प्रमुख चौकांमध्ये नियमित तपासणी करावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

कामोठ्यात चोरट्यांचा धुमाकूळ

पनवेल: कामोठे सेक्टर ९ परिसरात चोरट्यांनी एकोच रात्री धुमाकूळ घालत दोन घरे आणि एका ज्वेलर्स दुकानाला लक्ष्य केले. मारुती आंगण सोसायटीतील दोन घरांचे दरवाजे फोडल्यानंतर चोरट्यांनी समोरील रामेश्वर कॉम्प्लेक्समधील मराठा ज्वेलर्स दुकान फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. एकाच रात्री घडलेल्या या घटनांमुळे परिसरातील रहिवासी आणि व्यापाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.चोरट्यांनी सर्वप्रथम मारुती आंगण सोसायटीतील रूम क्रमांक १०१ आणि १०२ या दोन घरांना लक्ष्य केले. गॅस कटरच्या साहाय्याने दरवाजांच्या कड्या तोडून कुलूप बाहेर काढण्यात आले. त्यानंतर घरांमध्ये प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन घरांना लक्ष्य केल्यानंतर चोरट्यांनी सोसायटीसमोरील रामेश्वर कॉम्प्लेक्समधील मराठा ज्वेलर्स दुकान गाठले.दुकानाच्या सुरक्षेसाठी बसवलेले लोखंडी ग्रिल गॅस कटरने कापून चोरट्यांनी शटर उचकटले आणि दुकानात प्रवेश केला. दुकानातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन त्यांनी पळ काढला. चोरी केल्यानंतर चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर स्प्रे मारून ते निकामी करण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे चोरीचा माग काढणे पोलिसांसमोर आव्हान ठरण्याची शक्यता आहे. सकाळी व्यापारी दुकान उघडण्यासाठी आले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. गॅस कटरचा वापर करून चोरट्यांनी घरांचे दरवाजे आणि दुकानाचे ग्रिल कापल्याने ही चोरी पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

पुण्याच्या तहानेसाठी मुळशीचे पाणी

माणगाव,रोह्यातील बळीराजा संकटात
लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाची गरज



| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव आणि रोहा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करणाऱ्या काळ प्रकल्पाच्या पाण्यावर आता संभाव्य संकटाचे सावट निर्माण झाले आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी धरणातील सुमारे सात टीएमसी पाणी पुण्याच्या पिण्यासाठी वळविण्याबाबत हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर भविष्यात रायगडच्या वाट्याला येणाऱ्या पाण्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. अद्याप पाणीपुरवठा बंद होण्याचा निर्णय झालेला नसला, तरी भविष्यातील संभाव्य परिणाम लक्षात घेता लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि शेतकऱ्यांनी आतापासूनच जागरूक होण्याची गरज आहे.

पुणे जिल्ह्यातील मुळशी धरणातून मोठ्या जलवाहिन्यांद्वारे पाणी भीरा आणि रवाळजे येथील जलविद्युत प्रकल्पांमार्गे कुंडलिका नदीत सोडले जाते. पुढे कोलाडजवळील डोलवहाल बंधाऱ्यात हे पाणी अडवून काळ प्रकल्पाच्या डाव्या आणि उजव्या कालव्याद्वारे माणगाव व रोहा तालुक्यातील शेतीसाठी उपलब्ध करून दिले जाते. या पाण्याचा उपयोग शेतीबरोबरच पिण्यासाठी आणि पशुधनासाठीही होतो.

एकेकाळी उन्हाळ्यात पाण्याअभावी ओसाड दिसणाऱ्या शेतांमध्ये आज भातशेती, कलिंगड आणि भाजीपाल्याची हिरवीगार पिके डोलताना दिसतात. काळ प्रकल्पाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जातून बाहेर पडण्यास मदत झाली. घरच्या घरी शेतीत रोजगार मिळू लागला आणि गुरांसाठी चारा उपलब्ध झाला. कोकण कृषी विद्यापीठाच्या अभ्यासातूनही सिंचनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे स्पष्ट झाले होते. मुळशी धरणातील पाण्याचा वापर वाढविण्याच्या प्रस्तावांचा भविष्यात रायगडच्या सिंचनावर काय परिणाम होईल, याचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

माणगाव आणि रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा, पशुधनाचा आणि उन्हाळी शेतीचा प्रश्न याच्याशी जोडलेला आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना रायगडच्या पाण्याच्या गरजांचा विचार झाला पाहिजे. काळ प्रकल्पाची सिंचन क्षमता सुमारे ७,९६५ हेक्टर इतकी असूनही उपलब्ध माहितीनुसार १९८९-९० पर्यंत प्रत्यक्ष सिंचनाखाली आलेले क्षेत्र ३,५८० हेक्टर होते. आजही उन्हाळी शेतीकडे शेतकऱ्यांचा कल कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

आधुनिक शेतीला प्रोत्साहन द्या

आधुनिक शेतीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. काळ प्रकल्पाचे पाणी हा केवळ सिंचनाचा विषय नाही; तो माणगाव-रोह्यातील शेतकऱ्यांच्या जगण्याचा, त्यांच्या मुलांच्या भविष्याचा आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. त्यामुळे पाण्याबाबत संभाव्य निर्णय होण्यापूर्वीच लोकप्रतिनिधींनी शासनदरबारी ठोस पाठपुरावा करावा. कारण पाणी गेले तर केवळ शेती कोरडी पडणार नाही, तर अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधारही धोक्यात येऊ शकतो.

इलेक्ट्रिक स्कूटरला आग

वाहतूक पोलिसांच्या तत्परतेने अनर्थ टळला

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल येथील पंचमुखी हनुमान मंदिरासमोर धावत्या इलेक्ट्रिक स्कूटरने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. भररस्त्यात स्कूटरला आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे काही काळ नागरिक आणि वाहनचालकांमध्ये घबराट निर्माण झाली. घटनास्थळी इतर वाहनचालकांसह नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

यावेळी बीट मार्शल क्रमांक २ च्या कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक युवराज येळे आणि महिला पोलीस शिपाई पूनम कसबे यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाणी आणि अग्निशमन यंत्राचा वापर करत स्कूटरला लागलेली आग आटोक्यात आणली. तसेच संबंधित स्कूटरचालकाला आवश्यक ती मदत केली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे आग अधिक पसरण्याचा संभाव्य धोका टळण्यास मदत झाली. या घटनेत वाहतूक पोलिसांनी दाखविलेली समयसूचकता, प्रसंगावधान आणि कर्तव्यतत्परता विशेष कौतुकास्पद ठरली आहे.

जंजिरा किल्ल्यात प्रवेश शुल्क माफ

पर्यटकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत



| आगरदांडा | प्रतिनिधी |

जागतिक वारसा सप्ताहानिमित्त ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी पुरातत्त्व विभागाकडून प्रवेश शुल्क माफ करण्यात आले. या उपक्रमाचा शेकडो पर्यटकांनी लाभ घेतला. यावेळी किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी प्रितेश जाटव, कल्याण कुमारांनी किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

यावेळी पुरातत्त्व संशोधन विभागाचे सहायक संवर्धक बजरंग येलीकर यांनी जागतिक वारसा सप्ताहाचे महत्त्व विशद केले. आपल्या ऐतिहासिक वास्तू, संस्कृती आणि वारसा यांचे सौंदर्य टिकवून ठेवणे तसेच त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

ऐतिहासिक वास्तू आणि वारसा स्थळे आपल्याला हजारो वर्षांपूर्वीच्या इतिहासाची ओळख करून देतात. मात्र, विविध कारणांमुळे या वास्तूंचे नुकसान होत आहे. त्यामुळे त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जातो, असेही येलीकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सकाळपासूनच जंजिरा किल्ला पाहण्यासाठी लहान मुलांसह अंदाजे एक हजार पर्यटकांनी किल्ल्याला भेट दिल्याची माहिती पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी जाटव यांनी दिली.

दिव्यांग दिनानिमित्त वैद्यकीय तपासणी

अलिबाग : जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड रायगड ॲक्टिव्हिटी सेंटर, अलिबागच्या वतीने दृष्टिहीन व्यक्तींसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवार, १ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून आरसीएफ वसाहत कुरूळ येथील रायगड ॲक्टिव्हिटी सेंटरमध्ये पार पडणार आहे. जिल्ह्यातील दृष्टिहीन मुले, मुली, महिला आणि पुरुषांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिकमाहितीसाठी ८५५२८३७३८३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दारूच्या नशेत दगडाने मारहाण

पनवेल: दारूच्या नशेत झालेल्या वादातून तरुणाला दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना कामोठे सेक्टर ३५ येथे घडली. याप्रकरणी पावसकर आणि त्याच्या अनोळखी साथीदाराविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंकज धनराज रा. कामोठे यांच्याशी ओळखीचा पावसकर आणि त्याच्या मित्राने दारूच्या नशेत वाद घातला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी पावसकर याने हातातील दगडाने धनराज यांच्या आणि कपाळावर प्रहार केल्यामुळे जखमी झाला. या प्रकरणी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पाष्टीच्या सार्वजनिक विहिरीची दुरवस्था

ग्रामस्थांना दूषित पाण्याचा आधार



| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील मांदाटणे ग्रामपंचायत हद्दीतील पाष्टी कुणबीवाडी आणि पाष्टी बौद्धवाडी या दोन वाड्यांसाठी एकमेव सार्वजनिक पाण्याचा स्रोत असलेली विहीर सध्या अत्यंत नादुरुस्त व धोकादायक अवस्थेत आहे. ग्रामपंचायतीकडून यापूर्वी डागडुजी करून ही विहीर वापरात ठेवण्यात आली होती. मात्र, आता अचानक विहिरीचा खालचा भाग कोसळून पाण्यात पडल्याने ग्रामस्थांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

विहिरीचा काही भाग दररोज हळूहळू कोसळत असून त्यामुळे विहिरीतील पाणी मोठ्या प्रमाणात गढूळ होत आहे. पर्यायी पाण्याची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्याने दोन्ही वाड्यांतील नागरिकांना नाइलाजाने याच गढूळ पाण्याचा वापर करावा लागत आहे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या गंभीर परिस्थितीची पाहणी पंचायत समितीचे सभापती बबनजी मनवे यांनी केली असून ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी नवीन विहीर बांधण्याबाबत त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात जिल्हा परिषदेकडे मागणीचा प्रस्तावही सादर करण्यात आला आहे.

संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पाष्टी कुणबीवाडी आणि पाष्टी बौद्धवाडी येथील नागरिकांसाठी तातडीने पर्यायी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी दोन्ही वाड्यांतील ग्रामस्थांकडून होत आहे.

रिलायन्सविरोधात उपोषण सुरूच



| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे परिसर गुजरातमधील जामनगर सारखा विकसित करून देणाऱ्या रिलायन्स कंपनी प्रशासनाचा खरा चेहरा हळूहळू समोर येऊ लागला आहे. रिलायन्स कंपनीकडून नागोठण्यात ७० हजार कोटी रुपयांच्या नवीन विस्तारित प्रकल्पाचे काम सुरू असतानाच वरवठणे गावातील शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी वरवठणे येथील मिनी टाउनशिप समोर उपोषणाचे हत्यार उपसले आहे. शुक्रवारी (दि.२०) रोजी उपोषणाचा पाचवा दिवस उजाडूनही कंपनी व्यवस्थापन व प्रशासनाने उपोषण सोडविण्यासंदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेतली नसल्याने उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली आहे.

तीन रिलायन्स व एल ॲण्ड टी कंपनीचे ३,५०० कामगार मिनी टाऊनशिपमध्ये वास्तव्यास असून त्यांच्या वापरातील सांडपाणी व मलमूत्रमिश्रित पाणी शेतात जात असल्याने शेतीचे नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांचा आरोप आहे. तसेच मिनी टाऊनशिपमधील सांडपाणी तलावात येत असल्याने तलावाची स्वच्छता करावी, गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून द्यावा आदी विविध प्रलंबित मागण्यांसाठी ग्रामस्थांनी १६ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. यात गणपत म्हात्रे, किशोर म्हात्रे, मोरेश्वर म्हात्रे, देवीचंद भोय, धर्मा म्हात्रे, रमेश म्हात्रे, कृष्णा म्हात्रे हे ग्रामस्थ उपोषणाला बसले आहेत. मागण्या मान्य करून त्याबाबत लेखी आश्वासन द्यावे, अन्यथा आमरण उपोषण सुरूच राहील, असा ठाम इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. दरम्यान, काही उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

■ उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

जिल्ह्यात तुळशी विवाहाची लगबग

बाजारात पूजेच्या साहित्याची खरेदी सुरू



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

हिंदू धर्मातील मंगलमय सोहळा मानल्या जाणाऱ्या तुळशी विवाहाची तयारी आता पनवेलमध्ये सुरू झाली आहे. शनिवारी एकादशीचा सोहळा संपन्न होताच तुळशी विवाहाच्या धार्मिक विधींना सुरुवात होणार असल्याने शहरातील बाजारपेठांमध्ये लगबग पाहायला मिळत आहे. पनवेलमधील परिसरात तुळशी विवाहासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

तुळशी विवाह म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून भारतीय संस्कृतीतील परंपरा, श्रद्धा आणि मंगलमय वातावरणाचा सुंदर संगम मानला जातो. घराघरांत तुळशी वृंदावनाची सजावट करून तुळशीचा विवाह भगवान विष्णूच्या स्वरूपातील शाळिग्राम किंवा श्रीकृष्णाशी लावला जातो. या सोहळ्यासाठी महिलांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे.

बाजारात तुळशी विवाहासाठी आवश्यक असलेला ऊस, बोर, आवळा, फळे, फुले, हार, हळद-कुंकू, अक्षता तसेच पूजेचे विविध साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. त्याचबरोबर लग्नसोहळ्याप्रमाणे तुळशी वृंदावनाभोवती सजावट करण्यासाठी लागणाऱ्या मांडवाच्या मांडोळ्या आणि इतर सजावटीच्या साहित्यालाही मागणी वाढली आहे.

तुळशी विवाहासाठी ऊसाचा मांडव उभारण्याची परंपरा अनेक घरांमध्ये आजही जपली जाते. तुळशी वृंदावनाला आकर्षक सजावट करून दिव्यांची रोषणाई केली जाते. विवाह सोहळ्याप्रमाणे तुळशीला साडी, दागिने आणि फुलांनी सजवले जाते. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने मंगलाष्टकांच्या गजरात विवाह सोहळा पार पडतो.

विशेष म्हणजे, शहरातील आधुनिक जीवनशैलीतही नागरिकांनी आपल्या धार्मिक परंपरा जपल्या आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांमध्ये या सोहळ्याबाबत उत्साह दिसून येतो. अनेक कुटुंबांमध्ये तुळशी विवाहानंतर शुभकार्य आणि विवाह सोहळ्यांच्या मुहूर्तांना सुरुवात करण्याची परंपरा आहे.

एकीकडे दिवाळीचा उत्साह ओसरत असताना तुळशी विवाहाच्या निमित्ताने पुन्हा एकदा घराघरांत मंगलमय वातावरण निर्माण होणार आहे.

तीन दिवसांत ६५० घरांचे सर्वेक्षण | बालकांसह महिला, प्रौढांच्या आरोग्य तपासणी

खांदाडमध्ये कावीळचा धोका कायम

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शहरातील खांदाड परिसरात कावीळच्या रुग्णांची नोंद होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्वेक्षण आणि वैद्यकीय तपासणी मोहीम अधिक तीव्र केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न केवळ काही रुग्णांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेशी जोडला गेल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी खांदाड आणि सिद्धी नगर परिसरातील ६५० हून अधिक घरांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. दोन स्वतंत्र वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली असून, आशा सेविकाही घरोघरी जाऊन नागरिकांची आरोग्यविषयक माहिती संकलित करत आहेत. ताप, सर्दी, अशक्तपणा, डोळे पिवळे होणे तसेच कावीळची संभाव्य लक्षणे असलेल्या नागरिकांची माहिती घेतली जात आहे. संशयित आणि बाधित रुग्णांच्या संपर्कात राहून आवश्यक वैद्यकीय तपासणी केली जात आहे. उपचार घेत असलेल्या काही रुग्णांचे रक्ताचे नमुने पुढील तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.



याशिवाय काही बाधित रुग्ण खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेत असल्याची माहितीही पुढे आली आहे. १८ नोव्हेंबर रोजी एका तरुणाने ताप आणि सर्दीच्या त्रासामुळे रुग्णालयात उपचार घेतल्याचे समजते. त्यामुळे केवळ शासकीय रुग्णालयातील नोंदींवर अवलंबून न राहता खासगी रुग्णालयांतील रुग्णांची माहितीही एकत्रित करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कावीळच्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर बालकांबरोबरच महिला, तरुण, प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिकांचीही काळजीपूर्वक तपासणी होणे गरजेचे आहे. परिसरात सध्या वास्तव्यास नसलेल्या; मात्र याच भागातील रहिवासी असलेल्या आणि अन्य ठिकाणी उपचार घेत असलेल्या रुग्णांची माहितीही संकलित करणे आवश्यक आहे. यामुळे प्रत्यक्ष बाधितांची संख्या, आजाराचा संभाव्य प्रसार आणि त्यामागील कारणांचा शोध घेण्यास मदत होऊ शकते.

दरम्यान, आरोग्य विभागाचे सर्वेक्षण सुरू असले तरी नागरिकांनीही ताप, उलट्या, मळमळ, अशक्तपणा, डोळे किंवा त्वचा पिवळी पडणे अशी लक्षणे दिसल्यास विलंब न करता वैद्यकीय सल्ला घ्यावा. उकळून थंड केलेले किंवा सुरक्षित पाणी प्यावे आणि परिसरातील स्वच्छतेची काळजी घ्यावी.

स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज

कावीळच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, जलवाहिन्यांची स्थिती, सांडपाणी वाहिन्या, गटारांची स्वच्छता आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे. पिण्याच्या पाण्यात दूषित घटक मिसळण्याची शक्यता आहे का, याची शास्त्रीय पद्धतीने तपासणी करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय तातडीने राबविण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



बरे झाले, मोदी बोलले

नरेंद्र मोदी यांनी उद्योगपतींना कानपिचक्या दिल्या आहेत. निमित्त होते फिक्की या उद्योगपतींच्या संघटनेला शंभर वर्षे पूर्ण होत असल्याचे. तुम्हाला म्हणजे उद्योगपतींना कितीही सवलती द्या, तुमची भूक काही भागत नाही अशा शब्दात त्यांनी टीका केली. सरकारने गेल्या बारा वर्षात कॉर्पोरेट टॅक्स तीस टक्क्यांवरून २२ टक्क्यांवर खाली आणला पण उद्योगांमधील रोजगार वाढले नाहीत असे ते म्हणाले. मध्यमवर्गीयांवरची प्राप्तिकराची मर्यादा बारा लाखांपर्यंत वाढवली, पण तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांचे पगार वाढवले नाहीत असेही त्यांनी ऐकवून दाखवले. मोदीजी तुम्ही काहीतरी करा, आम्ही बघतो असेच तुमचे धोरण राहिले अशी टीका त्यांनी केली. मोदी सत्तेत येऊन बारा वर्षे झाली. मधल्या काळात भारताने किती उत्तुंग प्रगती केली याचे ढोल वाजवून झाले. भारत हा जगातली पाचवी मोठी अर्थव्यवस्था असल्याचे सांगून झाले. आता मोदींना एकाएकी ही जाग आली म्हणावे की आता वास्तव टाळणे अशक्य झाले असे म्हणावे हे ठरवावे लागेल. यातले काहीही झाले असले तरी एक गोष्ट नक्की आहे, विकास झाला असे जे काही मोदी आणि मोदींचे भक्त सांगतात तो एका ठराविक वर्गाचा झाला आहे. अदानी, अंबानी आणि मंडळींना कितीही सवलती दिल्या तरी त्यांचे पोट भरत नाही याचाच दुसरा अर्थ ते गब्बर होताहेत आणि सामान्य माणसे तशीच पिचत पडली आहेत. त्यांच्या वाट्याला तो तथाकथित विकास आलेला नाही. ज्या कंपनीचा फायदा शंभर कोटी आहे तिला पूर्वी तीस कोटी रुपये कर द्यावा लागत होता. तो आता बावीस कोटीच द्यावा लागतो. शिवाय मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील कंपन्यांना हा कर आणखी कमी म्हणजे केवळ १५ टक्के आहे. याचा फायदा अनेक कंपन्यांनी नव्या मॅन्युफॅक्चरिंग कंपन्या कागदावर निर्माण करून उचलला आहे. बड्या कंपन्यांचे त्रैमासिक नफेच कित्येक हजार कोटींच्या घरात असतात. त्यांचा एकूण कर किती वाचत असेल याची कल्पना केलेली बरी.

नफे गेले कुठे

कर कमी झाल्याने कंपन्यांकडे जो हजारो कोटींचा निधी शिल्लक राहील तो नव्या उद्योगधंद्यात गुंतवला जाईल व त्यातून रोजगार निर्मिती होईल अशी मूळ कल्पना होती. जनतेला सांगण्यासाठी तरी हेच कारण होते. प्रत्यक्षात असे अजिबात घडले नाही. कंपन्यांकडे शेकडो कोटींचे जनरल रिझर्व्हज किंवा तत्सम रुपात पैसा पडून आहे. किंवा अनेक कंपन्यांनी तो रियल इस्टेट किंवा मालमत्ता बाजारात गुंतवला आणि नफ्याची वेगळीच कुरणे शोधली. यातून रियल इस्टेट मार्केट तापले व तिथले भाव गगनाला भिडले. मुंबई, पुण्यासारख्या ठिकाणीच नव्हे तर अलिबाग, पेणमधील घरेही सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली. अन्य काहींनी हा पैसा वेगवेगळ्या मार्गाने देशी आणि परदेशी शेअर बाजारात गुंतवला. कोरोनानंतर शेअर बाजारांना जे उधाण आले त्यात या वाचवलेल्या कॉर्पोरेट टॅक्समधील पैशांनी उद्योगपतींनी हात धुवून घेतले. मोदी सरकारला हे दिसत किंवा कळत नव्हते असे म्हणायचे असेल तर मोदींचे मंत्री व अधिकारी तद्दन नालायक आहेत असे म्हणावे लागेल. आणि हे सगळे दिसत असूनही मोदी सरकार इतके दिवस त्यावर गप्प असेल तर ते सरळसरळ लबाडी करत होते असा निष्कर्ष काढावा लागेल. आता गोष्टी अगदी गळ्याशी आल्या आहेत. देशातील रोजगार वाढत नाही हे उघड आहे. ग्रामीण बेरोजगारीचा दर बारा टक्क्यांच्या आसपास आहे. शहरांमधील रोजगार म्हणजे झोमॅटो किंवा स्विगीसारखे स्कूटरवरचे हमाल आहेत. त्याने कोणाचेच भले होत नाही. यात पैसे फार नाहीत. शिवाय यात प्रगतीच्या काही शक्यता नाहीत हे तरुणांच्या लक्षात येऊ लागले आहे. आयटी क्षेत्रात एआयचा बागुलबुवा दाखवून रोजगार कापले जात आहेत. नवी भरती जवळपास ठप्प आहे. मेट्रो आणि बुलेट ट्रेनचे कितीही गोडवे गायले तरी त्यात प्रवास करण्यासाठी पैसे नसतील तर काय करणार याची जाणीव होऊ लागली आहे. मोदी सरकार या आघाडीवर सपशेल अपयशी ठरले आहे. आता हा दोष उद्योगपतींचा आहे असे भासवून ते आपली सुटका करून घेऊ पाहत आहे.

राहुल मात्र देशद्रोही

गंमत अशी की याच दरम्यान राहुल गांधींच्या एका भाषणावरून भाजपवाले त्यांना शिव्या घालत आहेत. अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये केलेल्या भाषणांमध्ये राहुल यांनी भारतीय अर्थव्यवस्था कुंठित झाली असून रोजगार बंद झाले आहेत. त्याचाच परिणाम म्हणून जेन झी आंदोलन करीत आहेत असे विश्लेषण केले होते. त्यावर राहुल हे परदेशात भारताची बदनामी करत आहेत अशी टीका भाजपच्या प्रवक्त्यांनी केली. मोदी हे राहुल यांच्यापेक्षा वेगळे काहीच सांगत नाहीत. फरक इतकाच की, राहुल हे विरोधात आहेत आणि मोदी सत्तेत. त्यामुळे उद्योगपती सवलती घेऊनही रोजगार निर्माण करीत नसतील तर त्याची सरकार म्हणून जबाबदारी मोदींवर आहे. शिवाय इतके दिवस विकासाच्या नावाखाली ते जनतेला फसवत होते काय असाही प्रश्न निर्माण होतो. याला दुसरीही एक बाजू आहे. निव्वळ कॉर्पोरेट टॅक्स कमी झाला किंवा जीएसटी सुसूत्र झाला म्हणून लगेच गुंतवणूक वाढेल व उद्योग उभे राहतील असे होत नाही. याच सरकारने मेक इन इंडिया नावाच्या कार्यक्रम खाली शेकडो कोटींची प्रसिध्दी केली. पण गुंतवणूक वाढली नाही. भारतीय कंपन्या भारतात अधिक गुंतवणूक का करत नाहीत असा सवाल अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अनेकदा जाहीरपणे विचारला आहे. याला आपल्या सरकारची धोरणे जबाबदार आहेत याकडे त्या सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. आज देशातील बहुतेक महत्वाचे उद्योग, परवाने, कंत्राटे अदानी किंवा तत्सम लोकांकडे जातील अशी व्यवस्था केली जात आहे. यात कोणतीही पारदर्शकता उरलेली नाही. शिवाय सरकारही मूलभूत संशोधन किंवा तंत्रज्ञानाला महत्व देण्याऐवजी गोमूत्र, वैदिक ज्ञान अशांच्याच मागे आहे. शेअर बाजार उसळणे म्हणजे अर्थव्यवस्था उत्तम असे व्यापारी समीकरण सरकारला सोईचे वाटते. २०२४ च्या निवडणुकांचे निकाल आपल्या बाजूने लागतील अशा आत्मविश्वासाने अमित शहा लोकांना सांगत काय होते तर बाजार वर जाणार आहे, गुंतवणूक करा. म्हणजे सामान्य गुजराती धंदेवाला आणि मोदी, शहा यांच्या दृष्टिकोनात काही फरकच उरलेला नाही. गंमत म्हणजे शहा यांचा अंदाज चुकला आणि भाजपच्या ६० जागा कमी झाल्या. मोदींनी कालच्या भाषणात स्वदेशीचे महत्व पुन्हा एकवार ठळकपणे सांगितले. औषध उद्योगांमध्ये भारत अग्रेसर असला तरी त्याचा कच्चा माल आपण ८० टक्के चीनमधून आयात करतो. लोखंड निर्यात करून पोलादाची किंवा बॉक्साईट निर्यात करून अल्युमि नियमची आयात करतो अशी उदाहरणे त्यांनी दिली. मुद्दा असा आहे की विरोधक हेच गेली दहा वर्षे ओरडून सांगत आहेत पण त्यांना देशद्रोही ठरवले जात आहे. ही स्थिती सुधारण्यासाठीची धोरणे आखणे ही सरकार म्हणून मोदींची जबाबदारी आहे. मोदी काल जे बोलले ते बरेच झाले. एका दृष्टीने त्यांनी आपल्या अपयशाची कबुली दिली. आता इथून पुढे तरी ते आपली धोरणे बदलतील अशी आशा ठेवायची का हे ज्याचे त्याने ठरवावे.

विचार

आंदोलनांची लाट अन 'रिजिम चेंज'चे वास्तव

श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमध्ये जनक्षोभाने सत्ता उलथवून लावली. भारतातही 'नीट' किंवा 'सीईसी'सारख्या मुद्द्यांवरून 'रिजिम चेंज'चे अर्थात राजवट उलथवण्याचे कयास बांधले जात आहेत, मात्र रस्त्यावरील असंतोष आणि लोकशाही व्यवस्थेमध्ये मूलभूत फरक असतो. विखुरलेला विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाची सत्तेवरील मांड पाहता भारतात असे सत्तांतर घडणे अशक्यप्राय तसेच राजकीयदृष्ट्या अतिशयोक्तीपूर्ण वाटते.

शिवाजी कराळे

दक्षिण आशियाच्या राजकीय पटलावर गेल्या काही वर्षांमध्ये घडलेल्या घडामोडींनी जगभराचे लक्ष वेधून घेतले. श्रीलंकेमध्ये आर्थिक दिवाळखोरी आणि महागाईविरुद्ध पेटलेला वणवा थेट राष्ट्रपती भवनात शिरला आणि राजपक्षे घराण्याला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. बांगलादेशमध्ये नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या मुद्यावरून सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने रौद्र रूप धारण केले आणि १५ वर्षांहून अधिक काळ निर्विवाद सत्ता गाजवणाऱ्या शेख हसीना यांना अवघ्या काही तासांमध्ये देश सोडून पलायन करावे लागले. नेपाळमध्येही राजेशाहीच्या अंतानंतर सातत्याने रस्त्यावरील दबावातून आणि राजकीय अस्थिरतेतून राजवटी बदलत राहिल्या. शेजारच्या या तीन देशांमधील घडामोडींचे समान सूत्र म्हणजे रस्त्यावरील जनक्षोभाने घडवून आणलेले रिजिम चेंज अर्थात सत्ता उलथवून लावण्याची ताकद. या पार्श्वभूमीवर, आज भारतातही 'नीट' परीक्षेतील गैरव्यवहारांचा मुद्दा असो वा मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या नव्या नियमांवरून उठलेला गदारोळ; तरुण आणि नागरिक रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. या आंदोलनांची तीव्रता पाहता, सम ाजमाध्यमांवर आणि काही राजकीय वर्तुळात 'शेजारील देशांप्रमाणे भारतातही रस्त्यावरील आंदोलनांतून सत्ता उलथवून टाकली जाईल का?' अशी कुजबूज आणि 'रिजिम चेंज'ची भाषा सुरू झाली आहे. विरोधक आक्रमक आहेत. तरुणांमध्ये भविष्याची चिंता आहे आणि व्यवस्थेवर अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे; मात्र वरवर दिसणारे हे साम्य प्रत्यक्षात खरे आहे का, शेजारील देशांतील रस्त्यावरील क्रांतीचे प्रारूप भारतात लागू पडू शकते का या प्रश्नांचे वस्तुनिष्ठ राजकीय विश्लेषण आवश्यक आहे.

श्रीलंका, बांगलादेश किंवा नेपाळ यांच्याशी भारताची तुलना करताना सर्वात मूलभूत चूक केली जाते, ती म्हणजे भारताच्या लोकशाही परिपक्वतेकडे दुर्लक्ष करणे. भारतात लोकशाही ही केवळ संविधानाच्या पानांवर नाही, तर ती इथल्या मातीत आणि सामान्य माणसाच्या जगण्यात मुरली आहे. १९४७ नंतर देशाने अनेक तीव्र आंदोलने अनुभवली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील आणीबाणीविरोधी आंदोलन असो, आसाममधील विद्यार्थी आंदोलन असो, आरक्षणविरोधी मंडल आंदोलन असो वा अण्णा हजारेंचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन; भारतातील कोणत्याही आंदोलनाने संविधानाची चौकट मोडून सत्तापालट केला नाही. इथे रस्त्यावर झालेला विरोध अखेर मतपेटीच्या माध्यमातूनच व्यक्त होतो. न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, संसद आणि प्रसारम ाध्यमे यांच्यावर कितीही टीका होत असली, तरी या संस्थांची स्वायत्तता पूर्णपणे संपलेली नाही. संकटसमयी देशाची न्यायव्यवस्था किंवा संसद एका मर्यादेपलीकडे हुकूमशाही प्रवृत्तींना लगाम घालू शकते, हा विश्वास आजही कायम आहे. बांगलादेश किंवा श्रीलंकेमध्ये संस्थात्मक रचना कम कुवत होती, तिथे एकाच कुटुंबाची किंवा पक्षाची सर्वकष एकाधिकारशाही तयार झाली होती आणि लष्कर किंवा बाह्य घटकांची भूमिका निर्णायक होती. भारतात सैन्याचे राजकारणापासून पूर्ण अलिप्त राहणे हा लोकशाहीचा सर्वात मोठा संरक्षक कणा आहे. त्यामुळे येथे हिंसक गर्दीच्या जोरावर संसद किंवा पंतप्रधानांचे निवासस्थान ताब्यात घेऊन सत्ता बदलणे अशक्यप्राय आहे.

रिजिम चेंजसाठी केवळ असंतोष पुरेसा नसतो, तर त्या असंतोषाला दिशा देणारा आणि सत्तेची पोकळी भरून काढणारा एक समर्थ, सर्वमान्य राजकीय पर्याय जनतेसमोर असावा लागतो. श्रीलंकेत किंवा बांगलादेशमध्ये सत्ता उलथवल्यानंतर युनूस यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यक्तिमत्त्व किंवा विरोधी पक्ष तातडीने पुढे आले. भारतात आज वस्तुस्थिती काय आहे? केंद्रातील भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला आव्हान देऊ शकेल असा एकसंध चेहरा किंवा राष्ट्रीय पर्याय सध्याच्या विरोधी गोटात दिसत नाही. काँग्रेसने लोकसभेत आपल्या जागा वाढवून काही प्रमाणात ताकद दाखवली असली, तरी संपूर्ण देश एकत्र बांधू शकेल असा सर्वसमावेशक नेता म्हणून राहुल गांधींची स्वीकारार्हता अजूनही सर्व राज्यांमध्ये सिद्ध झालेली नाही. त्याहून मोठी समस्या म्हणजे विरोधकांमधील 'बेकी'. 'इंडिया' आघाडी निवडणुकीच्या काळात कागदावर एकत्र दिसली, तरी राज्य पातळीवर या पक्षांचे आपापसातील अंतर्विरोध उघडे पडत असतात. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल आणि डावे-काँग्रेस समोरासमोर आहेत, केरळमध्ये काँग्रेस विरुद्ध डावे असा संघर्ष आहे. दिल्ली-पंजाबमध्ये आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांच्यात छुपे द्वंद्व चालू असते. सत्तेचा मुद्दा जनतेसमोर येतो, तेव्हा लोक नेहमी तुलनात्मक विचार करतात. मोदी नसतील तर कोण, हा प्रश्न विचारला जातो, तेव्हा विरोधकांकडे एका नावावर एकमत नसते. पंतप्रधानपदासाठी विरोधकांमध्ये डझनभर महत्त्वाकांक्षी नेते आहेत.

अशा विस्कळीत, अंतर्गत कलहाने ग्रासलेल्या आणि केवळ सत्तेच्या समीकरणासाठी एकत्र आलेल्या आघाडीला देशाची सत्ता सोपवण्याइतपत जनतेचा विश्वास बसलेला नाही. एका समर्थ आणि विश्वासार्ह पर्यायाशिवाय रस्त्यावरील आंदोलनांचे रूपांतर राष्ट्रीय राजकीय क्रांतीत होत नसते. सध्या सुरू असलेली आंदोलने ही मुख्यतः विद्यार्थ्यांच्या आणि परीक्षा व्यवस्थेच्या भवितव्याशी निगडित आहेत. 'नीट'म धील पेपरफुटी आणि गैरव्यवहाराने लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, यात तिळमात्र शंका नाही. तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीतून सरन्यायाधीशांना वगळण्याच्या सरकारी निर्णयाने लोकशाही संस्थांच्या निष्पक्षपातीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या मुद्द्यांवरून उठलेला आवाज रास्त आणि संविधानाने दिलेला हक्क आहे; परंतु राजकीयदृष्ट्या विचार केल्यास, कोणतीही राजकीय व्यवस्था बदलण्यासाठी जनआंदोलनाचा वेग किंवा 'टेम्पो' दीर्घकाळ टिकून राहावा लागतो. लोकसभेच्या निवडणुका पार पडून नुकताच नवा कार्यकाळ सुरू झाला आहे. पुढील सार्वत्रिक निवडणुकांसाठी अद्याप मोठा कालावधी बाकी आहे. विद्यार्थी आणि तरुण रस्त्यावर उतरले तरी परीक्षेचे नवे वेळापत्रक जाहीर झाले. न्यायालयाने काही दिलासा दिला किंवा शिक्षण व्यवस्थेत काही प्रशासकीय बदल झाले की विद्यार्थ्यांचे लक्ष पुन्हा अभ्यासाकडे वळते, हा समाजशास्त्रीय नियम आहे. कोणतेही नागरी आंदोलन अनेक वर्षे रस्त्यावर जिवंत ठेवणे अशक्य असते. कारण सामान्य नागरिकाला आपल्या रोजच्या उदरनिर्वाहाची लढाई लढायची असते. पुढील अडीच-तीन वर्षे हा असंतोष असाच खदखदत ठेवणे विरोधकांच्या संघटनात्मक ताकदीच्या पलिकडचे आहे.

आंदोलनांकडे केवळ जनक्षोभ म्हणून न पाहता सत्ताधारी पक्ष आणि त्यांचा वैचारिक आधारस्तंभ असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याकडे कसे पाहतो, हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भाजप आणि संघ परिवाराची केडर-आधारित यंत्रणा ही भारताच्या राजकारणातील सर्वात मजबूत आणि शिस्तबद्ध रचना आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले त्यांचे जाळे कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असते. सध्या सुरू असलेल्या आंदोलनांच्या विरोधात सत्ताधारी गोटातून अतिशय पद्धतशीरपणे 'नॅरेटिव्ह' तयार केले जात आहे. देशात सुरू असणारी आंदोलने ही उत्स्फूर्त नसून भारताची आर्थिक प्रगती रोखण्यासाठी आणि स्थिर सरकार अस्थिर करण्यासाठी रचलेला 'आंतरराष्ट्रीय कट' असल्याचे ठसवले जात आहे. जॉर्ज सोरोस यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय उद्योगपतींचा हस्तक्षेप, परदेशी विद्यापीठांमधील डाव्या विचारसरणीचे गट आणि देशाबाहेरून होणारा संशयास्पद निधीपुरवठा असे मुद्दे वारंवार पुढे आणले जात आहेत. आंदोलनाला 'देशविरोधी शक्तींचा कट' किंवा 'टूलकिट'चा भाग म्हणून चित्रित केले जाते, तेव्हा देशातील मध्यमवर्ग आणि राष्ट्रभक्त नागरिक सावध होतो. हिंदुत्ववादी संघटनांची समाजमाध्यमांवरील पकड एवढी घट्ट आहे, की ते कोणत्याही अस्सल समस्येचे रूपांतर राष्ट्रवाद विरुद्ध राष्ट्रद्रोह अशा संघर्षात करण्यात निष्णात आहेत. शेजारील देशांमध्ये सत्ताधाऱ्यांकडे अशा प्रकारची प्रचंड वैचारिक, सांस्कृतिक आणि संघटनात्म क ढाल नव्हती. ती आज भारतातील सत्ताधारी पक्षाकडे उपलब्ध आहे. त्यामुळे जनतेच्या मनातील रोषाला वैचारिक वळण देऊन बोथट करणे सत्तेला सहज साध्य होते.

'नीट' आणि 'सीईसी' विरोधातील आंदोलने ही भारतीय लोकशाहीच्या जिवंतपणाचे लक्षण आहेत. सत्ताधाऱ्यांना जमिनीवर आणण्यासाठी, त्यांच्या कारभाराला चाप लावण्यासाठी आणि प्रशासनाला जाब विचारण्यासाठी अशी आंदोलने आवश्यक असतात. किंबहुना, अशा दबावामुळेच सरकारला अनेकदा आपल्या निर्णयांचा फेरविचार करावा लागतो किंवा सुधारणा कराव्या लागतात; परंतु आंदोलनांचा उद्देश व्यवस्था सुधारायचा असतो; व्यवस्था उद्ध्वस्त करायचा नाही. शेजारील देशांप्रमाणे 'रिजिम चेंज'ची स्वप्ने पाहणे म्हणजे भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना आणि देशाची विविधता न समजण्यासारखे आहे. भारतात रस्त्यावरील दगडफेकीतून किंवा कार्यालये जाळून परिवर्तन येत नाही; ते मतदान केंद्रावरील शांत आणि गुप्त मतदानातून येते. आंदोलनांमधून निर्माण होणारा असंतोष विरोधकांना मतपेटीत रूपांतरित करता आला, जनतेसमोर एक सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय उभा करता आला, तरच सत्तेत बदल घडू शकतो. अन्यथा, विखुरलेले विरोधक, सत्ताधाऱ्यांचे मजबूत संघटन, लोकशाही संस्थांचा पाया आणि निवडणुकांतील अंतर या कारणांमुळे शेजारील देशांचे अनुकरण करून भारतात 'रिजिम चेंज' घडवून आणण्याची भाषा केवळ दिवास्वप्न आणि राजकीय कल्पनाविलास ठरेल. लोकशाहीत सत्तेचा रस्ता रस्त्यावरून सुरू होऊ शकतो; पण तो पूर्ण संविधानाच्या आणि मतपेटीच्या मार्गानेच होतो.

चर्चा आजची

विकासाच्या नावाखाली मृत्यूचे सापळे!



राकेश लोहार

रस्ते विकासासाठी असतात की माणसांचे जीव घेण्यासाठी? अलिबाग-रेवदंडा मार्गावरील सध्याची परिस्थिती पाहिली की हा प्रश्न संतप्त मनातून उपस्थित झाल्याशिवाय राहात नाही. विकासाच्या नावाखाली रस्त्यांची कामे सुरू आहेत; मात्र त्या कामांमुळे नागरिकांच्या जिवाला निर्माण झालेल्या धोक्याची कोणालाही पर्वा नसल्याचे चित्र दिसत आहे. अवघ्या दोन दिवसांत दोन जीव गेले. एकीकडे वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेमुळे चिमुकल्या आरांशचा मृत्यू झाला, तर दुसरीकडे नागाव-खारगल्ली येथे रस्त्याच्या कामासाठी केलेल्या खोदकामामुळे प्रकाश भगत यांचा दुर्दैवी अंत झाला. दोन मृत्यू, दोन कुटुंबांचे उद्ध्वस्त झालेले संसार आणि तरीही यंत्रणेची जबाबदारी निश्चित करण्याची घाई कोणालाच नाही.

आरांशच्या मृत्यूने प्रशासनाला जाग यायला हवी होती. वाहतूक नियोजन, पर्यायी मार्ग, रस्त्याची सुरक्षितता आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना यांचा तातडीने आढावा घ्यायला हवा होता. मात्र, तसे झाले का? उलट, दुसऱ्या घटनेने पुन्हा एकदा या यंत्रणेचा बेजबाबदारपणा उघडा पाडला. नागाव-खारगल्ली येथे मातीच्या ढिगाऱ्याचा अंदाज न आल्याने प्रकाश भगत १५ ते २० फूट खाली कोसळले आणि त्यांना प्राण गमवावे लागले. रस्त्याचे काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा व्यवस्था होती का? धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावले होते का? रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्था होती का? वाहनचालकांना धोक्याची पूर्वसूचना देण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे एमएसआयडीसीने द्यायलाच हवीत.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अर्थात एमएसआयडीसीकडे रस्ते विकासाची जबाबदारी असेल, तर नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही त्याच व्यवस्थेची आहे. केवळ रस्ते खोदणे, काँक्रिट ओतणे आणि कामाची बिले काढणे म्हणजे विकास नव्हे. विकासाच्या कामात माणसांचे जीव सुरक्षित राहणे, ही प्राथमिक अट आहे. ठेकेदाराला काम देऊन एमएसआयडीसीने आपली जबाबदारी संपत नाही. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन होते की नाही, यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांचीच आहे. मग हे अधिकारी नेमके करतात काय? कार्यालयात बसून कामाच्या प्रगतीचे अहवाल पाहायचे आणि अपघात झाल्यानंतर चौकशीचे आदेश द्यायचे, एवढेच त्यांचे काम आहे का?

संबंधित ठेकेदारांची जबाबदारीही तितकीच गंभीर आहे. रस्त्याचे काम सुरू असताना खोदकाम, मातीचे ढिगारे, उघडे खड्डे आणि धोकादायक वळणे याबाबत नागरिकांना सावध करणे आवश्यक असते. त्यासाठी बॅरिकेड्स, सूचना फलक, रिफ्लेक्टर आणि रात्रीची प्रकाशव्यवस्था असणे गरजेचे आहे. हे नियम पाळले जात नसतील, तर संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई का होत नाही? नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा परवाना ठेकेदारांना कोणी दिला?

प्रशासनाची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात आहे. अपघात होण्याची वाट पाहून पंचनामे करणे आणि मृतांच्या कुटुंबियांना सहानुभूती व्यक्त करणे, एवढ्यापुरतीच प्रशासनाची जबाबदारी मर्यादित आहे का? सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि एम एसआयडीसी यांनी एकत्रितपणे रस्त्याच्या कामांची पाहणी करायला नको का? धोकादायक ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याचे आदेश देण्यासाठी आणखी किती मृत्यूंची वाट पाहणार?

विशेष म्हणजे, या दोन्ही घटनांकडे स्वतंत्र अपघात म्हणून पाहून चालणार नाही. त्या रस्त्याच्या कामाच्या नियोजनातील त्रुटी, सुरक्षा व्यवस्थेतील संभाव्य निष्काळजीपणा आणि प्रशासकीय देखरेखीच्या अभावाकडे निर्देश करतात. याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी अधिकारी आणि ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली पाहिजे. मृतांच्या कुटुंबियांना योग्य नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी तातडीने उपाययोजना केल्या पाहिजेत.

रस्ते चकचकीत झाले म्हणून विकास होत नाही; त्या रस्त्यावरून जाणारा सामान्य माणूस सुरक्षितपणे घरी पोहोचला, तरच तो खरा विकास! आरांशच्या कुटुंबाचा आक्रोश आणि प्रकाश भगत यांच्या कुटुंबाचे दुःख प्रशासनाच्या कानापर्यंत पोहोचणार आहे की नाही? एमएसआयडीसीला आणखी किती बळी हवेत? आणखी किती कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाल्यानंतर या यंत्रणेची झोप उडणार आहे? आता आश्वासनांची नव्हे, तर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची वेळ आली आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या या मृत्यूच्या सापळ्यांसाठी एमएसआयडीसी आणि संबंधित प्रशासनाला जनतेच्या संतापाला सामोरे जावेच लागेल.

लोकसंसद

मेट्रो स्थानकाचे नामांतर 'चैत्यभूमी दादर' असे व्हावे!

मुंबईचा केंद्रबिंदू आणि मध्य आणि पश्चिम रेल्वेचे मुख्य जंक्शन असलेले 'दादर' हे केवळ एक रेल्वे स्थानक नसून प्रत्येक मुंबईकराच्या आणि मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा व अस्मितेचा विषय आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सभांपासून ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील ऐतिहासिक आंदोलने आणि जाहीर सभांपर्यंत अनेक राजकीय चळवळींचे साक्षीदार राहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पार्क (शिवाजी पार्क) या मैदानाने अनेक खेळाडूंसह अजित वाडेकर, सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, सचिन तेंडुलकरसारखे महान खेळाडूही घडवले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, श्री शिवाजी मंदिर म्हणजे मराठी साहित्य आणि नाट्यरसिकांची पंढरीच! येथील अस्सल पारंपरिक मराठमोळ्या खाद्यसंस्कृतीमुळे दादरला मुंबईच्या सांस्कृतिक नकाशावर स्वतःची अशी एक खाद्य ओळख लाभली आहे. १९७० च्या दशकात माझे शालेय शिक्षण दादरमधील सुप्रसिद्ध 'छबिलदास शाळे'त झाले असल्यामुळे दादरशी माझे स्वतःचे अत्यंत घट्ट आणि भावनिक नाते आहे. माझ्यासारख्या असंख्य मुंबईकरांच्या पिढ्यांची जडणघडण या 'दादर' नावाच्या सावलीत झाली आहे. सध्या गगनचुंबी इमारतींच्या गर्दीत हरवलेल्या दादरने आपली मूळ ओळख, संस्कृती आणि जिव्हाळा आजही जपून ठेवला आहे. सरकारने आता दादर रेल्वे स्थानकाचे नाव बदलणार नसून, केवळ दादर मेट्रो स्थानकाचे नामकरण चैत्यभूमी करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. परंतु येथेही स्थानकाचे नाव 'चैत्यभूमी दादर' असे करण्यात यावे अशी नम्र विनंती व अपेक्षा आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

सगुण-निर्गुण एकचि पांडुरंग !

कार्तिकी एकादशी जिला प्रबोधिनी एकादशी किंवा देवउठनी एकादशी असेही म्हटले जाते. या दिवशी पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरात लाखो भक्त एकवटतात. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाला वारकरी प्रेमाने विठूमाऊली म्हणतात. आपल्या भक्तांच्या प्रेमाखातर पांडुरंग पंढरपुरात युगोनूयूगे अविरतपणे उभा आहे. भक्तांच्या हाकेला ओ देणारी आबालवृद्धांची ही माउली कधी भक्तांच्या घरी पाणी भरते, कधी त्यांचे दळण दळून देते. कधी त्यांच्या सासू सासऱ्यांची सेवा करते तर कधी त्यांच्या घरी चाकरीही करते. भक्तांच्या अधीन असलेली ही माउली आणि तिची वारकरी लेकरे ही महाराष्ट्रातील आगळे वेगळे नाते आहे. महाराष्ट्रासह कर्नाटकातही माउलीचे लाखो भक्त आहेत. कार्तिकी एकादशीला ते न चुकता पंढरपुरात येतात. पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत एकनाथ महाराज यांचे आजोबा संत भानुदास हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर', असे सांगितले. विठ्ठलााने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलााच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे. दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे,

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ नोव्हेंबर

१) श्री.प्रकाश सीताराम रानडे शिवलकर-नाका, अलिबाग दि. २१-११-१९४४

२)श्रीम.शामला शरद बोरवणकर विद्यानगर, अलिबाग दि.२१-११-१९४७

३)श्री.राजेंद्र भास्कर पवार वरसोली, ता.अलिबाग दि.२१-११-१९५५

४)श्री.कमलाकर महादेव ठाकूर श्रीबाग-२, अलिबाग दि.२१-११-१९४५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल



ई-रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

। कर्जत । प्रतिनिधी ।

माथेरान शहारत सध्या दिवाळी हंगाम सुरु असून पर्यटकांची चांगली गर्दी येथे आहे. अशाच एका ई-रिक्षामधून प्रवास करणाऱ्या महिला प्रवासी मोबाईल ई-रिक्षामध्ये विसरून गेल्या होत्या. मोबाईल हरवल्याचे महिला प्रवासी यांच्या लक्षात येताच त्यांनी माथेरान येथील हुतात्मा स्मारक येथे येऊन ई-रिक्षामध्ये मोबाईल फोन विसरला असल्याची माहिती दिली. दरम्यान एका तासाच्या आत ई-रिक्षा यांचा शोध लागल्यानंतर ई-रिक्षाचालक शैलेश भोसले यांच्या रिक्षात त्यांचा मोबाईल फोन आढळून आला. त्यानंतर हा मोबाईल ई-रिक्षाचालक भोसले यांनी गाडी पुन्हा हुतात्मा स्मारक येथे आणून संबंधित पर्यटक प्रवासी यांना त्यांचा किमती मोबाईल परत केला.

घनकचरा प्रकल्पाचा बोजवारा

■ गुंडगे परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कर्जत तालुक्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन गुंडगे येथे घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे. मात्र हा घनकचरा प्रकल्प सध्या बंद अवस्थेत असून, येथे ठेकेदाराचा मनमानी कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. एवढ्या मोठ्या प्रकल्पाचे कामकाज केवळ आठ कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू असल्याने संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे पसरलेल्या दुर्गंधीने स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.

कर्जत तालुका हा ग्रामीण भाग असल्याने दैनंदिन खरेदी-विक्रीसाठी तालुक्यातील नागरिक मुख्य केंद्रस्थानी असलेल्या कर्जत शहरात मोठ्या संख्येने येतात. परिणामी, कर्जत शहरात मोठ्या प्रमाणात कचरा साचतो. मात्र, हा कचरा उचलून त्याचे योग्य वर्गीकरण, प्रक्रिया आणि शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे नगरपालिकेला व संबंधित ठेकेदाराला सध्या शक्य होत नसल्याचे चित्र आहे. गुंडगे प्रकल्पाची अवस्था पाहता या घनकचरा प्रकल्पाचे केवळ कचऱ्याच्या डेपोत रूपांतर झाले असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रकल्प परिसरात साचलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया होत नसल्याने मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. संपूर्ण परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या अस्वच्छतेमुळे परिसरात लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, एकीकडे नगरपालिका स्वच्छ भारत अभियान राबवत असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे कर्जत शहर आणि गुंडगे परिसर कचऱ्याच्या विळख्यात अडकल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. या प्रकरणाबाबत कर्जत नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांना विचारणा केली असता 'मी रजेवर आहे, या संदर्भात मला कोणत्याही प्रकारची माहिती नाही', अशी प्रतिक्रिया त्यांच्याकडून देण्यात आली आहे.

कर्जत नगरपालिका प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून ठेकेदाराच्या कामाची चौकशी करावी, बंद अवस्थेत असलेला गुंडगे येथील घनकचरा प्रकल्प त्वरित सुरू करावा आणि आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करून कचऱ्याचे योग्य विलगीकरण व प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन दोषी ठेकेदारावर कारवाई करणार का, की घनकचरा प्रकल्पावरील हा बोजवारा असाच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ठेकेदाराचा मनमानीपणा

कर्जत नगरपालिकेच्या डम्पिंग ग्राउंडवरील अस्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. डम्पिंग ग्राउंडवरील ठेकेदाराचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप होत आहे. येथे केवळ आठ कर्मचारी कार्यरत असल्याने संपूर्ण कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. डम्पिंग ग्राउंड परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचलेले असून, या कचऱ्यामध्ये मोकाट जनावरे फिरत आहेत. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्याची व्यवस्था प्रभावीपणे होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बंद अवस्थेत असल्याने कचऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे.

> **गुंडगे येथील घनकचरा प्रकल्प हा गुंडगे गावासाठी डोकेदुखी ठरत आहे. या प्रकल्पाला आमचा पहिल्यापासून विरोध आहे. या प्रकल्पामुळे आमच्या गावात दुर्गंधी पसरली आहे. तसेच हा कचरा हवेद्वारे आमच्या गावात देखील येत आहे. यामुळे आमचे आरोग्यदेखील धोक्यात आले आहे.**
> **– वैशाली भोसले, कर्जत महिला शहराध्यक्ष, आरपीआय**



भात कापणी, मळणीच्या कामांना वेग

रत्नागिरी : यंदा पावसाची अनियमितता आणि बदलत्या हवामानामुळे भात पिकाच्या वाढीवर तसेच उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशा कमी झाल्याने शेतकरी आधीच आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. अशा परिस्थितीत पिकाची आणखी वाट न पाहता उपलब्ध झालेले भात वेळेत कापून घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. नुकसान अधिक वाढण्यापूर्वी शेतातील पीक सुरक्षित करण्यासाठी शेतकरी दिवसरात्र मेहनत घेत आहेत. भात कापणीबरोबरच मळणीच्या कामांनाही वेग आला आहे. शेतातील भात कापून त्याची मळणी करून धान्य घरात आणण्याची लगबग सुरू असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी सध्या पूर्णपणे शेतीच्या कामात गुंतले आहेत. ग्रामीण भागातील दैनंदिन व्यवहारांवरही शेतीच्या हंगामी कामांचा परिणाम दिसून येत आहे. दरम्यान, भात कापणीसाठी आवश्यक असलेल्या मजुरांची टंचाई शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण ठरत आहे. वेळेत मजूर उपलब्ध होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना स्वतःच कुटुंबीयांच्या मदतीने भात कापणीची कामे करावी लागत आहेत. त्यातच यंत्रसामग्री वापरण्यासाठी लागणाऱ्या इंधनाच्या दरात वाढ झाल्याने यांत्रिक पद्धतीने कापणी व मळणी करणेही खर्चिक ठरत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी खर्चाचा ताळमेळ साधण्यासाठी यंत्रसामग्रीचा वापर टाळून पारंपरिक पद्धतीने कामे करण्यास प्राधान्य देत आहेत.

पेण पोलीस ठाण्यात बालस्नेही कक्ष सुरू

■ बालकांच्या मनातील खाकी वर्दीची भीती होणार दूर

। पेण । प्रतिनिधी ।

लहान मुलांच्या मनातील पोलिसांबद्दलची भीती आणि दडपण दूर करून त्यांना मोकळेपणाने बोलते करण्यासाठी तसेच त्यांच्याकडून घडलेल्या घटनांची नेमकी माहिती मिळिवण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात बालस्नेही कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रम ांतर्गत रायगड जिल्ह्यातील सात पोलीस ठाण्यांमध्ये बालस्नेही कक्ष सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये पेण पोलीस ठाण्याचाही समावेश आहे.

पेण पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांच्या देखरेखीखाली हा बालस्नेही कक्ष सुरू करण्यात आला आहे.



या कक्षाच्या माध्यमातून बालकांना पोलीस ठाण्यात सुरक्षित आणि विश्वासपूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अनेकदा लहान मुले पोलिसांची खाकी वर्दी पाहून घाबरतात किंवा मनातील भीतीमुळे घडलेल्या प्रसंगाची माहिती मोकळेपणाने सांगू शकत नाहीत. ही भीती दूर करून बालकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास निर्माण करणे हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे.

विशेषतः बाल अत्याचारासारख्या संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासात बालकांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून योग्य माहिती मिळिवण्यास या उपक्रमाची मदत होणार आहे.

पनवेल रेल्वे पोलिसांची 'जीवन रक्षा' मोहीम

मानव साखळीद्वारे प्रवाशांमध्ये जनजागृती

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

रेल्वे रुळ ओलांडताना होणारे अपघात आणि त्यामध्ये जाणारे निष्पाप प्रवाशांचे बळी रोखण्यासाठी पनवेल रेल्वे पोलिसांनी गुरुवारी (दि.१९) 'जीवन रक्षा अभियान' राबविले. पनवेल रेल्वे स्थानकातील सीएसएमटी दिशेकडील फलाट क्रमांक २ व ३ परिसरात पोलिसांनी मानव साखळी तयार करून हातात जनजागृतीचे फलक आणि बॅनर घेत प्रवाशांना सुरक्षित रेल्वे प्रवासाचे महत्त्व पटवून दिले.

पनवेल रेल्वे स्थानकात काही प्रवासी वेळ वाचविण्याच्या नादात रेल्वे रुळ ओलांडून दुसऱ्या फलाटावर जाण्याचा धोकादायक मार्ग स्वीकारतात.



या निष्काळजीपणामुळे अपघात होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने गुरुवारी सकाळी १० ते ११.३० या वेळेत विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत तीन पोलीस उपनिरीक्षक, ३० पोलीस अंमलदार आणि आठ महिला होमगार्ड सहभागी झाले होते. पोलिसांनी मानव साखळी तयार करून प्रवाशांना रेल्वे रुळ ओलांडू नका, अवाजवी धाडस करू नका, तिकीट काढूनच प्रवास करा, रेल्वे प्रवासादरम्यान स्टंटबाजी टाळा, अशा सूचना दिल्या.

रेल्वे प्रवासादरम्यान कोणतीही अडचण किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास जीआरपीच्या १५१२ हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले. तसेच संशयास्पद वस्तूंना हात न लावता तातडीने रेल्वे पोलिसांना माहिती द्यावी, रेल्वे परिसर स्वच्छ ठेवावा आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच, वेळ वाचविण्याच्या प्रयत्नात जीव गमावण्यापेक्षा सुरक्षित मार्गाने प्रवास करणे महत्त्वाचे आहे, हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

निवडक



प्राथमिक आरोग्य केंद्राला औषधे भेट

बोर्लीपंचतन : गरजू रुग्णांना दर्जेदार औषधे मोफत व वेळेत उपलब्ध व्हावीत, या सामाजिक भावनेतून डॉ. राजेश पाचारकर यांनी बोर्लीपंचतन प्राथमिक आरोग्य केंद्राला विविध प्रकारच्या औषधांची भेट दिली. सन २०१८ सालापासून आरोग्य, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात डॉ. राजेश पाचारकर सातत्याने सक्रिय असून, या आरोग्य केंद्रालाही त्यांच्याकडून वेळोवेळी अशा प्रकारची मदत केली जात आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण उपक्रमामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा आधार मिळत आहे. या भेटीदरम्यान डॉ. राजेश पाचारकर यांनी उपस्थितांना सीपीआर अर्थात हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले. हृदयाचे ठोके किंवा श्वास बंद पडल्यास रुग्णाला तातडीने मदत कशी करावी, सीपीआर कसा द्यावा आणि अशा आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर प्रथमोपचार मिळण्याचे महत्त्व काय आहे, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या उपक्रमामुळे औषधांच्या मदतीसोबतच आरोग्यविषयक जनजागृतीलाही हातभार लागला. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सत्यभामा दुधाडे, डॉ. चंचल नागलकर, आरोग्य कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर आणि डॉ. राजेश पाचारकर मित्र फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

साईबाबांची पालखी मिरवणूक

पेण : श्री साईबाबांची मानाची पालखी मिरवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण तर्फे पालखी मिरवणुकीचे पेण शहरात अयोजन करण्यात आले होते. गुरूवारी (दि.१९) संपूर्ण पेण शहरात साईमय वातावरण झाले होते. पेण साई मंदिर कासार तलाव येथून सायंकाळी सात वाजता विद्युत रोषणाई, ब्रॉसबँड पथकाच्या संगीताच्या तालावर मिरवणुकीला प्रारंभ झाला. या मिरवणूक सोहळ्यामध्ये दोन चलचित्र रथ सामील झाले होते. यामध्ये साईबाबा रथ, द्वारकामाई रथ तसेच साईबाबा साकारलेले कलाकार यांचा विशेष समावेश होता. या रथ यात्रेमध्ये आ. अनिकेत तटकरे, कृषी सभापती वैकुंठ पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, सरपंच, ग्रामपंचायत सदस्या यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सामिल झाले होते. पेण साई मंदिरापासून सुरू होणारी मिरवणूक तेरा घरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळी आणि पुन्हा साई मंदिर येथे फिरवण्यात आली. या पालखी सोहळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात बचत गटांच्या महिलांनी सहभाग घेतला होता. सर्व महिलांचा एकच पेहराव असल्याने हा पालखी सोहळा अतिशय देखणा दिसत होता. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले होते. घरासमोर मिरवणूक आल्यानंतर प्रत्येक महिला आरती ओवाळून औक्षण करत होत्या. शेवटी साई बाबांच्या महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता झाली.

पनवेल महानगरपालिका
पाणी पुरवठा विभाग
नागरिकांना जाहीर आवाहन

दिनांक:- २०/११/२०२६

अल-निनोच्या प्रभावामुळे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या कालावधित पडणारे पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी झालेले आहे. धरणामधील उपलब्ध पाणी दि.३१/०८/२०२७ पुरविण्याचे निर्देश दि.०५/१०/२०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने धरणातील उपलब्ध पाणी दि.३१/०८/२०२७ पर्यंत पुरविण्याच्या नियोजनानुसार पनवेल शहरात सोमवार दि.२३/११/२०२६ रोजीपासून उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवडयातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ. क्र.	वार	उंच जलकुंभाचे ठिकाण	पाणीपुरवठा बंद राहणारा भाग	
१	सोमवार	१) मार्केटयार्ड उंच जलकुंभ २) भाजी मार्केट उंच जलकुंभ ३) चौकोनी टाकी (WTP)	संपुर्ण भाग बंद राहील संपूर्ण भाग बंद राहील १) पटेल पार्क, जैन मंदीर, गणपती मंदीर २) मामलेदार कचेरी ते दत्तराज सो., साठेगल्ली ते विरुपाक्ष मंदिर, सिटी स्टोअर, सिनीयर ज्यूनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल, गायकर गल्ली बैठे घर. शुभलाभ सो.ते सहयोग नगर, सुतिकागृह ते यशोमंगल सो., उमाशंकर सो. ते यशोवर्धन सो., आदर्श हॉटेल ते रत्नेश सो., कुबेर सो. ते शुभलाभ सो., धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथ नगर, मुनोथनगर ई विंग, पिन्स पॅराडाईज सो.. सनराईज सोसा. जोशी आळी ३) पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदिर, लक्ष्मी वसाहत.	१) माणिक नगर. अशोका गार्डन. केशवबाग, स्नेहसदन सो..यशोदिप, शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकरवाडा. गुढेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत. घाटेआळी, गावदेवी पाडा, परदेशी आळी, गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्रीलॉज पर्यंत, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल ते खुटकर मटण शॉप इत्यादी २)दांडेकर हॉस्पिटल ते श्री.अच्युत मनोरे घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल. परदेशी आळी बैठी घरे, रत्नारेसिडेन्सी सो. अष्टविनायक कॉलनी, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, यशोपुरम सो.. जूना पोष्ट बाजू, मुनोथ नगर A.B विंग ३) जयभारत नाका ते भिडे घरापर्यंत. गांगल वाडा, महाड बँक. आदर्श हॉटेल ते जयभारत नाका, गोडसे आळी, विरुपाक्ष मंदीर ते दगडी शाळा, मनिष मार्केट, अन्नपुर्णाते निसर्ग बिल्डींग त्रिमूर्ती सहनिवास, कापड बाजार, गोखले हॉल ते प्रज्ञा सो, रतन ऑकीन परिसर इत्यादी.
२	मंगळवार	१) पटेल मोहल्ला उंच जलकुंभ २) पायोनिअर उंच जलकुंभ	संपुर्ण भाग बंद राहील. पायोनिअर सोसायटी जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा व ठाणा रोड बंद राहील.	.....
३	बुधवार	१) एच ओ सी उंच जलकुंभ	संपुर्ण भाग बंद राहील.	.....
४	गुरुवार	२) ठाणा नाका उंच जलकुंभ	संपुर्ण साईनगर भाग बंद राहील.	.....
५	शुक्रवार	गोल टाकी (WTP)	मिडलक्लास हो. सोसा भाग-१ व २, एस के बजाज भाग बंद राहिल.	.....
६	शनिवार	गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ	तक्का गाव व कॉलनी भाग बंद राहील.	.....
७	रविवार		शहरातील सर्वभागात पाणीपुरवठा सुरू राहील.	शहरातील सर्वभागात पाणीपुरवठा सुरू राहील.

टिप :- उपरोक्त प्रमाणे उपलब्ध पाणीपुरवठयानुसार पाणी वितरणाच्या वेळेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येईल.

सही/-
कनिष्ठ अभियंता
पनवेल महानगरपालिका

सही/-
उप अभियंता (पापु)
पनवेल महानगरपालिका

पान १ वरुन

टोरंटवर सरकार मेहरबान

असा सवाल उपस्थित होत आहे.

गावांच्या यादीतही मोठी तफावत

पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीतील आणि महसूल विभागाच्या आदेशातील गावांच्या यादीतही विसंगती आहे. पर्यावरण मंजुरीत सहा गावांचा समावेश होता, तर महसूल विभागाच्या आदेशात सात गावांचा उल्लेख आहे. दोन्ही याद्यांमध्ये ढाक, साईडोंगर आणि पाली तर्फे कोतवाल खालाटी ही तीनच गावे समान आहेत.

नव्या आदेशात गोलवाडी, हेदवली, मांडवणे आणि सावळे या चार गावांचा समावेश करण्यात आला आहे. तर मूळ यादीतील पोटल, भालीवाडी आणि आंबोट ही गावे वगळण्यात आली आहेत. अतिरिक्त जमीन नेमकी कोणत्या कामासाठी आवश्यक आहे, याबाबतही स्पष्टता नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे. महसूल विभागाने विविध प्रकल्प घटक आणि पायाभूत सुविधांसाठी कंपनीने सादर केलेल्या अंदाजाच्या आधारे अटींसह मंजुरी दिल्याचे सांगितले आहे. मात्र, टोरंट कंपनीने यावर अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही.

टोरंट प्रकल्पाभोवती जमीन, जंगल आणि पर्यावरणीय मंजुरीचे प्रश्न अधिक गंभीर होत असताना सरकारकडून कंपनीला मिळणाऱ्या सवलतींचे समर्थन कशाच्या आधारावर केले जात आहे, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

न्यायालयीन लढाईकडे लक्ष!

वनहक्क कायद्यानुसार ग्रामसभांची संमती न घेता वनजमीन मंजूर केल्याचा दावा मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेत करण्यात आला आहे. त्यावर २६ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. तर २३३ हेक्टर वनजमीन हस्तांतराच्या आदेशाविरोधातील अपिलावर राष्ट्रीय हरित लवादाने सुनावणी मान्य केली असून, पुढील सुनावणी १७ डिसेंबरला होणार आहे.

मोहोपाडा स्मशानभूमीत अघोरी विधी?

चर्चा सुरू झाली आहे.

शुक्रवारी कै. डी.के. जोशी यांच्या निधनानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी नातेवाईक आणि नागरिक मोहोपाडा स्मशानभूमीत गेले होते. त्यावेळी परिसरात या संशयास्पद वस्तू पडलेल्या दिसून आल्या. मृत कोंबड्यासह नारळ, लिंबू, मडकी आणि शेंदूर असा प्रकार पाहून उपस्थित नागरिकही चक्रावले.

स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी अशा वस्तू कोणी आणि कोणत्या उद्देशाने ठेवल्या, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अघोरी विधी किंवा तोटका केल्याचा संशय व्यक्त होत असला, तरी या प्रकाराला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

दरम्यान, या प्रकाराची ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेऊन स्मशानभूमीची पाहणी करावी आणि वस्तू ठेवणाऱ्यांचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. स्मशानभूमीतील या विचित्र वस्तूंचे गूढ उकलणार का, याकडे मोहोपाडावासियांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीचा जीआर गायब

समावेश करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नोव्हेंबरमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने महसूल, कृषी आणि ग्रामपंचायत विभागामार्फत संयुक्त पंचनामे करण्यात आले. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतीची नोंद घेण्यात आली.

पंचनाम्यावेळी शेतकऱ्यांकडून केवायसी आणि बँक खात्यांचे तपशीलही घेण्यात आले. त्यामुळे नुकसानभरपाई मिळण्याची आशा निर्माण झाली होती. मात्र, उपसमितीच्या निर्णयानंतर आवश्यक असलेला शासन निर्णय अद्याप निघालेला नाही. परिणामी, पंचनामे होऊनही शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा झालेली नाही.

विशेष म्हणजे, भातपीक शेतातच करपून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कर्जाचा डोंगर आणि शेतीचा खर्च यामुळे शेतकरी आधीच संकटात असताना शासनाच्या निर्णयातील दिरंगाईने त्यांची कोंडी झाली आहे.

लग्नाच्या आमिषाने १४ तरुणींचे लैंगिक शोषण

याप्रकरणी गुन्हा दाखल होताच आरोपी मोहम्मद माजिन हा कायद्याच्या कचाट्यातून वाचण्यासाठी परदेशात पळून गेला होता. महाराष्ट्र पोलिसांच्या विनंतीनंतर सीबीआयच्या इंटरपोल विभागाने त्याच्याविरोधात 'रेड नोटीस' जारी केली होती. या नोटीसच्या आधारे यूएईच्या अधिकाऱ्यांनी त्याचा शोध घेऊन त्याला अटक केली. या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वीच सक्षम न्यायालयात आरोपपत्र देखील दाखल केले आहे.

कोकणच्या 'हापूस'वर गुजरातचा डोळा

आंबा बागायतदारांची चिंता वाढली आहे.

भारतात १२ ते १५ आंबा प्रजातींना जीआय टॅग मिळाला आहे. यात महाराष्ट्रातील कोकणचा हापूस, मराठवाडा केसर, गुजरातचा गीर केसर, उत्तर प्रदेशचा मलिहाबादी दशेहरी, रतौल आंबा, गोव्याचा मानकुराद आंब्यांचा समावेश होतो.

'वलसाड आंबा' नावाने विका

गुजरातला 'हापूस'चे मानांकन मिळू नये. त्यांनी त्यांच्या आंब्याला 'वलसाड आंबा' म्हणून विकावे. 'कोकणचा हापूस' हे मानांकन आमच्या शेतकऱ्यांसाठी अबाधित राहावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. गरज पडल्यास हायकोर्ट ते सुप्रीम कोर्टापर्यंत लढायची कोकणी शेतकऱ्यांची तयारी आहे.

नाट्यकर्मी प्रभाकर पाटील यांचे निधन

वाघ्रण : ज्येष्ठ नागरिक नाट्यकर्मी प्रभाकर पांडुरंग पाटील यांचे बुधवारी (दि.१८) सकाळी ७ वाजता वृद्धापकालीन निधन झाले. ते ९७ वर्षांचे होते. त्यांच्यावर दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रभाकर पाटील प्रथम नारंगी व थळ प्राथमिक शाळेत अध्यापक होते. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेत ते शिक्षक होते. ते वाघ्रणच्या धुरंधर संगीत नाट्यमंडळात पूर्वी स्त्री पात्र भूमिकांसाठी तालुक्यात प्रसिद्ध होते. एकच प्याला या राम गणेश गडकरी लिखीत नाटकात तळीराम हि भूमिका गाजवली होती. त्यांचे उत्तरकार्य रविवारी (दि.२९) श्री. क्षेत्र भुवनेश्वर येथे होणार आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

अ. क्र.	नोड व संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र./ हिस्सा क्र.	संपादित क्षेत्र (हे.आर.)	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्य:स्थिती
					जि. रायगड			
१	उलवे ३१३	गव्हाण ७२	८९/८	०-२८-३	२५० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. २८६ सेक्टर-१९, क्षेत्र- २५० चौ.मी.	**कै. कासम अलीसाब शेख (मयत) यांचे वारस** श्री. आशरब कासम शेख श्री. निसार कासम शेख श्री. रमझान कासम शेख	आर.सी.एस. क्र.५६३/२०१२
२	नावडे १०७	४क/२४	८९/३	०-२६-३	२५० चौ.मी.	भुखंड क्र.१३५, सेक्टर-NPII, क्षेत्र-२५० चौ.मी.	**कै. जनार्दन काशिनाथ खुटारकर (मयत) यांचे वारस** १) श्रीम. वनाबाई जनार्दन खुटारकर, २) श्री. राम जनार्दन खुटारकर ३) चंद्राकांत जनार्दन खुटारकर ४) कांता गोविंद म्हात्रे ५) रंजना मुकुंद माळी	निरंक
			एकुण क्षेत्र	**०-२६-३**				
३	नावडे ७९	११८	४०/३	०-१३-१	१०० चौ.मी.	भुखंड क्र.१५३A, सेक्टर-NPII, क्षेत्र-१०० चौ.मी.	१. श्री. जोमा नारायण खुटारकर २. श्रीम. चांगुणाबाई विठ्ठल पाटील ३. श्रीम. हौसा दशरथ म्हात्रे	निरंक
			एकुण	**०-१३-१**				
४	पेंधर	४ब	८४/० ९०/० ९३/० ५४/१पै ५५/० ५६/० ५७/१पै ५७/२	०-२७-१ ०-४४-३ १-११-८ ०-१२-० ०-१५-४ ०-१८-५ ०-८५-४ ०-२-०	एकूण १२१५० चौ.मी. पैकी हिस्सेवाटणी नुसार १९५० चौ.मी.	तळोजा येथे भुखंड क्र. ६५C, सेक्टर-१७, क्षेत्र-१९५० चौ.मी.	मो. इस्माईल अब्दुल लतीफ पटेल	एकूण १२१५० चौ.मी. मंजुर पात्रतेपैकी मा.न्यायालयीन दिवाणी दावा क्र.७६/२०२१ मधील दि.२२.०४.२०२१ रोजीच्या तडजोड पुरशीस आदेशाप्रमाणे मो. इस्माईल अब्दुल लतीफ पटेल यांच्या हिस्स्यास येणारी १९५० चौ.मी. पात्रता
				३-१६-५				
५	पेंधर	४क	१००/० १०४/०पै १०५/० १०८/०पै ८९/०	०-८६-३ ०-४०-२ ०-५७-३ ०-०९-९ ०-५८-०				
				२-५१-७				
६	पेंधर	४अ	८१/० ८७/० ८८/० १०२/० ५७/३पै	२-०४-९ ०-६८-५ ०-२०-४ ०-८९-८ ०-२७-०				
				४-१०-६				
७	पेंधर	४ड	९१/० ९२/०	१-९९-३ १-८०-१				
				३-७९-४				
८	तळोजा	३८	७३/१	०-३०-०				
९	तळोजा २६६	पेंधर ४६	२०३/१ २४६/२	०-६४-७ १-२२-७	१६०० चौ.मी. पात्रतेपैकी २५० चौ.मी.	भुखंड क्र.८४, सेक्टर-२३, क्षेत्र-२५० चौ.मी.	**कै. काशिनाथ काना करावकर (मयत)** यांचे वारस **१.१) कै. अरूण काशिनाथ करावकर (मयत) यांचे वारस** १.१.१) श्री. कुणाल अरूण करावकर १.१.२) श्री. अतुल अरूण करावकर १.१.३) श्री. महेंद्र अरूण करावकर १.१.४) श्रीम. महादी अरूण करावकर **१.२) कै. बबन काशिनाथ करावकर (मयत) यांचे वारस** १.२.१) श्रीम. मैना बबन करावकर १.२.१) सौ. सपना बबन करावकर उर्फ सपना राजेश शेळके १.२.३) श्री. स्वप्नील बबन करावकर १.२.४) श्री. अलंकार बबन करावकर १.३) श्री. राजु काशिनाथ करावकर	मा.दिवाणी न्यायालयात वरिष्ठ स्तर पनवेल येथे दाखल एस.सी.एस ३४५/२०११ मधील दि.०५.०८.२०१६ रोजीचा आदेश विरोधात मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश अलिबाग रायगड यांचे न्यायालयात दाखल दिवाणी सिव्हील अपिल क्र.१७६/२०१६ व दिवाणी सिव्हील अपिल क्र.४३६/२०१९ या प्रलंबित दाव्यांना अधिन राहून
			एकुण	**१-८७-४**				
१०	तळोजा-१०९२	तळोजा -पेंधर १/२००८	२५६/४अ २६०/१ २६४/८	०-८५-० १-१४-० १-६८-०	एकूण ३२०० चौ.मी पात्रता	एकूण ३२०० चौ.मी. पात्रतेपैकी सी.सी. मधील २/३ हिस्सेवाटणीनुसार भूधारकांना मंजूर १०५० चौ.मी. पात्रतेकरीता इरादीत भुखंड क्र.२३/२, सेक्टर-१८, क्षेत्र-१०५० चौ.मी. वाटपपूर्व मान्यतेसाठी प्रस्तावित.	**अर्जुन मारूतीराव कदम मयत तर्फे वारस** श्रीम. अन्नपूर्णा अर्जुन कदम, श्री. अमोल अर्जुन कदम श्री. ओमकार अर्जुन कदम	मा.दिवाणी न्यायालयात वरिष्ठ स्तर पनवेल येथे दाखल एस.सी.एस १७४/२०२५ या दाव्यास आधिन राहून
			एकुण क्षेत्र	**३-६७-०**				
			२५०/३	०-२४-०	सदर सर्व्हे क्र.२०० चौ.मी. पात्रता	एकूण ३२०० चौ.मी. पात्रतेपैकी सी.सी. मधील २/३ हिस्सेवाटणीनुसार १०५० चौ.मी. पात्रता आणि सर्व्हे क्र.२५०/३ ची २०० चौ.मी. पात्रता अशी एकत्रितरीत्या मंजूर १२५० चौ.मी. पात्रतेकरीता भूधारकांना इरादीत भुखंड क्र.४९, सेक्टर-५, क्षेत्र-१२५० चौ.मी. वाटपपूर्व मान्यतेसाठी प्रस्तावित	**वसंत मारूतीराव कदम मयत यांचे वारस** श्रीम. विजया वसंतराव कदम, श्री. संजय वसंत कदम सौ. वंदना सुरेंद्र पवार	
			एकूण क्षेत्र	**०-२४-०**				
११	तळोजा-१०३८	पेंधर १/२००८	२५४/३अ+३ब+४/२	०-४०-५	३५० चौ.मी.	भुखंड क्र.१८, सेक्टर-५, क्षेत्र-३५० चौ.मी.	**कै. लक्ष्मण अर्जुन पाटील (मयत) यांचे वारस** १) श्री. कचरु लक्ष्मण पाटील, २) श्रीम. मंजुळा अरुण पाटील ३) श्रीम. नंदा मारुती पाटील	--
			एकूण क्षेत्र	**०-४०-५**				
१२	२१६०	नागांव II/७	८४/१ब	१-०५-१	९०० चौ.मी.	नोड- द्रोणागिरी, सेक्टर-६५, भूखंड क्र.३३, क्षेत्र- ९०० चौ.मी. प्रस्तावित	मुळभूधारक **१) श्री.गिरीजा जानक्या कातकरी व गोपीबाई उर्फ गोपिका जानक्या कातकरी (मयत)** यांचे CMA NO. १९५/२०१४ नुसार वारस १:१) श्री. लक्ष्मण जानक्या कातकरी १:२) श्रीमती गिरीजाबाई विक्रम नाईक, **२) कै. हनुमंत जानक्या कातकरी (मयत)** यांचे CMA NO. १६४/२०२४ नुसार **वारस** २:१) श्री. हरेश हरेश्वर हनुमंत कातकरी २:२) श्रीमती गौराबाई हनुमंत कातकरी २:३) श्रीमती राधा रवि वाघे २:४) श्रीमती वासंती प्रकाश वाघमारे २:५) श्रीमती जयवंती संतोष नाईक **३) श्रीमती गयनाबाई पांडुरंग नाईक (मयत)** यांचे CMA NO. ४१/२०२२ नुसार **वारस** ३:१) श्री. नामदेव पांडुरंग नाईक, **४) श्री. राम जानक्या कातकरी व श्रीमती सुमन राम कातकरी (मयत) यांचे वारस श्री. ज्ञानेश्वर राम कातकरी (मयत)** यांचे CMA NO. १६५/२०२४ नुसार **वारस** ४:१) श्रीमती सोनी ज्ञानेश्वर कातकरी ४:२) कु. नयन ज्ञानेश्वर कातकरी ४:३) श्रीमती वैष्णवी ज्ञानेश्वर कातकरी ४:४) श्रीमती शेवंती सत्यवान नाईक ४:५) श्रीमती सुनिता दत्ताराम वाघमारे यांची नावे घोषित केलेली आहेत.	भूधारक १) श्री. लक्ष्मण जानक्या कातकरी २) श्रीमती गिरीजाबाई विक्रम नाईक ३) श्री. हरेश उर्फ हरेश्वर हनुमंत कातकरी ४) श्रीमती गौराबाई हनुमंत कातकरी ५) श्रीमती राधा रवि वाघे ६) श्रीमती वासंती प्रकाश वाघमारे ७) श्रीमती जयवंती संतोष नाईक ८) श्री. नामदेव पांडुरंग नाईक ९) श्रीमती सोनी ज्ञानेश्वर कातकरी १०) कु. नयन ज्ञानेश्वर कातकरी ११) श्रीमती वैष्णवी ज्ञानेश्वर कातकरी १२) श्रीमती शेवंती सत्यवान नाईक १३) श्रीमती सुनिता दत्ताराम वाघमारे यांची एकूण पात्रता ९०० चौ.मी. पात्रता मंजूर असून, मंजूर पात्रतेपोटी ९०० चौ.मी. पात्रता वाटप करणेकामी प्रस्तावित आहे.
			एकूण क्षेत्र	**१-०५-१**				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
मुख्य भूमी व भूमापन विभाग (१२.५%), सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३०७/२०२६-२७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे माणगांव तर्फ वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे. आर. पा.	आकार रू. पै.
१) संदेश तुकाराम आखाडे	९४	१/प	०-७६-७ पो.ख. ०-०४-३ पैकी स्वत:चे हिस्साचे दिलेले क्षेत्र ०-१६-०	४.७५

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

शुद्धीपत्रक

तमाम जनतेस या शुद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दैनिक कृषीवल या वर्तमानपत्राच्या तारीख २०/११/२०२६ रोजीच्या अंकाच्या पान नं.२ वर मौजे खार पेढांबे, ता. अलिबाग येथील गट नं. १३३ या मिळकतीसंदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहीर नोटीसीच्या मिळकतीचे वर्णनाच्या तिसऱ्या व चौथ्या तक्त्यात मिळकतीचे क्षेत्र व आकार या मध्ये टंकलेखनाची चुकी झाली आहे. तरी सदर मौजे खार पेढांबे, ता. अलिबाग येथील गट नं.१३३ या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार
खारपेढांबे	१३३	०-३८-५० पो.ख. ०-०५-५० ०-४४-००	रु.५.६९

जाहीर नोटीसीतील उर्वरीत मजकुर जसाच्या- तसा वाचण्यात यावा.

अलिबाग
ता. २१/११/२०२६

ॲड. विधान अरविंद पाटील
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मनुलाल लखनलाल बैठा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर. पॉ.)	आकार रु पैसे
३३/३/अ	एकुण क्षेत्र ०-८९-५० हे आर पॉ	१-०५
३४/२/ड	एकुण क्षेत्र ०-६१-७० हे आर पॉ	१-०९
३५/१/अ	एकुण क्षेत्र ०-४६-६० हे आर पॉ	१-७१

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २०/११/२०२६

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.भालचंद्र कमलाकर कदम यांच्याकडुन त्यांचा हिस्सा कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात विद्यमान मालक व आमचे अशिलांचा कोणताही लेखी करारनामा झालेला नाही.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन व उपविभाग क्र	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रू.पै)
थळ ता.अलिबाग	१५८/२	०-३४-९० पो.ख ०-०१-०० एकुण क्षेत्र ०-३५-९०	७.८१

वर नमुद मिळकतीपैकी श्री भालचंद्र कमलाकर कदम यांच्या मालकीचे ०-०६-०० हे.आर.चौ.मी, आकार १.३४ रू.पै. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक- २१/११/२०२६

सही /-
ॲड.पुनम अजित म्हात्रे
जिल्हा न्यायालय-रायगड,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/२२०२/सन २०२६
दिनांक :- १९/११/२०२६

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

सी शेल रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मौजे चेंढरे, सर्व्हे नं. ४४१ अ २ (चेवले नगर) ता.अलिबाग, जि.रायगड तर्फे सचिव श्री उमेश सीताराम ठाकूर यांनी मे श्रीजी एन्टरप्रायजेस तर्फे पार्टनर. १. श्री विजयकुमार जयंतीभाई वसोया, रा. ई-३०१,वनिता पार्क अपार्टमेंट, भातर, चाररस्ता, सुरत, पो.ता.जि.सुरत- ३९५०१७,२.आशिषभाई मुलचंदभाई अमिन, रा. ५०३, मेघधनुषा अपार्टमेंट, घेड-दोड रोड, सुरत, पो.ता.जि.सुरत- ३९५००१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन
रायगड जिल्ह्यातील ता.अलिबाग, गाव चेंढरे येथील भूमापन क्रमांक व उपविभाग- ४४/१/अ/२, क्षेत्र ३१७० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांच्या वतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ३/१२/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- १९/११/२०२६

सही/-
(त.सं.पाटील)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे महागांव, ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.
मिळकतीचे वर्णन :-

जमिन मालकाची नांवे	स.नं.	क्षेत्र हे. आर	आकार रु.पैसे
१) रमेश बाबु कांबळे २) प्रकाश बाबु कांबळे ३) मोहन बाबु कांबळे ४) लिलाबाई काळुराम गायकवाड ५) ताराबाई अविनाश केदारे ६) बेबी सुरेश शिंदे ७) सुनिता किसन कांबळे ८) संतोष किसन कांबळे ९) सुभाष किसन कांबळे १०) पूर्णिमा उज्वल गायकवाड ११) वनिता रमाकांत देसाई १२) आनंद किसन कांबळे	४५०	०-३०-१०	१-५६

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणतीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- २०/११/२०२६

खरेदीदारांतर्फे
राठोड एण्ड एसोसिएट्स
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ५
पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री उदेश राजाराम गुरव, श्री. जयवंत राजाराम गुरव, श्री. अरुण राजाराम गुरव यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे हुमगाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १०/१ एकुण ०.२९.३० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : २१/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



राशीभविष्य

- **मेष** : कार्यात उत्तम प्रगती होईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं प्रलंबित राहतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **कर्क** : नव्या योजनांना गती मिळेल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल. वैद्यकीय कारणांसाठी धावपळ होईल.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या** : आजचा दिवस अडचणींचा राहील. नोकरीत ताण-तणाव वाढीस लागतील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **तूळ** : अचानक धनलाभ संभवतो. मंगलकार्याची बोलणी सफल ठरतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **वृश्चिक** : मोठे व्यवहार शक्यतो टाळावे. दिलासादायक घटना घडतील. कार्यकर्तृत्वाचा उचित वाव मिळेल.
- **धनु** : अर्थाजेनाचे नवे पर्याय समोर येतील. वैवाहिक सौख्य लाभेल. भागीदारी व्यवसायात लाभ होईल.
- **मकर** : वरिष्ठांची मर्जी राहील. बदली, बढतीसाठी अनुकूलता लाभेल. कोर्टाची कामं वेळीच करून घ्यावीत.
- **कुंभ** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. आर्थिक अडचणी वाढत जातील. मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या.
- **मीन** : मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडतील. मानसिक स्वास्थ लाभेल. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.

काय करू

पालकांचा विरोध आहे

सध्या माझ्यावर पालक किंवा प्रियकर यांच्यातल्या एकाची निवड करण्याची वेळ आली आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण घरच्यांना हे लग्न मान्य नाही. या मुलाशी लग्न केलं तर सगळे संबंध तोडून टाकण्याची धमकी माझ्या पालकांनी दिली आहे. माझी आई सतत आजारी असते. त्यामुळे मला तिला दुखवायचं नाही. मी आजवर माझ्या पालकांशी कधीच मोकळेपणाने बोलले नव्हते. त्यामुळे हे नातं उघड करणं मला जड गेलं. त्यातच प्रियकराचंही माझ्यावर खूप प्रेम आहे. तोही माझ्याशिवाय राहू शकत नाही. मी काय करू?

– तुझ्या पालकांना बसलेला धक्का पचवण्यासाठी तू त्यांना थोडा वेळ दे. त्यांना या सगळ्यातून बाहेर येऊ दे. तुझ्या अशा वागण्याचं त्यांना दु:ख झालं असेल. वातावरण निवळल्यावर तू तुझ्या पालकांशी बोल. त्यांना तुझी बाजू पटवून दे. त्यांची माफी माग. त्यांना दुखवायचा कोणताही उद्देश नसल्याचं सांग. शक्य असेल तर तुझ्या प्रियकराची पालकांशी भेट घडव. शांत रहा. अजिबात घाई करू नकोस. सकारात्मक विचार कर. तुझ्या प्रियकरालाही विश्वासात घे. पालकांना समजावण्यासाठी आप्तांची मदतही घेता येईल.

दिनविशेष

२१ नोव्हेंबर

१९६३ : सुप्रसिद्ध विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी अर्थात चिं.वि. जोशी यांचं निधन.
१९७० : भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांचं निधन.
२०१३ : 'तहेलका' साप्ताहिकाचे संपादक तरुण तेजपाल यांच्यावर महिला पत्रकाराने लैंगिक शोषण केल्याचा आरोप.
२०१५ : मालीची राजधानी असणाऱ्या वामाको येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये दोन सशस्त्र दहशतवाद्यांनी १७० नागरिकांना ओलिस ठेवले.

टेक ज्ञान

गूगल शिकवते उच्चार

दोस्तांनो, इंग्रजी शब्दांचे उच्चार त्यांच्या स्पेलिंगप्रमाणे असतातच असं नाही. भलं मोठं स्पेलिंग असणाऱ्या इंग्रजी शब्दाचे उच्चार करताना आपण पुरते गोंधळून जातो. एखाद्या शब्दाचा उच्चार करायचा तरी कसा हा प्रश्न पडतो. त्यातच हा उच्चार बरोबर आहे किंवा नाही याचीही खात्री नसते. पण तुमचा मित्र बनून गेलेलं गूगल इथेही तुमची मदत करायला सज्ज आहे. गूगलचं एक फीचर कठीण शब्दांचा योग्य उच्चार करण्याबाबत मार्गदर्शन करते.

त्यासाठी तुम्हाला स्मार्टफोनमधल्या माईक आयकॉनवर क्लिक करून संबंधित शब्दाचा उच्चार करावा लागेल. या फीचरमधला आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तो शब्द आणि त्या शब्दाचा तुम्ही केलेला उच्चार समजून घेईल. त्या शब्दाच्या योग्य उच्चाराशी तुम्ही केलेल्या उच्चाराची तुलना करेल. तुम्ही चुकीचा उच्चार केला असेल तर योग्य उच्चाराबाबत मार्गदर्शनही करेल. या फीचरमध्ये स्पीच रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. सध्या तरी या फीचरचा वापर इंग्रजी शब्दांसाठीच करता येणार आहे. पुढे त्यात इतर भाषांचा समावेश करण्यात येईल.

आरोग्यमंत्र

लोहाची कमतरता

आहारात नेहमी पालेभाज्यांचा समावेश करायला हवा, असं आहारतज्ज्ञ आवर्जून सांगतात. याचं कारण पालेभाज्यांमध्ये विविध जीवनसत्त्व तसंच पोषक घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे आरोग्य उत्तम राहण्यासाठी आणि मुख्यत्वे शरीरातील पोषक घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात पालेभाज्यांचा समावेश अवश्य करावा. अशा काही पालेभाज्यांचे औषधी गुणधर्म जाणून घेऊ...



✲ विविध भाज्यांमध्ये कोथिंबिरीचा वापर आवर्जून केला जातो. त्यामुळे पदार्थाना चव येते. ही कोथिंबीर उष्णता कमी करणारी तसंच पित्तशामक आहे. शिवाय ती हृदयरोगावरही अतिशय उपयुक्त मानली जाते.

✲ चाकवत पचण्यास सुलभ असुन ज्वरनाशक आहे. चाकवताची भाजी कृमीनाशक असुन यकृताच्या विकारांवर गुणकारी आहे. या शिवाय चाकवताच्या भाजीच्या सेवनाने त्वचेला कांती येते असंही दिसून आलं.

✲ मेथीची भाजी बहुतेकांना आवडते. त्यामुळे आहारात या भाजीचा समावेश अधिक प्रमाणात केला जातो. मेथीच्या भाजीमध्ये लोहाचं प्रमाण बरंच अधिक असतं. मेथीचं बी वातहारक तसंच शक्तीकारक असतं. मातेच्या दुधवाढीसाठी हे उपयोगी ठरतं.

✲ शेवग्याची भाजी ही वातनाशक आणि पित्तनाशक असते. याच्या सेवनाने हृदय तसंच रक्ताभिसरणाच्या क्रियेत सुधारणा होण्यास मदत होते.

पंचांग

शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक शु. १२, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : रेवती, योग : सिद्धि, सूर्योदय ६.५१, सूर्यास्त ५.५८

फॉरवर्ड्स

एक ही समानता है पतंग और ज़िन्दगी में,,,

ऊँचाई में हो तब तक ही वाह-वाह होती हैं...!

भटकंती

नोव्हेंबर ते मार्च या काळात इथे फिरता येईल. जबलपूरला उतरून बांधवगडला जाता येईल. विविध प्रकारची झाडं, झुडपंही इथे पहायला मिळतील. पक्षीप्रेमी, प्राणीप्रेमी,निसर्गप्रेमी प्रत्येकासाठीच इथे काही तरी खास आहे. साप,अजगर कासव असे प्राणीही इथे पहायला मिळतात.

थंडीत इथलं तापमान दोन अंशांपर्यंत जातं. त्यामुळे थंडीच्या दिवसात बांधवगडला जाणार असाल तर गरम कपडे न्यायला विसरू नका. मग निघताय ना, बांधवगडला मनसोक्त भटकंती करायला...

करिअरवाटा

म्युझियॉलॉजितील वेधक कारकिर्द

अनेकांना इतिहास जाणून घेण्याची, त्या संदर्भात अधिक अभ्यास करण्याची ओढ असते. त्यादृष्टीने इतिहास, भूगोल, कला आदी विषयांचे चांगले ज्ञान असणाऱ्यांसाठी 'म्युझियॉलॉजी' हा कारकिर्दीचा उत्तम मार्ग ठरू शकतो. उत्तम लेखनाची क्षमता, संशोधनासाठी आवश्यक पात्रता तसेच अन्य काही भाषांचे ज्ञान असेल तर या क्षेत्रात चांगली कामगिरी करता येते.



म्युझियॉलॉजीशी संबधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यात मास्टर्स इन म्युझियॉलॉजीला विद्यार्थी प्राधान्य देऊ लागले आहेत. यासाठी इतिहास, आर्कियॉलॉजी, एंथ्रोपोलॉजी, संस्कृत, फाईन आर्टस, फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, जियॉलॉजी, अर्थ सायन्स, ॲग्रीकल्चर, एन्व्हायर्नमेंटल सायन्स, मरिन सायन्स या विषयातील पदवी किंवा मास्टर्स डिग्री मिळवणारे पात्र ठरतात. म्युझियॉलॉजीशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नॅशनल म्युझियम, आर्कियॉलॉजिकल म्युझियम, प्रायव्हेट म्युझियम तसेच आर्ट गॅलरी आदींमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. यात क्युरेटर, रिसर्च असोसिएट, प्रबंधक अशा पदांवर काम करता येते. परदेशातही नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. या संदर्भातील अभ्यासक्रम नॅशनल म्युझियम इन्स्टिट्युट, नवी दिल्ली, एम एस युनिव्हर्सिटी बडोदा, कोलकता युनिव्हर्सिटी, बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी, अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी या ठिकाणी उपलब्ध आहेत.

खेचाखेची

वेडेपणा

इंटरनेटने लोक एवढे वेडे झालेत, की...
.
.
.
.
.
काल मेडीकल स्टोअरमध्ये एक जण ५०० एमजीच्या गोळी ऐवजी ५०० एमबीची गोळी मागत होता.

वेगळं काही

सध्याच्या काळात लहान मुलं काय करतील याचा नेम नाही. आता हेच बघा. मध्यंतरी हैदराबादच्या अवघ्या आठ वर्षांच्या मुलीने एका दिवसात दोन विश्वविक्रम केले. पीडीव्ही सहरुदा असं या चिमुकलीचं नाव आहे. तिने २० मिनिटांमध्ये ओरिगामीच्या १०२ कलाकृती तयार केल्या आणि तेवढ्याच वेळात ३५० सिरॅमिक टाईल्स तोडल्या. तिच्या या विक्रमांना 'एलीट वर्ल्ड रेकॉर्डस एलएलसी यूएसए'ने मान्यता दिली आहे. याआधी टाईल्स तोडण्याचा विक्रम उत्तर कोरियाच्या महिला खेळाडूच्या नावे होता. तिने २० मिनिटांमध्ये २६२ टाईल्स तोडल्या होत्या. सहरुदाला एकाच दिवशी तीन विक्रम करायचे होते. मात्र तिला तिसरा विक्रम करणं काही जमलं नाही.

सौंदर्यसाधना

नितळ, तजेलदार त्वचेसाठी...

सौंदर्याप्रती सजग असणाऱ्या महिलांसाठी 'केमिकल पील ऑफ' ही संकल्पना विचारात घेण्यासारखी आहे. खरं तर हे पील ऑफ फेशियलसारखेच असतात. यामुळे चेहऱ्यावरचे डाग, सुरकुत्या, काळपटपणा, पिंपल्स निघून जातात. विशेष म्हणजे होममेड पील ऑफ्सचा वापर करून नितळ, तजेलदार त्वचा मिळवू शकता. त्याच्या या टिप्स...



✲ 'मेलिक ॲसिड केमिकल पील ऑफ' बनवण्यासाठी एका सफरचंदाची सालं काढून पेस्ट बनवा. त्यात दोन मोठे चमचे कच्चं दूध आणि एक छोटा चमचा मध घाला. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून अर्धा तासापर्यंत ठेवा. नंतर कोमट पाण्याने धुवून टाका. यामुळे सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.

✲ 'ग्लायको ॲसिड पील ऑफ' बनवण्यासाठी दोन मोठे चमचे ब्राउन शुगर, चमचाभर मध, गुलाबजल हे सर्व मिसळून पेस्ट तयार करा आणि चेहऱ्याला लावा. वाळल्यानंतर हलक्या हातांनी पापुद्रे काढून टाका. नंतर चेहरा पाण्याने धुवा. यामुळे मृत त्वचा निघून जाते, चेहरा उजळ बनतो. ऊस ग्लायको ॲसिडचा सर्वोत्तम स्रोत आहे.

✲ 'टार्टरिक ॲसिड पील ऑफ'साठी ६-७ काळी द्राक्षं, अर्ध केळ या मिश्रणात चमचाभर मध घालून पेस्ट करा. ब्रशने चेहऱ्याला लावा. वाळल्यावर धुवून टाका.

सुडोकू १७७

६	२		५	३				
	५		२		१	९		७
	१				४			
	६							५
			१		३			
७							४	
			४				८	
१		५	३		२		६	
				८	५		९	१

टीप -

✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७६ चे उत्तर

७	८	९	१	६	४	३	२	५
३	२	१	८	७	५	९	४	६
५	६	४	३	९	२	८	१	७
१	३	६	२	८	९	७	५	४
९	५	७	६	४	३	१	८	२
८	४	२	७	५	१	६	९	३
६	९	३	४	२	८	५	७	१
४	१	५	९	३	७	२	६	८
२	७	८	५	१	६	४	३	९

शब्दकोडे क्रमांक १७७



आडवे शब्द :-

१) पाषाण
३) भयानक
६) जिम्मेदार
१०) बेदाणा
११) क्षुद्र, नीच, तेजोहीन
१३) धपाटा
१४) व्यय
१५) प्रभात
१७) नाला, ओढ्यावरील कच्चा पूल
१९) मत्सर
२०) घर
२३) वकिलाचे काम
२५) मातृभाषा
२७) हाडांचा सापळा
२९) दुर्योधनाचा जिवलग मित्र
३०) दरवाजा
३२) दैव
३४) समतल
३६) पंख
३७) विश्व
४१) सोन्याचा धागा
४२) गाय
४३) पाहुणचार,
४६) गाण्याची बैठक
४८) सीमा, मर्यादा
५०) माया, प्रेम
५१) श्वासोच्छ्वास
५२) सिंह
५४) लोक, प्रजा
५६) माल साठविण्याची जागा
५८) नीच, पाषाणहृदयी
६०) पाणी
६१) भुट्टा
६२) मनाचा झालेला ग्रह
६३) लक्ष्मीचे एक नाव
६५) हाक
६६) दावा लावणारा, वैरी
६७) कबूतर
६९) साय
७०) घागरा
७२) शृंगार(ग्रा)
७४) पत्र
७५) मिठी
७६) पातक
७७) शोध
८०) अंकुर
८१) आश्रय
८२) इंद्रिय, घटक
८३) एक प्रश्नार्थक शब्द
८४) कशा प्रकारचा, बटवा

उभे शब्द: -

१) कोवळ्या दुधाचा (चिकाचा) गोड पदार्थ
२) राजीवनयन
३) उजाड, खिन्न, ओसाड
४) ललाट
५) दारूचा एक प्रकार
७) पायविहीर
८) कलंक, डाग
९) पहारेकरी
१२) पृथ्वी
१६) शरीर
१८) विद्या
१९) हट्ट
२१) एक श्वासरोग
२२) नातेवाईक
२३) रंग
२४) होडी
२६) नम्र, वाकलेला
२७) भोळा
२८) मच्छर
२९) कारस्थान
३१) संध्याकाळ
३३) धमनी
३५) बासरी
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३८) उष्ण
३९) भडीमार
४०) आजच्या आधीचा दिवस
४१) वृद्धत्वाने पीडलेला
४४) धोंगे, थाप
४५) भगवान
४६) जन्ममृत्यू
४७) दक्ष
४८) पारा
४९) रात्र
५३) नमन
५५) नमते धोरण
५७) संसद सदस्य
५९) गवंडी
६१) मान, प्रतिष्ठा
६२) शंकराचे एक नाव
६४) तालुक्याचे वसुलीचे काम
६५) एक बैठा खेळ
६७) झाडाभोवतीचा कट्टा
६८) वितरण
७१) खण
७३) गर्दभ
७५) मडके
७६) एक चतुर्थांश भाग
७८) पवित्र
७९) खरगोश, एक प्राणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

दा	णा	गो	टा	■	स	ग	ळी	क	डे	■	सा	व	धा	न
वे	■	ठा	र	मा	र	णे	■	ब	रा	ब	र	■	क	व
दा	म	■	ग	ल	■	श	ह	र	■	ट	■	ग	टा	र
र	ट	र	ट	■	फा	■	जे	■	आं	ब	ट	■	■	स
■	का	म	■	क	र	क	री	त	■	टी	का	का	र	■
शो	■	रा	क्ष	स	■	ल	■	ग	व	त	■	ळ	■	भा
क	पा	ट	■	ब	स	■	ता	र	■	■	आ	जी	व	न
■	ठो	■	अ	■	ड	फ	■	■	क	च	रा	■	र	■
आ	पा	द	म	स्त	क	■	ना	पा	स	■	म	ध	मा	शी
रा	ठ	■	र	व	■	मो	द	क	■	गो	■	स	ई	■
ध	■	घी	■	नी	र	द	■	क	ट	■	ना	का	■	स
ना	ट	■	वा	य	स	■	क	ला	क	■	मां	■	ख	डा
■	र	ज	ई	■	दा	ख	ला	■	म	द	त	नी	स	■
सा	फ	■	ट	स	र	■	का	र	क	■	र	■	ख	वा
न	ल	द	■	खा	■	पा	र	वा	■	भू	■	आ	स	रा

कलासक्त

रंगबहार

शरद कोरडे

सई परांजपे विष्णुदास भावे पुरस्काराच्या मानकरी

या वर्षीचा विष्णुदास भावे गौरव पुरस्कार ज्येष्ठ नाटककार, लेखिका आणि दिग्दर्शिका सई परांजपे यांना जाहीर करण्याचा आला. हा पुरस्कार अखिल महाराष्ट्र राज्य नाट्य विद्या मंदिर समिती, सांगली यांच्याकडून देण्यात येतो. स्मृतीचिन्ह, रोख रक्कम ३० हजार रुपये, शाल व श्रीफळ या स्वरूपात देण्यात येतो. नाट्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या कलावंतांना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. या पुरस्काराचे हे ५८ वे वर्षे आहे. बालनाट्य, नाट्य लेखन, दिग्दर्शन, चित्रपट आणि अनुवाद अशा विविध क्षेत्रांतील मोलाच्या योगदानाबद्दल सई परांजपे यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला. अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉक्टर शरद कराळे यांच्या उपस्थितीत मोहन जोशी यांचे हस्ते हा पुरस्कार सई परांजपे यांना देण्यात आला.

सई परांजपे यांच्या आई शकुंतला परांजपे यांनी प्रभात फिल्म कंपनीच्या अनेक चित्रपटात व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली कामे केली होती, त्यांच्या लोकशाहीर राम जोशी, कुंकू, दुनिया ना माने, रामशास्त्री (दिग्दर्शक गजानन जागीरदार), स्त्री, सैरंध्री आदी चित्रपटांतून त्यांनी सहाय्यक भूमिका केल्या होत्या. त्यांनी रशियन चित्रकार यौरा स्लेपझॉब यांच्याबरोबर विवाह केला होता. त्यांना सई ही मुलगी झाल्यावर काही काळाने त्यांनी त्यांच्यापासून घटस्फोट घेतला व आपल्या वडिलांकडे आल्या. त्यानंतर त्यांनी काही बाल चित्रपटांची निर्मिती केली. राष्ट्रीय कार्यक्रमात ही त्यांचा सहभाग असे. त्यांनी कुटुंब नियोजनाच्या कामातही स्वतःला झोकून दिले. भारत सरकारने १९९१ साली त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. आपली मुलगी शिकली पाहिजे अशी त्यांची जबरदस्त महत्वाकांक्षा होती त्यामुळे त्यांनी सईला पोहणे, घोड्यावर बसणे, संगीत शिकणे, टेनिस खेळणे आधी शिकवण्या ठेवल्या. त्यांच्या व त्यांचे आजोबा रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्या प्रोत्साहनातून त्यांचा कलात्मक प्रवास सुरू झाला. त्यांचा जन्म १९ मार्च १९३८ साली परांजपे कुटुंबात मुंबई येथे झाला. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी 'मुलांचा मेवा' हे पुस्तक लिहून प्रकाशित केले होते. त्यांची सुरुवात मुळातच लेखक म्हणून झाली. बालसाहित्य लेखिका, बाल नाट्य लेखिका, नाटककार, पटकथाकार तसेच निर्माती व दिग्दर्शन या सर्वच क्षेत्रात त्यांनी महत्त्वाचे स्थान पटकावले. रँलर रघुनाथ परांजपे हे सईंचे आजोबा व पद्मभूषण पुरस्कार विजेत्या अभिनेत्या शकुंतला परांजपे या त्यांच्या आई. अभिनेते अरुण जोगळेकर हे त्यांचे पती व गौतम जोगळेकर व विनी जोगळेकर ही त्यांची मुलेही अभिनय क्षेत्रात कार्य कार्यरत होती. सई परांजपे यांनी एक तमाशा सुंदरसा, गीध (गिधाडे), जादूचा शंख, झाली काय गंमत, धिक ताक, पत्तेनगरी ही बालनाट्ये व पुन्हा शेजारी, खेळ मांडू दे, शेपटीचा शाप, सख्खे शेजारी ही व्यावसायिक नाटके लिहून ती सादर केली. त्यानंतर त्यांनी कथा १९८३, चष्मेबद्दू १९८१ चुडिया १९९३ दिशा १९९० साज १९९७ स्पर्श १९८० हे चित्रपट कथा पटकथा स्वतः लिहून त्यांचे दिग्दर्शन व निर्मिती केली. त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक कलाकृतीचे प्रथम वाचक अरुण जोगळेकर हे अभिनेते होते. त्यांनी सईच्या अनेक नाटकातून व चित्रपटांतून भूमिका केल्या. अरुण जोगळेकर यांच्यासोबत त्यांनी लग्न केले, पुढे त्यांना गौतम व विनी ही दोन मुले झाली काही काळाने त्यांनी परस्परांकडून घटस्फोट घेतला पण तरीही त्यांनी मैत्रीचे नाते कायम ठेवले. त्यापुढेही अरुण जोगळेकर यांनी सई सोबत नाटके व चित्रपट केले. या दोघांनी 'नाट्यद्वयी' नावाची नाट्यसंस्था स्थापन केली होती, त्या अन्वये त्यांनी अनेक बालनाट्ये व व्यावसायिक नाटके सादर केली. सई यांनी लग्नानंतर नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मध्ये प्रवेश घेतला होता व त्यानंतर त्यांनी विविध विषयांवर नाटके लिहिली. रंगभूमीवरील त्यांच्या योगदानामुळे त्यांना स्कॉलरशिप मिळाली व त्यायोगे पॅरिसला जाऊन



त्यांना रंगभूमीचा अभ्यास करण्याची संधी मिळाली होती. तेथून आल्यावर त्यांनी वेगळ्या घाटनेतील सिनेमे त्यांच्या खास शैलीत तयार केले. १९८० च्या 'स्पर्श' या चित्रपटात त्यांनी अंधशाळेतील एक दृष्टीहीन मुख्याध्यापक आणि डोळस विधवा स्त्री शिक्षिका यांची प्रेम कहाणी स्पर्शमध्ये मांडली, त्यात भावनिक संघर्ष मांडण्यात आला असून भिन्न जगामध्ये जगणाऱ्या दोन व्यक्ती आयुष्यातील संकटाशी झुंजताना एकमेकांच्या प्रेमात पडतात हा विषय घेतला. त्यात नासिरूद्दीन शहा व शबाना आजमी यांनी अप्रतिम भूमिका केल्या होत्या. १९८१ साली त्यांनी 'चष्मेबद्दू' हा हलकाफुलका विनोदी चित्रपट तयार केला. एका खोलीत राहणारे तीन तरुण व नवीन आलेली शेजारीण यांच्या भोवती व तिच्यावर प्रेम करणाऱ्या नायकाभोवती हा चित्रपट विनोदी पद्धतीने फिरतो. त्यांच्या प्रेमात बिब्बा घालण्याचा प्रयत्न नायकाचे मित्र करतात पण पुढे त्यांचे प्रेम सफल होते. या चित्रपटात दीप्ती नवल, फारुक शेख, रवी बासवानी, राकेश बेदी, सईद जाफरी या अभिनेत्यांनी सुंदर भूमिका केल्या. १९८२ च्या 'कथा' या चित्रपटात आजची संस्कृती, सामाजिक व्यवस्था व मूल्ये यांवर विनोदी पद्धतीने व्यंगपूर्वक टिप्पणी सई परांजपे यांनी केली आहे. या क्लासिक चित्रपटात दीप्ती नवल, फारुक शेख व नासीरुद्दीन शाह यांनी भूमिका केल्या. १९९० सालच्या 'दिशा' या चित्रपटात त्यांनी खेड्यातून बेरोजगार म्हणून मुंबईत आलेल्या व मिल मजदूर झालेल्या तरुणांच्या शोषणाची दाहक कहाणी मांडली आहे. या चित्रपटात नाना पाटेकर, रघुवीर यादव, ओम पुरी, शबाना आझमी, सयाजी शिंदे आदींनी भूमिका केल्या होत्या. हे सर्व चित्रपट सई पर्यंत यांनी स्वतःच्या खास शैलीत चित्रित केले होते. या चित्रपटांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



विठ्ठल जगाचा

कार्तिकी एकादशी
जनसागर उसळला
भक्तीरूपी गारवा
पंढरपुरी पसरला ।।
विठ्ठल तू जगाचा
मायबाप विश्वाचा
चाले जयघोष
तुझ्याच रे नामाचा ।।
चंद्रभागे काठावरती
घेऊनी टाळ, मृदुंग हाती
गरिबांच्या देवा संगती
सारे आनंदे गाती, नाचती ।।
भक्तांची दृष्टी न सरे
पाहुनी तुझे रूप गोजिरे
तहान भूक हरे
विठ्ठल चरणाशी रे ।।
विठ्ठल सुखाचा
घेऊनी प्रसाद
तृप्त होती सारे
मनी आनंद आनंद ।।

– राजाराम भगत,
मोठे शहापूर–अलिबाग

महाराष्ट्राचे एक प्रमुख वैशिष्ट्य : पंढरपूर वारी



सौ. मोक्षदा घाणेकर

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी–कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. **आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी ।** संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, **जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर !** पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. **पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।।** असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर **न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।** असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचिती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी–वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, **'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।'** म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत–बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण–निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

देशभक्ती, युद्ध आणि संभ्रम



युद्धभूमीवर शत्रूशी दोन हात करणारा सैनिक पडद्यावर दिसला की अंगावर रोमांच उभे राहतात. पण त्याच सैनिकाच्या संवादात एखादा विनोद आला, तर युद्धाचा गंभीर सूर अचानक बदलू शकतो! सलमान खानच्या 'मातृभूमी'च्या ट्रेलरमध्ये नेमके हेच दोन टोकांचे रंग पाहायला मिळतात. एका बाजूला रक्तरंजित संघर्ष, देशभक्ती आणि सैनिकांच्या कुटुंबांचे भावविश्व आहे; तर दुसरीकडे सलमानच्या खास शैलीतील संवाद आणि हलकेफुलके प्रसंग आहेत. त्यामुळे ट्रेलर पाहताना चित्रपट नेमका कोणत्या वाटेने जाणार, याची उत्सुकता निर्माण होते. अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, ४ डिसेंबरला तो चित्रपटगृहांमध्ये दाखल होणार आहे.

'बॅटल ऑफ गलवान' या मूळ नावाने सुरू झालेला हा चित्रपट २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षावर आधारित असणार होता. सलमानने यात 'महावीर चक्र'ने सन्मानित कर्नल बी. संतोष बाबू यांच्यापासून प्रेरित व्यक्तिरेखा साकारली आहे. मात्र, चित्रपटाच्या कथानकात आणि मांडणीत मोठे बदल झाल्याचे दिसते. ट्रेलरमध्ये सलमान तरुण कमांडोच्या रूपात आणि नंतर अधिक प्रौढ सैनिकाच्या भूमिकेत दिसतो. चित्रांगदा सिंहने त्याच्या पत्नीची भूमिका साकारली आहे. सैनिकांचे कुटुंब, देशासाठी कर्तव्य बजावण्याची भावना आणि सीमेवरील तणाव अशा विविध पैलूंची झलक यात पाहायला मिळते. ट्रेलरमधील काही संवाद देशभक्तीची भावना जागवतात, तर काही विनोदी टिप्पणी युद्धाच्या गंभीर वातावरणाशी विसंगत वाटू शकतात. विशेषतः 'शेजवान में कुछ काला है' हा सलमानचा संवाद लक्ष वेधतो; मात्र त्याचा परिणाम संमिश्र आहे. सलमानच्या संवादफेकीतील एकसुरीपणाही काही प्रसंगांमध्ये जाणवतो. दुसरीकडे, भारतीय आणि चिनी सैनिकांमधील रक्तरंजित संघर्ष, हातघाईची लढाई आणि तुलनेने वास्तवदर्शी ॲक्शन लक्षवेधी ठरते. काही दृश्यांमधील व्हीएफएक्स मात्र अपेक्षित प्रभाव निर्माण करत नाही. दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांनी युद्धाचा थरार आणि त्यामागील भावनिक बाजू यांचा समतोल साधला, तर 'मातृभूमी' वेगळा अनुभव देऊ शकतो.

चित्रपटांमध्ये संकटात सापडलेल्या माणसाला मदतीचा हात देणारा नायक आपल्याला नेहमी दिसतो; पण वास्तव जीवनातही एखादा कलाकार दुसऱ्या कलाकाराच्या मदतीला धावून आला, तर ती बातमी अधिक भावते. सध्या अभिनेता शरद कपूर यांच्यासाठी असाच एक दिलासा देणारा क्षण आला आहे. पायाला झालेल्या दुखापतीमुळे चालण्यासाठी वॉकरचा आधार घ्यावा लागत असलेल्या शरद कपूर यांच्या मदतीसाठी अभिनेता सोनू सूद पुढे सरसावला आहे. केवळ भेट घेऊन विचारपूस करण्यापुरते न थांबता, त्याने चित्रसृष्टीतून सहकार्य मिळवून देण्याचे आश्वासनही दिले. त्यामुळे शरद यांच्या कठीण काळात सोनूची ही भेट चर्चेचा विषय ठरली आहे. शरद कपूर यांनी अलीकडेच काम मिळावे, यासाठी भावनिक आवाहन केले होते. पायाला झालेल्या दुखापतीमुळे त्यांच्या हालचालींवर मर्यादा आल्या आहेत. परिस्थिती इतकी कठीण झाली की, आपल्या पाळीव कुत्र्यांची योग्य काळजी घेता यावी म्हणून त्यांना प्राण्यांच्या निवारा केंद्रात ठेवावे लागले. अशा वेळी सोनू सूद शरद कपूर यांच्या घरी पोहोचला. वॉकरच्या मदतीने बाहेर आलेल्या शरद कपूर यांना त्याने आधार दिला. दोघांमध्ये बराच वेळ संवाद झाला. या भेटीत सोनूने चित्रपटसृष्टीतील सहकाऱ्यांकडून शरद कपूर यांना मदत आणि काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. अडचणीच्या काळात सहकलाकाराने दिलेली ही साथ शरद कपूर यांच्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. दरम्यान, शरद कपूर यांना केवळ सोनू सूदकडूनच नव्हे, तर अन्य कलाकारांकडूनही संपर्क साधण्यात आला आहे.



सोनूची दिलदारी

'कोलंबस'ची अनोखी शोधमोहीम



शिक्षण पूर्ण करूनही नोकरी मिळत नाही, सरकारी भरतीची वाट पाहूनही संधी हाती लागत नाही आणि मनात जपलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही, अशी परिस्थिती अनेक तरुणांसमोर आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि तरुणांची हीच घुसमट एका वेगळ्या, हलक्याफुलक्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न 'कोलंबस' या आगामी मराठी चित्रपटातून करण्यात आला आहे. या चित्रपटाचा टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून, अभिनेता अंकुर वाढवे एका अनोख्या इंडस्ट्रीत काम करताना दिसणार असल्याची झलक त्यातून मिळते. 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेला अंकुर या चित्रपटात कैलास या तरुणाची भूमिका साकारत आहे. कैलासची उंची अवघी तीन फूट असली, तरी शिक्षक होण्याचे स्वप्न त्याने पाहिलेले असते. त्यासाठी उच्च शिक्षणही घेतलेले असते. मात्र, शिक्षणाचे खासगीकरण आणि सरकारी शिक्षकभरतीचा अभाव यासारख्या अडचणींमुळे त्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. अशा वेळी त्याला थेट अमेरिकेतून कामाची संधी मिळते. मात्र, ही संधी नेहमीच्या नोकरीसारखी नसून, एका वेगळ्याच इंडस्ट्रीशी संबंधित असते. ही इंडस्ट्री कोणती आणि तिथे काम करताना कैलासच्या आयुष्यात काय घडते, याची उत्सुकता टीझरमुळे निर्माण झाली आहे. एसएसआर फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे दिग्दर्शन रवींद्र शिवाजी यांनी केले आहे. अंकुरसोबत रोहित माने, किरण माने, सिमरन खेडकर, अश्विनी भांडे, प्रसाद माने, हेमंत शिंदे, चंद्रकांत मोकल आणि संस्कार हिरे यांच्या भूमिका आहेत.



पॅटिन्सन ठरला नवा 'बॉन्ड'!

हातात मार्टिनीचा ग्लास, चेहऱ्यावर निर्विकार भाव, प्रसंग कोणताही असो शत्रूला चकवण्याची तयारी आणि जगभरात गुप्त मोहिमांवर जाण्याची धमक, जेम्स बॉन्डची ही ओळख! हॉलीवूड गेले काही दिवस नव्या चेहऱ्याच्या शोधात होते. डॅनियल क्रेगने २०२१ मध्ये 'नो टाइम टू डाय'मधून निरोप घेतल्यानंतर '००७'च्या भूमिकेसाठी कोणाची निवड होणार, याची उत्सुकता कायम होती. या प्रतिष्ठेच्या शर्यतीत हॉलीवूडमधील काही लोकप्रिय कलाकारांची नावे चर्चेत होती. विशेष म्हणजे, यापूर्वी या भूमिकेसाठी चर्चेत असलेल्या कॅलम टर्नरसमोर रॉबर्ट पॅटिन्सन आणि निकोलस हॉल्ट यांच्यासारखी मोठी नावेही स्पर्धेत उतरली. त्यामुळे 'बॉन्ड'च्या पुढील मोहिमेचा नायक कोण? हा प्रश्न अधिकच रंजक झाला होता.

माध्यमांतील वृत्तांनुसार, रॉबर्ट पॅटिन्सन आणि निकोलस हॉल्ट यांनी अलीकडेच या भूमिकेसाठी स्क्रीन टेस्ट दिली. याआधी जॅक लोव्डेन, जोश ओ'कॉनर आणि कॅलम टर्नर यांची नावे चर्चेत होती. पॅटिन्सनने 'द बॅटमॅन'मध्ये सुपरहिरोची भूमिका साकारली असून, 'ट्वायलाइट' मालिकेमुळेही त्याला मोठी लोकप्रियता मिळाली. ख्रिस्तोफर नोलनच्या 'टेनेट'मधील त्याची गुप्तहेराची व्यक्तिरेखाही बॉन्डच्या चाहत्यांना आठवते.

दुसरीकडे, 'सुपरमॅन' आणि 'एक्समॅन'सारख्या चित्रपटांमधून ओळख निर्माण करणारा निकोलस हॉल्टही या शर्यतीतील महत्त्वाचा दावेदार मानला जात होता. कॅलम टर्नर, जॅक लोव्डेन आणि जोश ओ'कॉनर यांच्याही नावांची चर्चा कायम होती. मात्र, आता या चर्चेवर पडदा पडला असून रॉबर्ट पॅटिन्सन याचे नाव नवा बॉंड म्हणून अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे..

या नव्या बॉन्डपटाचे दिग्दर्शन डेनिस व्हिलेन्यूव्ह करणार असून, पटकथा लेखनाची जबाबदारी 'पीकी ब्लाइंडर्स'चे निर्माते स्टीव्हन नाइट यांच्याकडे आहे. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओकडून या चित्रपटाची निर्मिती होणार आहे.



कीटकांचा दोस्त

आपण रस्त्याने चालताना एखादा कीटक दिसला, तर त्याच्याकडे किती वेळ पाहतो? कदाचित क्षणभर पाहून पुढे निघून जातो. पण गोव्यातील एथन झेवियर याची गोष्ट वेगळी आहे. वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी हा मुलगा कीटकांचे जग समजून घेण्यासाठी तासन्तास निरीक्षण करतो. मुंग्यांची शिस्तबद्ध रांग, जमिनीखाली नाहीसे होणारे भुंगे किंवा अंधार पडल्यावर दिसणारे पतंग यांत त्याला निसर्गाची अद्भुत दुनिया दिसते. एथन पाच वर्षांचा असतानाच त्याला बागेतील गोगलगायी आणि झाडांवरील अळ्यांचे आकर्षण वाटू लागले. इतर मुलांना खेळणी आवडत असताना तो मात्र छोट्या जीवांच्या हालचाली पाहण्यात रमायचा. कीटकांविषयीची पुस्तके आणि वन्यजीवांवरील माहितीपट यांमुळे त्याची उत्सुकता आणखी वाढली.



सध्या एथन बारावीत विज्ञान शाखेत शिकत आहे. त्याच्याकडे कीटकांचा संग्रह असून, तो भेटलेल्या प्रत्येक कीटकाची नोंदही ठेवतो. एकदा त्याला रेशमासारखे धागे विणणाऱ्या 'वेबस्पिनर' या दुर्मीळ कीटकांचा समूह दिसला. पुस्तकांत त्यांच्याबद्दल वाचले होते, तरी प्रत्यक्ष पाहिल्यावर सुरुवातीला ते एखाद्या किड्यासारखे वाटले, असे तो सांगतो. केरळच्या सहलीत एकाच दिवशी काठीसारखे दिसणारे कीटक आणि टायगर बीटल पाहण्याची संधीही त्याला मिळाली. एथनच्या मते, कीटकांचे महत्त्व केवळ माणसाला त्यांच्यापासून काय फायदा होतो, एवढ्यापुरते मर्यादित नाही. मधमाश्या आणि फुलपाखरे परागीभवन करतात, तर अनेक कीटक सुकलेली पाने आणि जैविक कचरा विघटित करून जमिनीतील पोषक घटक पुन्हा मातीत मिसळतात. काही कीटक शेतीतील हानिकारक जीवांवर नियंत्रण ठेवण्यासही मदत करतात. निसर्गातील अन्नसाखळीत त्यांची महत्त्वाची भूमिका असते.

निसर्गमित्र

मोबाईलवर सतत काहीतरी पाहण्याच्या काळात एथनला मात्र थांबून निरीक्षण करायला आवडते. भविष्यात कीटकशास्त्राचा अभ्यास करून त्यांना चित्रपटांच्या माध्यमातून जगासमोर आणण्याचे त्याचे स्वप्न आहे. त्याला प्रसिद्ध वन्यजीव अभ्यासक डेव्हिड ॲटनबरो यांच्याप्रमाणे जगभर फिरून कीटकांचे जीवन चित्रित करायचे आहे. कीटकांबद्दलची भीती कमी करून त्यांच्या जगाविषयी कुतूहल निर्माण व्हावे, अशी त्याची इच्छा आहे. त्याच्या मते, प्रत्येक जीवाला निसर्गात स्थान आहे; तो माणसाच्या थेट उपयोगाचा नसला, तरी त्याचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. एथनची गोष्ट आपल्यालाही एक छोटीशी सवय लावू शकते आजूबाजूला दिसणाऱ्या जीवांकडे दुर्लक्ष न करता क्षणभर थांबून पाहण्याची. कदाचित आपल्या पायाखालील गवतामध्येच निसर्गाचे एखादे अद्भुत रहस्य दडलेले असेल!

विमानांचा रंग पांढराच का?

तुम्ही विमानात बसला आहात का? विमानात बसला नसाल तरी तुम्ही विमान तर बघितलंच असेल. प्रत्येक विमानाचा रंग हा पांढराच असतो. विमान कोणत्याही कंपनीचं असलं तरी त्याला दुसरा रंग दिला जात नाही. असं का बरं होत असावं? विमानाला पांढऱ्याशिवाय दुसरा रंग का बरं दिला जात नसावा? यामागे बरीच कारणं आहेत. पण विमान थंड रहावं म्हणून त्याला पांढरा रंग दिला जातो. विमान आकाशात उडतं. त्यावर सूर्याची किरणं पडत असतात. पांढरा रंग शीतल असतो. हा रंग सूर्याची उष्णता कमी प्रमाणात शोषून घेतो. म्हणूनच उन्हाळ्यात पांढरे किंवा फिकट रंगाचे कपडे घालण्याचा सल्ला दिला जातो. त्या धर्तीवर विमान थंड रहावं म्हणून पांढऱ्या रंगाचा वापर केला जातो.

असं का?



विमानाला पांढरा रंग देण्याचं अजून एक महत्त्वाचं कारण म्हणजे इतर रंग दिले तर विमान कंपन्यांना भरपूर पैसे द्यावे लागतात. त्या तुलनेत पांढरा रंग कमी खर्चात देता येतो. यामुळे कंपनीचे पैसेही वाचतात. तसंच पांढरा रंग द्यायला फार वेळही लागत नाही. इतर रंग द्यायला वेळही जास्त लागतो. या गोष्टींचा विचार करून विमानाला पांढरा रंग दिला जातो.

वाहतुकीची भन्नाट साधनं





वाहतुकीची बरीच साधनं आहेत. एखाद्या ठिकाणी लवकर पोहोचायचं असेल तर तुम्ही विमानाने जाऊ शकता. ट्रेन, टॅक्सी, मेट्रो, बस अशा विविध माध्यमांद्वारे तुम्ही प्रवास करू शकता. जगभरातही अशी अनेक साधनं आहेत. प्रत्येक देशाचं एक वेगळेपण आहे. वाहतुकीच्या अशाच काही भन्नाट पर्यायांविषयी...

ध क्युबामध्ये कोको टॅक्सी चालवली जाते. कोको टॅक्सी काळ्या आणि पिवळ्या रंगाची असते. पिवळ्या रंगाची टॅक्सी पर्यटकांसाठी तर काळ्या रंगाची टॅक्सी स्थानिकांसाठी असते. या टॅक्सीचा आकार नारळाच्या करवंटीसारखा असतो. त्यामुळे या टॅक्सीला कोको टॅक्सी हे नाव पडलं.

ध व्हिएतनाममध्ये सायक्लो रिक्षा खूप लोकप्रिय आहे. भारतातल्या अनेक शहरांमध्ये सायकल रिक्षा पहायला मिळतात. सायक्लो हा तसाच एक प्रकार आहे. सायक्लो ही तीन पायांची सायकल आहे. ही सायकल खूपच अनोखी आहे. याच्या पुढच्या बाजूला प्रवाशांसाठी आसन असतं तर मागच्या बाजूला चालक बसतो. व्हिएतनाममध्ये भटकंतीसाठी या सायकल रिक्षाने फिरता येतं.

फन टाईम

ध पोर्तुगालमध्ये मोंटे टोबोग्गन नावाचं एक साधन आहे. इथल्या मदिरा बेटांवर त्यांचा वापर होतो. मोंटे टोबोग्गन बनवण्यासाठी लाकूड आणि वेताचा वापर केला जातो. डोंगरावरून खाली येण्यासाठी मोंटे टोबोग्गनचा वापर केला जातो. इथल्या नागमोडी रस्त्यांवर प्रवास करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त साधन ठरतं.

ध जर्मनीमधल्या वुपरटल शहरात जवळपास ३९ फूट उंचीवर सस्पेन्शन मोनोरेल तयार करण्यात आली आहे. ही मोनोरेल म्हणजे वाहतुकीचं अनोखं साधन आहे. या मोनारेलचे डबे आणि स्थानकं बनवण्यासाठी जवळपास १९,२०० टन स्टील वापरण्यात आलं आहे. ही मोनोरेल जर्मनीमध्ये १९०१ पासून सुरू आहे. संपूर्ण शहरात म ोनोरेलची २० स्थानकं आहेत.

ध कंबोडियामधली बांबू ट्रेन खूपच प्रसिद्ध आहे. ही ट्रेन ३.७ किलोमीटरचं अंतर कापते. यासाठी २० मिनिटं लागतात. या ट्रेनला डबे किंवा इंजिन नाही. ती बांबूपासून तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये बसायची मजाच वेगळी!

भारतातील 'हॅलोविन' रात्री!

रात्रीचा काळोख हळूहळू पसरतो... आकाशात चंद्र चमकू लागतो, घरांच्या खिडक्यांमध्ये दिव्यांची रांग उजळते आणि नदीच्या पाण्यावर शेकडो दीप तरंगू लागतात. कुठे रंगवलेले चेहरे, अनोखे मुखवटे, तर कुठे ढोलांच्या तालावर थिरकणारे कलाकार! हे दृश्य पाहून तुम्हाला हॅलोविन या पाश्चात्त्य सणाची आठवण होईल. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, भारतातही अशा 'हॅलोविन' रात्री आहेत! येथे दिवे, मुखवटे, गूढ श्रद्धा आणि पिढ्यान्पिढ्या सांगितल्या जाणाऱ्या दंतकथा जिवंत होतात. भुतांच्या गोष्टींपासून पूर्वजांच्या आठवणींपर्यंत आणि पारंपरिक नृत्यांपासून निसर्गाशी जोडलेल्या उत्सवांपर्यंत अनेक रंग या रात्रींमध्ये पाहायला मिळतात. या परंपरा हॅलोविनसारखे कुतूहल निर्माण करतात. मात्र, त्यांचे स्वतःचे वेगळे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व आहे.

पश्चिम बंगालमध्ये दिवाळीच्या आदल्या दिवशी 'भूत चतुर्दशी' साजरी केली जाते. या दिवशी घरांमध्ये १४ दिवे लावण्याची परंपरा आहे. घराच्या कोपऱ्यांमध्ये, खिडक्यांजवळ आणि तुळशीच्या रोपाजवळ दिवे ठेवले जातात. पूर्वजांच्या आठवणी आणि आत्म्यांविषयीच्या लोककथाही सांगितल्या जातात. आसाममध्ये ऑक्टोबर महिन्यात साजरा होणारा काती बिहू हा शेतीशी संबंधित उत्सव आहे. शेतांमध्ये आणि धान्य साठवण्याच्या जागांजवळ बांबूच्या उंच काठ्यांवर छोटे दिवे लावले जातात. पिकांचे कीटकांपासून संरक्षण व्हावे आणि चांगले पीक यावे, अशी त्यामागील अपेक्षा असते. उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक भागांमध्ये नोव्हेंबर महिन्यात कार्तिक पौर्णिमा साजरी केली जाते. या रात्री नदीकिनारी शेकडो दिवे उजळतात. पाण्यावर तरंगणाऱ्या दिव्यांचे दृश्य अत्यंत मनमोहक असते. प्रकाश, कृतज्ञता आणि सामूहिक आनंद यांचा हा उत्सव आहे.

रहस्यमय जग



कर्नाटकच्या किनारपट्टीवरील तुळुनाडू भागात डिसेंबर ते मे या काळात 'भूत कोला' हा पारंपरिक विधी आयोजित केला जातो. यामध्ये कलाकार विशिष्ट आत्मिक शक्तींचे प्रतिनिधित्व करणारी रंगभूषा, आकर्षक वेशभूषा आणि वैशिष्ट्यपूर्ण अलंकार



परिधान करतात. ढोलांच्या तालावर रात्रभर चालणारे नृत्य आणि अग्नीचा प्रकाश वातावरणात वेगळीच रंगत आणतात. केरळच्या उत्तर मलबार भागात ऑक्टोबर ते मे या काळात थेय्यम हा प्रसिद्ध पारंपरिक विधिनाट्य प्रकार सादर केला जातो. कलाकार चेहऱ्यावर रंगीबेरंगी नक्षीकाम करतात, भव्य शिरोभूषा आणि आकर्षक पोशाख परिधान करतात. नृत्य, संगीत आणि अभिनयातून पौराणिक तसेच पूर्वजांशी संबंधित व्यक्तिमत्त्वांचे सादरीकरण केले जाते. हॅलोविनमध्ये जसे मुखवटे, वेशभूषा आणि गूढ कथांना महत्त्व असते, तसेच काही साम्य या भारतीय परंपरांमध्येही दिसते. मात्र, या उत्सवांचे मूळ भारतीय लोकसंस्कृतीत आहे. त्यामुळे भारतातील या 'हॅलोविन' रात्री म्हणजे केवळ रहस्य आणि मनोरंजन नव्हे, तर शतकानुशतके जपल्या गेलेल्या कला, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारशाचे जिवंत दर्शन आहे.

विशाल ब्रह्मपुत्रा

ब्रह्मपुत्रा ही ही भारतातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांपैकी एक आहे. तिचा जन्म तिबेटम धल्या हिमालयाजवळील तलावातून होतो. तिबेटमध्ये तिला 'सांगपो' असे नाव आहे. अरुणाचल प्रदेशातून भारतात प्रवेश करताना ती मोठ्या वेगाने दऱ्याखोऱ्यांमधून वाहत येते. पुढे ती आसाममध्ये पोहोचते. तिथल्या सपाट मैदानात आली की तिचा वेग कमी होतो. शेती, पिण्याचे पाणी, मासेमारी आणि



वाहतूक यासाठी तिचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या नदीचा प्रवाह खूप रुंद आहे. काही ठिकाणी तर ती १० ते १५ किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसते. काही पुराणकथांनुसार ब्रह्मदेवांची कन्या म्हणून तिला 'ब्रह्मपुत्रा' म्हणतात. परंतु तिचे विशाल रूप पाहून ब्रह्मपुत्र असेही म्हटले जाते. पावसाळ्यात ब्रह्मपुत्र नदीला अनेकदा पूर येतो. पण याच पुरामुळे सुपीक गाळ जमिनीवर साचतो. त्यामुळे शेती चांगली होते.

ओळख नद्यांची

ब्रह्मपुत्रेच्या काठावर अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी, वनस्पती तसेच एकशिंगे गेंडे आणि अनेक दुर्मिळ मत्स्यप्रजाती आढळतात. ब्रह्मपुत्र नदी बांगलादेशात गेल्यावर गंगेला मिळते. दोन्ही नद्यांचा तिथे एक त्रिभुजाकार डेल्टा तयार होतो. हा जगातील सर्वात मोठा डेल्टा आहे. या नदीवर बोगीबील पूल हा भारतातील सर्वात लांब रेल्वे-रोड पूल आहे. गुवाहाटी, तिनसुकिया, यासारखी अनेक शहरे ब्रह्मपुत्रेच्या काठावर आहेत. गुवाहाटी येथे कामाख्या देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. तर बांगलादेशात ढाका आणि मैमनसिंहसारखी अनेक महत्त्वाची शहरे आहेत. भारतात अरुणाचल प्रदेशात दिबंग, सबनसिरी ही मोठी धरणे आहेत. काही धरणे अजून बांधली जात आहेत. ब्रह्मपुत्र नदी खरोखरीच आसामची जीवनरेखा आहे.

इकारसचे पंख

प्राचीन काळची गोष्ट. ग्रीसमध्ये डेडालस नावाचा एक कुशल कारागीर होता. तो वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक सुंदर वस्तु बनवत असे. एकदा एका दुष्ट जादूगाराने त्याच्या मुलाला, इकारसला पळवून नेले आणि एका बेटावर कैदेत ठेवले. डेडालस आपल्या मुलाला शोधत त्या बेटावर पोचला. खूप प्रयत्न करून त्याने त्या जादूगाराच्या घरात प्रवेश केला. जादूगाराला ठार मारून डेडालस परत निघाला. परंतु त्याने आणलेली नाव समुद्राच्या लाटांबरोबर वाहून गेली होती. पण डेडालस हुशार होता. त्याने काही वेळ विचार केला आणि पक्ष्यांची पिसे आणि मेण वापरून दोन मोठे पंख बनवले. एक स्वतःसाठी आणि एक मुलासाठी.

आता या पंखांनी आपण आकाशात उडणार आहोत आणि समुद्र ओलांडून घरी जाणार आहोत. पण एक गोष्ट लक्षात ठेव. खूप वर उडू नकोस. सूर्य जवळ आला तर मेण वितळेल. आणि खूप खाली पण उडू नकोस. समुद्राच्या लाटा पंख ओले करतील. मध्यम उंचीने शांतपणे उड. उडण्यापूर्वी डेडालसने इकारसला समजावलं. सुरुवातीला इकारस नीट उडत होता. पण आकाशात त्याला खूप आनंद आणि उत्साह वाटला. मी तर पक्ष्यांपेक्षा जास्त शक्तिशाली आहे! मी अजून वर उडणार! तो वडिलांच्या सूचना विसरला आणि सूर्याकडे वरवर उडू लागला.

ग्रीक लोककथा



सूर्याच्या उष्णतेने त्याच्या पंखांतील मेण वितळायला लागले. पिसे खाली पडू लागली. इकारसने घाबरून वडिलांना हाका मारल्या. पण तो पंख मोडून गेल्यामुळे हळूहळू समुद्रात कोसळला. डेडालस दुःखी झाला. त्याने इकारसचे नाव त्या समुद्राला दिले. आजही ग्रीक लोक त्या समुद्राला इकारियन समुद्र म्हणूनच ओळखतात.

वाळवीसाठी हजारो मैल प्रवास

दरवर्षी शरद ऋतूत आकाशात हजारो पक्षी एकत्र उडताना दिसले, तर आश्चर्य वाटेल ना? हे पक्षी आहेत अमूर ससाणे! आकाराने लहान आणि वजनाने अवघे १५० ग्रॅम असलेले हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करतात. पूर्व रशिया, ईशान्य चीन आणि मंगोलिया येथे त्यांची वीण होते. त्यानंतर ते आफ्रिकेकडे हिवाळा घालवण्यासाठी निघतात. या लांबच्या प्रवासात त्यांना ईशान्य भारतात थांबायला आवडते. पण इथे त्यांना असं काय मिळतं, की ते हजारो किलोमीटरचा प्रवास करून इथे मुक्काम करतात? त्याचं उत्तर आहे वाळवी!

पावसाळ्यानंतर ईशान्य भारतात वाळवी मोठ्या संख्येने बाहेर पडते. अमूर ससाण्यांसाठी ही जणू मेजवानीच असते.



वाळवीतून त्यांना प्रथिने आणि ऊर्जा मिळते. त्यामुळे समुद्रावरून होणाऱ्या पुढच्या लांब प्रवासासाठी त्यांच्या शरीरात चरबीचा साठा तयार होतो. नागालँडमधील काही ठिकाणी २०१७ आणि २०१८ मध्ये जमा केलेल्या पक्ष्यांच्या विष्ठेतील न पचलेल्या अन्नकणांचा अभ्यास करून संशोधकांनी त्यांच्या आहाराची माहिती मिळवली. त्यासाठी सुमारे १२०० नमुने तपासण्यात आले. त्यातून जमिनीखाली राहणाऱ्या वाळवीच्या दोन प्रजाती अमूर ससाण्यांच्या आहारात मोठ्या प्रमाणात असल्याचे समोर आले. एका अंदाजानुसार, दहा लाख ससाणे दोन आठवड्यांमध्ये तब्बल दोन अब्ज वाळवी खाऊ शकतात!

२०२५ मध्ये वैज्ञानिकांनी अपापांग, अलांग आणि आहू या तीन अमूर ससाण्यांना हलकी उपग्रह उपकरणे लावून त्यांच्या प्रवासाचा मागोवा घेतला. अपापांगने अवघ्या सहा दिवस आठ तासांत सुमारे ६१०० किलोमीटर अंतर पार केले. अलांगने सुमारे ५६००, तर आहूने पाच दिवसांत ५१०० किलोमीटरचा प्रवास केला. त्यांच्या प्रवासातून पक्षी समुद्र कसा ओलांडतात आणि कुठे थांबतात, याची माहिती मिळाली. एकेकाळी नागालँडमध्ये या पक्ष्यांची मोठ्या प्रमाणावर शिकार होत असे. मात्र, स्थानिक नागरिक आणि वन्यजीव अभ्यासकांनी एकत्र येऊन त्यांच्या संरक्षणासाठी प्रयत्न सुरू केले. अमूर ससाण्यांचा प्रवास आपल्याला शिकवतो की, पक्ष्यांना वाचवण्यासाठी त्यांच्या संपूर्ण प्रवासातील अधिवास सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

पक्ष्यांविषयी...

दोस्त हे मस्त

दणकट याक



वाळवंटात वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. त्याचप्रमाणे बर्फाळ प्रदेशात याक हा प्राणी असतो. याक हा गाय, बैलांसारखाच दिसतो. मात्र त्याच्या अंगावर खूप केस असतात. याक शाकाहारी प्राणी आहे. तो गवत खातो तसंच भरपूर पाणी पितो. पाळीव याक शेतात राबतात. याकची शिंगं दणकट आणि टोकदार असतात. खूप थंडी पडल्यावर याक आपल्या शिंगाने बर्फ खणून गवत खातो. याक अत्यंत धिप्पाड असा प्राणी आहे. बर्फाळ प्रदेशातले लोक याकचं दूध पितात. याकच्या दुधापासून तयार करण्यात आलेलं पनीर आणि चीज लवकर खराब होत नाही.

खादाडी

चमचमीत व्हेज टॅकोज



तुम्हाला छान चविष्ट पदार्थ खायला खूप आवडतात ना? तुम्ही मस्तपैकी व्हेज टॅकोज बनवून बघा. यासाठी चार टॅकोज, एक कप उकडलेला राजमा, दोन चमचे टोमॅटो प्युरी, मीठ, एक कांदा, दोन चमचे तेल, टोमॅटो आणि कोथिंबिर असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. यात कांदा, राजमा, मीठ, टोमॅटो प्युरी घालून मिक्स करा. मॅशरने हे मिश्रण मॅश करून घ्या. त्यानंतर त्यात थोडी साखर, हिरवी मिरची, चिली फ्लेक्स आणि कोथिंबिर घालून शिजवून घ्या. हे सगळं शिजवलेलं मिश्रण टॅकोजमध्ये घाला. वरून चिरलेला कांदा, टोमॅटो आणि कोथिंबिर घालून सजवा. मस्तपैकी खा.

स्टडी टिप्स

नवे मित्र-मैत्रिणी जोडा



तुम्ही वेगवेगळ्या शिकवणी वर्गांना जात असाल. शाळेत तुमचे मित्र-मैत्रिणी असतीलच. पण या क्लासमध्येही मुलामुलींशी बोला. त्यांच्याशी मैत्री करा. यामुळे एखादा मुद्दा समजला नाही तर तुम्ही त्यांच्याशी चर्चा करू शकता. काही कारणामुळे क्लास बुडवावा लागला तर तुम्ही त्यांच्याकडून नोट्स घेऊ शकता. परीक्षेच्या काळात एकत्र अभ्यास करू शकता. एकत्र अभ्यास केल्यामुळे विषय समजून घेणं सोपं होतं आणि हसत-खेळत छान अभ्यासही होतो.

योगा टाईम

करा शलभासन

आपलं शरीर लवचिक असायला हवं. शरीर लवचिक नसेल तर खेळताना, व्यायाम करताना त्रास होऊ शकतो. शरीर लवचिक बनवण्यासाठी तुम्ही शलभासन करू शकता. हे आसन खूप सोपं आहे. यामुळे शरीर लवचिक होतच शिवाय कंबरेचे स्नायू बळकट होतात. या आसनामुळे पचनशक्ती सुधारते. त्यामुळे हे आसन खूपच उपयुक्त ठरू शकतं.



निवडक

शौर्या पवारची सुवर्णभरारी

महाड : जागतिक क्रीडा क्षेत्रात महाड तालुक्यातील शिरवली गावाचा नावलौकिक उंचावणारी अभिमानास्पद कामगिरी शौर्या निलेश पवार हिने केली आहे. २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शौर्याने जपान आणि मलेशिया येथील खेळाडूंना पराभूत करत सुवर्णपदक पटकावले आहे.ग्रामीण भागातून पुढे येत आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या जिद्द, मेहनत आणि उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर शौर्याने मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शिरवली गावासह संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शौर्याच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, भविष्यातही ती क्रीडा क्षेत्रात अशीच यशस्वी कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



साई सत्यम, मायटी स्टार्स संघांची आगेकूच

पुणे : डीएसपी स्पोर्ट्स अँड इव्हेंटस यांच्या वतीने आयोजित डीएसपी करंडक सहाव्या मान्सून लीग मिश्र कॉर्पोरेट क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत साई सत्यम क्रिकेट क्लब, मायटी स्टार्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली. आव्हाळवाडी येथील राजगड स्पोर्ट्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या लढतीत चित्तरंजन राय(नाबाद १०१) याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर साई सत्यम क्रिकेट क्लब संघाने फोर्स इलेव्हन संघाचा १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. दुसऱ्या लढतीत सचिन सकट (६४ धावा व २-५) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर मायटी स्टार्स संघाने पुणेरी स्ट्रायकर्स संघाचा १०८ धावांनी पराभव केला. पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजित पिंपरी चिंचवड करंडक आंतरक्लब खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत विन टेंपल क्लब आणि बजरंग दल या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अथर्व वानवे याने फटकावलेल्या ६१ धावांच्या जोरावर विन टेंपल क्लबने सह्याद्री किंग्ज् संघाचा ४५ धावांनी पराभव केला.



पनवेलच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



पनवेल : सांगली जिल्ह्यातील रेटरे येथे झालेल्या पहिल्या महाराष्ट्र राज्य युवा व वरिष्ठ महिला-पुरुष अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत तीन पदकांची कमाई केली. या स्पर्धेत दुर्पता सऊद हिने सुवर्णपदक, उन्नती संग्रामसिंग परदेशी हिने रौप्यपदक, तर शान उरणकर याने कांस्यपदक पटकावले. जी. एस. के. इंटरनॅशनल सैनिक स्कूल, रेटरे, सांगली येथे ही स्पर्धा पार पडली. ४५ ते ४८ किलो वजनगटात पनवेलची कन्या दुर्पता सऊद हिने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक जिंकले. दुर्पता सध्या क्रीडापीठ, अकोला येथे सराव करत असून, तिला पनवेलचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर आणि साताऱ्याचे सागर जगताप यांचे मार्गदर्शन लाभत आहे.वरिष्ठ महिला गटातील ६५ ते ७० किलो वजनगटात उन्नती संग्रामसिंग परदेशी हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक मिळवले. पुरुष गटात पनवेलच्या शान उरणकर याने प्रभावी कामगिरी करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले.या तिन्ही खेळाडूंना पनवेलचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे प्रशिक्षण लाभत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत पदके मिळवून पनवेलचे नाव उंचावणाऱ्या खेळाडूंचे क्रीडाप्रेमींकडून अभिनंदन होत आहे.

दक्षिण आफ्रिकेचा बांगलादेशवर विजय



जोहान्सबर्ग : बांगलादेशचा संघ सध्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना जोहान्सबर्गच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने एकतर्फी खेळ करत ९ गडी राखून दमदार विजयाची नोंद केली. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २ कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशने ४०० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने ५५७ धावांची डोंगर उभारून पहिल्या डावात मोठी आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशचा डाव अवघ्या १६८ धावांवर आटोपला. यासह दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १२ धावांची गरज होती. हे आव्हान दक्षिण आफ्रिकेने ९ गडी राखून पूर्ण केलं. पहिल्या डावात ४०० धावांचा पल्ला गाठणाऱ्या बांगलादेशला दुसऱ्या डावात हवी तशी कामगिरी करता आली नाही. संपूर्ण संग १६८ धावांवर गारद झाला. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी या डावात चांगली गोलंदाजी केली. फिरकी गोलंदाज सायमन हार्मरने या डावात सर्वाधिक ६ गडी बाद केले. तर कगिसो रबाडाने ३ गडी बाद केले. बांगलादेशकडून फलंदाजी करताना लिटन दासने सर्वाधिक ३९ धावांची खेळी केली. तर महफिजुल इस्लामने ३२ धावांची खेळी केली.

वेलिंग्टन कसोटी दुसरा दिवस

भारताची 'यशस्वी' सुरुवात

राहुल-जैस्वालची वादळी खेळी
न्यूझीलंडचे ३६८ धावांचे आव्हान
भारत दुसऱ्या दिवसअखेर १५९ धावा

। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना वेलिंग्टनमधील बेसिन रिझर्व्ह येथे खेळला जात आहे. पहिल्या दिवशी, शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या सामन्यात भारतीय संघाने शानदार सुरुवात केली. पहिल्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले.बुमराहने सुरुवातीलाच न्यूझीलंडला मोठा धक्का दिला. शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी न्यूझीलंडचा संपूर्ण संघ पहिल्या डावात ३६८ धावा करुन सर्वबाद झाला. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. भारताने आपल्या पहिल्या डावात १ विकेट गमावून १५९ धावा केल्या आहेत. केएल राहुल ५२ धावांवर आणि देवदत्त पडिक्कल १६ धावांवर नाबाद होता. पहिल्या डावातील एकूण धावसंख्येनुसार भारत आता २०९ धावांनी पिछाडीवर आहे.

पहिल्या दिवशी भारतीय संघाने चांगली गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराहने सुरुवातीलाच किवींना मोठा धक्का दिला. एका टप्प्यावर न्यूझीलंडची धावसंख्या पाच विकेट्स गमावून ७० धावांवर होती. त्यानंतर हेन्री निकोलस आणि ग्लेनफिलिप्स यांनी सूत्रे हाती घेतली. हेन्री निकोलस आणि ग्लेन फिलिप्स यांच्या शानदार खेळीमुळे न्यूझीलंडने पहिल्या डावात एक भक्कम धावसंख्या उभारली. पहिल्या दिवशी न्यूझीलंडने ८२ षटकांत पाच विकेट्स गमावून २४३ धावा केल्या.

दुसऱ्या दिवशी, न्यूझीलंडने २४३ धावांवर पाच गडी बाद असताना आपला डाव पुन्हा सुरू केला. निकोलसने एक बाजू सांभाळून धरली आणि फिलिप्सने आपले शतक पूर्ण केले. फिलिप्स आणि निकोलस यांनी सहाव्या विकेटसाठी २१६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. परंतु, दुसऱ्या सत्रात, प्रसिद्धने नॅथन स्मिथला १४ धावांवर , आकाश दीपने जेमिसनला ११ धावांवर आणि बुमराहने हेन्रीला १ धावावर बाद केले.



अखेरीस, अंशुल कंबोजने जेकब डफीला बाद करून न्यूझीलंडचा डाव संपवला. फिलिप्स आणि निकोल्सच्या शानदार खेळीमुळे न्यूझीलंडला ३६८ धावांची सन्मानजनक धावसंख्या उभारण्यास मदत झाली. टीम इंडियाकडून बुमराहने सर्वाधिक चार विकेट्स घेतले. आकाशदीपने तीन, अंशुल कंबोजने दोन आणि प्रसिद्ध कृष्णाने एक विकेट घेतला. भारतीय संघाने आपल्या डावाची चांगली सुरुवात केली. सलामीवीर केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी महत्वपूर्ण भागीदारी केली. दोघांनीही सुरुवातीपासूनच वेगाने धावा केल्या. विशेषतः जैस्वाल चांगल्या लयीत होता. त्याने मैदानात शानदार फटकेबाजी केली. राहुलने एक बाजू सांभाळली आणि खराब चेंडूंवर सहज धावा केल्या. सत्राच्या शेवटच्या टप्प्यात जैस्वाल ८९ चेंडूंमध्ये ८५ धावा करून बाद झाला. यशस्वीचे शतक हुकले, त्याने आपल्या खेळीत १६ चौकार मारले. तो बाद झाल्यानंतर भारताचा धावगतीचा वेग मंदावला. केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी अर्धशतके झळकावून भारताला मजबूत स्थितीत आणले आहे. आता राहुल ५२ धावांवर आणि देवदत्त पडिक्कल १६ धावांवर क्रीजवर टिकून आहेत.

वेलिंग्टन कसोटीत केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी अर्धशतकी भागीदारी केली. हे दोघेही सलामीवीर म्हणून भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये एकत्र खेळत आहेत. राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी पहिल्या विकेटसाठी एकूण १३० धावा केल्या, आणि यासोबतच ३२ वर्षांत पहिल्या विकेटसाठी १०० धावांची भागीदारी करणारी पहिली भारतीय सलामीची जोडी ठरली. यशस्वीने ८५ धावांचे, तर राहुलने ४२ धावांचे योगदान दिले. यासोबतच ते जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या इतिहासात १००० धावांचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण करणारी केवळ सहावी सलामीची जोडी आहे. तसेच या यादीत स्थान मिळवणारी ती दुसरी भारतीय सलामीची जोडी ठरली आहे. यापूर्वी, यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा या सलामीच्या जोडीने २८ कसोटी सामन्यांमध्ये एकूण १२६९ धावा केल्या होत्या.यापूर्वी नवज्योत सिंग सिद्धू आणि नयन मोंगिया या सलामीच्या जोडीने १९९४ मध्ये न्यूझीलंडमध्ये १०० पेक्षा जास्त धावांची भागीदारी केली होती. हा ३२ वर्षांचा दुष्काळ आता, राहुल आणि यशस्वीने संपवला आहे.

पाकिस्तानने जिंकली टेस्ट सिरीज

श्रीलंकेचा केला १-0 ने पराभव

। रावळपिंडी । वृत्तसंस्था ।

नुकतीच श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यात दोन सामन्यांची टेस्ट सिरीज पार पडली. पाकिस्तानमध्ये ही सिरीज खेळवली गेली. श्रीलंकेचा संघ या पाकिस्तान दौऱ्यात अपयशी ठरला आहे. पाकिस्तानने श्रीलंकेचा या टेस्ट सिरीजमध्ये १-० ने पराभव केला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून एकही टेस्ट सिरीज न जिंकणाऱ्या पाकिस्तानने अखेर श्रीलंकेला पराभूत करत सिरीज जिंकली आहे. पाकिस्तानने दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेचा तब्बल ८ विकेट्सने पराभव केला आहे. तर पहिला सामना अनिर्णित राहिला होता.

पाकिस्तानच्या विजयाचा खरा शिल्पकार वेगवान गोलंदाज. मोहम्मद अब्बासला प्लेयर ऑफ द



मॅच तसेच प्लेयर ऑफ द सिरीज या दोन्ही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

श्रीलंकेचा संघ दुसऱ्या डावात ३१६ रन्स वर ऑल आउट झाला. त्यानंतर पाकिस्तानच्या संघापुढे दूसरा सामना जिंकण्यासाठी केवळ ९० रन्सचे टार्गेट होते. पाकिस्तानने चौथ्या दिवशी आक्रमक खेळ करत केवळ १३ ओव्हर्समध्ये २ विकेट्स गमावून पूर्ण केले आणि सिरीज आपल्या नावावर केली.

बाबर आझमने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. तो निर्णय अगदी बरोबर ठरला. पहिल्या डावात श्रीलंकेची फलंदाजी केवळ ९८ रन्सवर ऑल आउट झाली.

मुंबईत २३ नोव्हेंबरपासून कबड्डीचा थरार!

विजेत्या संघाला मिळणार ३५ हजारांचे पारितोषिक

। मुंबई । प्रतिनिधी ।

यंग भारत सेवा मंडळाच्या हिरक महोत्सवी कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार लवकरच प्रभादेवीत रंगणार आहे. २३ ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेची गटवारी आणि पारितोषिके मंडळाकडून जाहीर करण्यात आली आहेत.

प्रभादेवी येथील स्व. राजाभाऊ साळवी क्रीडागृहातील स्व. भिकाजी गुणाजी भारती क्रीडांगणावर ही स्पर्धा पार पडणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्या संघाला स्व. भिकाजी गुणाजी भारती चषक आणि रोख ३५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. उपविजेत्या संघाला चषकासह २५ हजार रुपये मिळतील. तर उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या दोन्ही संघांना प्रत्येकी १० हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.



वैयक्तिक कामगिरीसाठीही आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूला माजी स्वातंत्र्यसैनिक स्व. मोहन कदम यांच्या स्मरणार्थ सात हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. उत्कृष्ट चढाईपटूला स्व. श्रीधर सावंत यांच्या स्मरणार्थ चार हजार रुपये, तर उत्कृष्ट पकड करणाऱ्या खेळाडूला स्व. अर्जुन राऊत यांच्या स्मरणार्थ चार हजार रुपये देण्यात येणार आहेत. याशिवाय प्रत्येक दिवसाचा मानकरी ठरणाऱ्या खेळाडूला एक हजार रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे.

क्रीडा मैदानावर जाहिरात फलक उभारणीचा प्रयत्न?

प्रशांत रणवरे यांच्या तक्रारीनंतर संबंधित कंपनीला नोटीस बजावणार

पनवेल । प्रतिनिधी ।

कळंबोली वसाहतीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदानावर जॉगिंग ट्रॅकचे नुकसान करून भव्य जाहिरात फलक उभारण्याचे काम सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. महापालिकेची परवानगी न घेताच हे काम सुरू असल्याचा आरोप समाजसेवक प्रशांत रणवरे यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी लेखी तक्रार केल्यानंतर महापालिकेच्या परवाना विभागाने संबंधित जाहिरात कंपनीला नोटीस बजावण्याची तयारी सुरू केली आहे.

कळंबोलीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदानावर जाहिरात फलकासाठी मोठे स्ट्रक्चर उभारले जात असल्याची माहिती मिळताच प्रशांत रणवरे



यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे जाहिरात फलक उभारण्यासाठी महापालिकेची परवानगी आहे का, याची विचारणा केली. मात्र, उपस्थित कर्मचाऱ्यांकडे परवानगीची कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

> संबंधित जाहिरात कंपनीला नोटीस बजावण्यात येणार असून, जाहिरात फलकासाठी उभारण्यात आलेले स्ट्रक्चर काढून टाकण्याचे निर्देश दिले जाणार आहेत.
> – महादेव पिचड, अधिकारी, परवाना विभाग, पनवेल महापालिका

त्यानंतर त्यांनी महापालिकेच्या परवाना विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली.

क्रीडा मैदान हे नागरिकांसाठी असून, येथे नागरिक व्यायाम आणि जॉगिंगसाठी येतात. अशा सार्वजनिक जागेवर जाहिरात फलक उभारताना नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. जॉगिंग ट्रॅकचे नुकसान करून जाहिरात फलक उभारण्याचा प्रकार गंभीर असून, महापालिकेने संबंधित कंपनीवर कारवाई करून फलकाचे स्ट्रक्चर तातडीने हटवावे, अशी मागणी रणवरे यांनी केली. पनवेल महापालिका हद्दीत विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात जाहिरात फलक उभारले जात आहेत. यातील अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यासाठी प्रशासनाकडून मोहीम आखण्यात आली आहे. मात्र, असे फलक हटविण्यासाठी होणारा खर्च महापालिकेच्या तिजोरीतून करण्यास सर्वपक्षीय नगरसेवकांनी विरोध दर्शविला आहे. संबंधित जाहिरात कंपन्यांकडून दंड वसूल करण्याबरोबरच फलक हटविण्याचा खर्चही त्यांच्याकडूनच वसूल करावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे.

सिराजला वगळल्याने शास्त्री, गावस्कर संतप्त

। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला भारतीय संघाच्या अंतिम ११ खेळाडूंमधून वगळण्याच्या निर्णयावर माजी दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावस्कर आणि रवी शास्त्री यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

मोहम्मद सिराज कुठे आहे? त्याचा अनुभव, आक्रमकता आणि चेंडूने सामन्यात निर्णायक बदल घडवून आणण्याची क्षमता यांना निश्चितच महत्त्व आहे, असे शास्त्री यांनी ट्वीट केले.माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनीही सिराजला अंतिम अकरामध्ये स्थान न मिळाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. सिराजला संघात स्थान न मिळणे आश्चर्यकारक आहे.



त्याला एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले आणि त्यानंतर केवळ अखेरच्या सामन्यात खेळवण्यात आले. त्या सामन्यात त्याला संधी दिली तेव्हा पहिल्या कसोटीसाठी त्याची तयारी करून घेतली जात आहे, असे मला वाटले होते.

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धा **मलेशियाचा ४-१ असा पराभव**

भारतीय महिला संघाचा विजयारंभ

। भोपाळ । वृत्तसंस्था ।

गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील विजेतेपदाच्या बचावाची सुरुवात दणक्यात केली. मलेशियाने सुरुवातीला आघाडी घेत भारताला धक्का दिला; मात्र भारतीय खेळाडूंनी जोरदार पुनरागमन करत ४-१ असा शानदार विजय मिळवला. भोपाळ येथील आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल, नाथू बरखेडा येथे गुरुवारी हा सामना झाला.

भारताकडून मुमताज खान (२०वे मिनिट), कर्णधार सलीमा टेटे (३५वे मिनिट), पदार्पण करणारी पूजा साहू (३९वे मिनिट) आणि लालरेमसियामी



(४९वे मिनिट) यांनी गोल नोंदवले. मलेशियाकडून नुरामिराह झुल्किफ्ली हिने १९व्या मिनिटाला गोल केला.

सामन्याच्या दुसऱ्या सत्रात मलेशियाने आक्रमक सुरुवात केली. १९व्या मिनिटाला नुरामिराह झुल्किफ्लीने मैदानी गोल करत मलेशियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, ही आघाडी फार काळ टिकली नाही.

अवघ्या एका मिनिटात मुमताज खानने गोल करत भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली. त्यामुळे मध्यंतराला दोन्ही संघांची बरोबरी होती.

मध्यंतरानंतर भारतीय संघाने आक्रमणाची तीव्रता वाढवली. ३५व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरनंतर गोलक्षेत्रात झालेल्या गोंधळाचा फायदा घेत कर्णधार सलीमा टेटेने चेंडूला गोलजाळ्याची दिशा दाखवली. या गोलमुळे भारताने २-१ अशी आघाडी घेतली. त्यानंतर अवघ्या चार मिनिटांत भारताने आणखी एक गोल केला. पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या पूजा साहूने ३९व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर अचूक फटका मारत भारताची आघाडी ३-१ अशी वाढवली.

भारताचा आक्रमक खेळ चौथ्या सत्रातही कायम राहिला. ४९व्या मिनिटाला लालरेमसियामीने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत भारताची आघाडी ४-१ अशी केली. त्यानंतर भारतीय बचावफळीने मलेशियाला पुनरागमनाची संधी दिली नाही. भारताकडून पदार्पण करणाऱ्या पूजा साहूने गोल नोंदवण्याबरोबरच प्रभावी कामगिरी केली. तिच्या या कामगिरीची दखल घेत तिला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)